## ध्यानाचे श्लोक

काषायवस्त्रं करदंडधारिणं कमंडलुं पद्मकरेण शंखम् । चक्रगदाभूषित भूषणाढ्यं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ।।१।। औदुंबरः कल्पवृक्षः कामधेनुश्च संगमः । चिंतामणी गुरोः पादौ दुर्लभौ भुवनत्रये ।।२।। कृतेजनार्दनो देवस्त्रेतायां रघुनंदनः। द्वापारे रामकृष्णौ च कलौ श्रीपादवल्लभः ।।३।। औदुंबरातळवटीं नरसिंह योगी । कृष्णातटीं परम शांतिसुखासी भोगी । ध्यानस्थ होउनि समस्त चरित्र पाहे । अनन्य जो शरण इच्छित देत आहे । त्रैमूर्तिराजा गुरु तोचि माझा । कृष्णातिरीं वास करोनि बोजा । सुभक्त तेथें करिती आनंदा । ते सुर स्वर्गी पहाती विनोदा ।।



# ।। अथ श्रीगुरुप्रसाद ।।

## ।।श्रीगुरुः शरणम् ।।

ब्रह्मीभूत श्री. प. प. श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती (टेंभे) स्वामी महाराज यांच्या प्रेरणेने ''श्रीगुरुप्रसाद'' श्री. प. प. श्रीशंकरानंद भारती स्वामी (पूर्वाश्रमींचे शंकर दत्तात्रेय गुळवणी, कौलवकर) यांनी बरीच वर्षांपूर्वी लिहून ठेविला होता. श्रीगुरुभक्तांना तो विनामूल्य मिळावा अशी श्रीस्वामींची इच्छा असल्यामुळें द्रव्याभावामुळें तो आजपर्यंत अप्रकाशित राहिला. श्रीस्वामी महाराजांचे वय हल्ली ८३ वर्षांचे असून हल्ली ते श्रीनृसिंहवाडीस राहतात. त्यांच्या समक्ष ''गुरुप्रसाद'' प्रसिद्ध होऊन श्रीगुरुभक्तांना तो विनामूल्य मिळण्याचा योग श्रीगुरूंनी माझ्यासारख्या अकिंचन मनुष्याकडून घडवून आणला ही त्यांचीच कृपा होय. या ग्रंथांत श्रीनृसिंहवाडी (नरसोबावाडी) येथील पुजाऱ्याचा मूळ पुरुष वे. भहिरंभट यांच्यावर श्रीगुरूंनी कृपा करून त्यांना वृद्धावस्थेत (८० वर्षांच्या वयांत) पुत्र दिला, त्याचाच विस्तार होऊन हल्लीं २०० घरे पुजाऱ्यांची नृसिंहवाडीला आहेत. मूळपुरुषाच्या रसाळ कथेच्या अनुषंगाने श्रीगुरुचरित्राचा सारांशहि यांत आला असल्याने स्त्रियादिकांना (ज्यांना गुरुचरित्र वाचण्याचा अधिकार नाहीं) याच्या वाचनानें श्रीगुरुचरित्रवाचनाचे फल अनायासें मिळेल. याच्या वाचनानें श्रीगुरुभक्तांनी ''श्रीगुरुप्रसाद'' प्राप्त करून घ्यावा अशी श्रीगुरुभक्तांना प्रार्थना आहे.

विजयादशमी १८७१
२०, नारायण, पुणे २.

श्रीगुरुभक्तांचा चरणसेवक,
**वामन दत्तात्रेय गुळवणी**

## ।।श्रीगुरुः शरणम् ।।

श्रीगुरुकृपेने आज 'श्रीगुरुप्रसाद' ग्रंथ पुनः प्रकाशित करण्याचा योग येत आहे. हा ग्रंथ प. पू. वामनरावजी गुळवणी महाराजांनी शके १८७१ मध्ये प्रकाशित केला. त्यापैकी एक प्रत माझ्या आईच्या नित्य वाचनात होती, ती मजकडे आहे. हा ग्रंथ स्त्रियांना वाचण्याचा अधिकार असून, याच्या वाचनाने श्रीगुरु चरित्र वाचनाचे फल मिळते असे खुद्द प. पू. गुळवणी महाराजांनी नमूद केले आहे.

हा ग्रंथ श्रीगुरुभक्तांना विनामुल्य मिळावा ही श्री स्वामींची इच्छा असल्याचे श्रीगुरुमहाराजांनी सांगितले आहे. त्यानुसारच पुनःप्रकाशन सुद्धा होत आहे ही गुरु प्रेरणाच होय. याच्या वाचनाने भक्तांनी 'श्रीगुरुप्रसाद' प्राप्त करून घ्यावा ही प्रार्थना.

या कामी काही गुरुसेवकांची प्रेरणा व सक्रीय उत्साही सहभाग मिळाला असून श्री रामभक्ताचे मुद्रणाचे कार्यात बहुमोल सहकार्य लाभले या सर्वांचे आभार न मानता त्यांना अखंड गुरुप्रसाद लाभो ही प्रार्थना.

महाशिवरात्री शके १९३४
१०-०३-२०१३ रविवार

श्रीगुरोःदासस्य दासस्यच
**दासदासः**

मुद्रक
चं. प्र. कुलकर्णी
अजित एंटरप्राईजेस
कोथरुड, पुणे - ३८.
मो. : ९८२२४३५०८०

अक्षरजुळणी
रचना टाईपसेटर्स, पुणे.

शुल्क
ऐच्छिक व एकदा वाचन करून
इतरांना वाचण्यास देणे.

. १ श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीमत् सद्गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।।
१ ॐ नामं नामं गुरोःपादौ स्मारं स्मारं महद्गुणान्। चरितं सद्गुरोर्दिव्यं वर्णयामि यथामति ।।१ ।। श्रीगुरुप्रसादपर। निमित्ताकरुनी शंकर। वक्ता वदविता श्रीगुरुवर। भक्तवत्सल परमात्मा ।।१ ।। ॐ नमोजी विघ्नहारका। सर्वसिद्धि प्रदायका। जय जया अंबाकुमारका। मंगलेशा श्रीगुरो ।।१ ।। जय जयाजी वक्रतुंडा। अज्ञानध्वांत मार्तंडा। भ्रमविसी शुंडादंडा। स्वभक्तविघ्नें हरावया ।।२ ।। त्वत्पदांबुजा जे सेविति। तयां विघ्नें न बाधती। ऐसी निगमागम वर्णिती। तव ख्याती मोरया ।।३ ।। दिव्य तव वदनारविंद। देखतां तोषती अमरवृंद। भाळीं कस्तुरी तिलक सुगंध। भ्रमर तळपती तत्सेवना ।।४ ।। पाशांकुश धरिसी करी। निर्दाळावया भक्तवैरी। कोटी सूर्यतेजापरी। तनुकांती ते विलसितसे ।।५ ।। शिरीं कुरळ केश कुंतळ। कर्णी जडित कुंडलें सोज्वळ। हिरेजडित मुगुट विमल। भास्वर विलसे त्वच्छिरीं ।।६ ।। पीत वसन परिधान। करीं मोदकपात्र सुवर्ण। दिव्यवर्ण मुक्ताभरण। तव कंठीं शोभतसे ।।७ ।। करुणासागर तूं गणेश। विधि हरिहरादि सुरेश। तुज वंदिती ते विश्वेश। स्वकार्यार्थ सर्वदा ।।८ ।। म्हणोनी दीन हा तव

अ. १
२

चरणीं। शरण येत जोडूनि पाणी। यातें सन्मति देउनी। गुरुप्रसादा वर्णवी ।।९।। तूं प्रसन्न जयाप्रति। तया दुर्मीळ काय जगतीं। मूढ होईल वाचस्पति। तव प्रसादें करूनियां ।।१०।। हा सद्गुरुचरणाचा किंकर। श्रीदत्तसूत शंकर। तव चरणाब्जीं ठेवी शिर। त्वप्रसाद इच्छा धरूनी ।।११।। तूं माऊली शरणांगताची। कामना पुरवी भक्ताची। सद्गुरुप्रसाद ग्रंथाची। वाट दावी या पामरा ।।१२।। वंदूं आतां सरस्वती। ब्रह्मादिक जियें स्तविती। जिचिया प्रसादें सन्मती। लाधले ते कविवर्य ।।१३।। सुवर्ण केतकी समप्रभा। जियेचे तनुवरी शोभा। विद्युल्लता जैसी नभा। स्वीय कांती देतसे ।।१४।। मुखांबुज चंद्रविमल। कुंदकलिकेसम रदन। वदतां दंतकांतीपूर्ण। दशदिशा प्रकाशती ।।१५।। विद्युत्प्राय शोभे वसन। कंचुकी ही स्वर्ण वर्ण। ल्यायिली दिव्याभरण। रत्नमंडीत भूषणे ।।१६।। हातीं नवरत्नांची कंकणे। तेसीच शोभतीं बाहुभूषणें। चरणीं नूपुरे झणझणें। विराजती अतिरम्य ।।१७।। ऐसी शारदामाउली। जी संतमहंतांची साउली। त्वत्पदीं माथा ठेवूनी ।। दीन भावें याचित ।।१८।। आदिमाते जगदंबिके। वीणा पुस्तकधारके। दीन भक्तप्रतिपालके। ये शरण मी तव पदीं ।।१९।। माते या स्ववत्स

अ. १
३

म्हणोनी। होई प्रसन्न तूं स्वामिनी। सदगुरु प्रसादवर्णनी। दे सन्मती झडकरी ।।२०।। तूं झालिया प्रसन्न। मग मज काय पडे न्यून। आश्रिता कल्पतरु कोण। राहे उपोषित अंबिके।। २१ ।। आतां नमूं कुलस्वामिनी। जी जगदंबा प्रवणस्वरूपिणी। ती तुळजापूरवासिनी। आदिमाया भगवती ।।२२।। आई महिषासुरमर्दिनी। येत शरण मी तव चरणीं। प्रसन्न वत्सा या होउनी। गुरुप्रसादा वर्णवी ।।२३।। भगवती नमितां तव चरण। प्रसन्न होसी भक्तांलागून। नोपेक्षिसी दीनालागून। सदयहृदये तूं माते ।।२४।। ऐसी मूळ माया नमून। स्मरे पांडुरंगचरण। जो भोळा जगज्जीवन। पंढरी वसे सर्वदा ।।२५।। जो द्वारकावासी श्रीहरी। दिंडिका काननामाझारी। कर ठेवुनी कटिवरी। भीमातीरीं तिष्ठत असे ।।२६।। नामसंकीर्तना भुलोनी। पुण्यक्षेत्रा विवर्जोनी। सप्रेम नृत्य करी भजनी। आल्हादोनी सर्वदा ।।२७।। जो रुक्मिणीचा दिव्यकांत। तो पांडुरंग आमुचे कुलदैवत। तच्चरणीं अनंत प्रणिपात। मंगलार्थ करितसे ।।२८।। आतां नमूं मुख्य दैवत। जें सकळ देवांचे दैवत। निर्गुण असतां सगुण होत। भक्तसंरक्षणाकारणे ।।२९।। जो परमात्मा चिन्मय। तो सद्गुरु अप्रमेय। तो यतिरूपें

गुरुवर्य। नमूं मंगलाकारणें।।३०।। होतां सद्गुरु प्रसन्न। बोलतां होय कीं पाषाण। मूढ ही वदेल ब्रह्मज्ञान। ऐसें सामर्थ्य कृपेचें।।३१।। जो निर्गुण निर्विकार। मनोवाचेसी विदूर। जया ध्याती योगीश्वर। प्राणायामें करूनिया।।३२।। विश्वविश्वात्मा जाणून। विश्व जड बुद्बुदसे देखून। सर्वभूतीं जगज्जीवन। सद्गुरुकृपें दिसतसे।।३३।। त्रयी जयातें वर्णिती। षड्दर्शने विवादती। तो होऊनी नृसिंहयती। कृष्णातीरीं वास करी।।३४।। प्रासाद अथवा आश्रम। कांही नसतां पुरुषोत्तम। सत् भक्तार्थ सप्रेम। घोर काननीं वसतसे।।३५।। जो त्रिगुणात्मा श्रीहरी। स्मरतांचि संकटे हरी। तो त्रिकाळ स्नान करी। कृष्णापंचगंगा संगमी।।३६।। जो वैकुंठवासी गोविंद। भक्तवत्सल सच्चिदानंद। तो यतिवेषें मुकुंद। औदुंबरी वास करी।।३७।। त्वत्पदांबुजा सेवूनी। त्वच्चरित्रलेखना लेखनी। घेत हातीं विमल मनीं। सिद्धिस नेई मत्कृती।।३८।। ऐसें सुरेश वंदूनी। नमी पूर्वजांचे चरणीं। उपनाम जया गुळवणी। आश्वलायन शाखा असे।।३९।। वसिष्ठ गोत्रोत्पन्न। नागेशशर्मा ब्राह्मण। नारायणस्वामीचा भक्त पूर्ण। तो माझा प्रपितामह।।४०।। तत्सुत नारायणशर्मा। स्वाश्रमोचित आचरोनी धर्मा। सद्गुरुकृपें



मंगलधामा। प्राप्त होय सन्मोक्ष।।४१।। तत्सुत दत्तात्रेय म्हणून। जन्म मत्तनूचा त्यापासून। तो परमदत्तभक्त पूर्ण। तात माझा पुण्यात्मा।।४२।। सदा दत्ता आराधित। ऐसा मत्तात भाग्यवंत। प्रति पौर्णिमेसि वाडीसी येत। दत्तदर्शनाकारणे।।४३।। तीन तपें सतत। नृसिंहवाडीची वारी करीत। चरण चालीं येत जात। तात पाद आमुचे।।४४।। सप्रेम स्मरुनि तच्चरण। नमावया मातृचरण। वळे लेखनी स्वयें होऊन। मातृवंश नमावया।।४५।। अत्रिगोत्रोत्पन्न। मारुती नामा ब्राह्मण। तो मातामह भाग्यवान। ग्रंथारंभी मी नमी।।४६।। त्याची कन्या माझी जननी। उमा नाम्नी प्रेमरूपिणी। हृदीं तत्पदीं भाळ ठेवुनी। प्रकृत पथीं वर्तत।।४७।। शिष्टसंप्रदायानुसरून। जैसी बुद्धि दे नारायण। तैसे करुनि मंगलाचरण। ग्रंथारंभा करीतसे।।४८।। ऐसें मंगलाचरण करून। संतचरणीं जाऊनि शरण। विनवी दीन तया लागून। तुम्ही थोर महंत।।४९।। पूर्ण कराल दीन आस। ऐसा माझा विश्वास। तुमचे चरणीं असे खास। तुम्हां ज्ञात काय नसें।।५०।। तुम्ही संतीं कृपा करणें। मत्कृतीतें साहाय होणें। तुम्ही हातीं धरल्याविणें। कांही न जाय शेवटा।।५१।। हे चित्तीं आणून। द्याजी मज अभयदान। तुम्ही अभय

अ. १
६

दिल्या जाण। काय अशक्य असे मज ।।५२।। संतमहंता नमूनी। त्यांचा आशीर्वाद घेऊनी। मग मी घेत हातीं लेखनी। गुरुप्रसादलेखना ।।५३।। श्रोतीं व्हावें सावधान। हें चरित्र वर्णनाकारण। सद्गुरु आज्ञा मज प्रमाण। ती कैसी परिसावी ।।५४।। नसतां मज काव्यव्युत्पत्ती। तैसीच कवित्व पद्धती। परि वारंवार होत स्फूर्ति। कवित्वाची ।।५५।। सर्वांतरव्यापी मद्गुरुवर। जाणून माझें अंतर। प्रसन्न वक्त्रें मजवर। कृपा करोनि बोलत ।।५६।। प्राकृत भाषे करून। करावी गुरुलीला वर्णन। परिसुगमभाषें मंडन। ओवीबद्ध असावें ।।५७।। भगवत् यशातें वर्णावें। तेणें जीवित सफल करावें। असत् पथें जावूं न देणें। लेखनासी ।।५८।। ऐसी सद्गुरु आज्ञा करिती मज। परि दुर्दैवें नोहे उमज। परि ये अवसरी सहज। होत स्मरण अंतरी ।।५९।। अस्तु कोणे एके अवतरीं। नृसिंहवाटिके माझारीं। असतां कृष्णातीर विहारी। दे चित्तातें चेतना ।।६०।। जो परमात्मा विश्वाधिष्ठान। तो प्रेरित मच्चित्ता लागून। मी तदाज्ञें करून। घेत हातीं लेखनी ।।६१।। सद्गुरुपदांबुजा स्मरून। घेतां हातीं लेखन साधन। सद्गुरुकृपें होत स्फुरण। दिव्य चरित्र अंतरी ।।६२।। तच्चरित्रस्मरणाकारण। परिसा तत्पूर्व कारण। एक समयी

अ. १
७

श्रीगुरुचरण। असतां नृसिंहवाडीसी ।।६३।। सायान्ह समय लक्षून। जावया संगमा आपण। तत्रस्थ परस्थ कांही जन। जात दर्शनार्थ संगमा ।।६४।। पौर्णिमा तसे तद्दिनीं। अस्ताचला जात वासरमणी। आरक्तवर्ण दिसे गगनी। कांती सहस्र किरणांची ।।६५।। आरक्त वस्त्र नेसली। अथवा कुंकमें भूषिली। कामिनीसी भासली। दिक् प्रतीची तेधवां ।।६६।। इकडे शीतकर उदित होत। तारका नभीं दृष्ट होत। मंदमंद समीर वाहत। हृदयाल्हाद तेधवा ।।६७।। सुसमय तो संध्याकाळिचा। चित्ता तोष देत सर्वांचा ।। मंदप्रकाश हिमकराचा। देत प्रमोद स्थिरचरा ।।६८।। निशा पातलीसे जाणून। स्वस्वढोलीत बसून। कित्येक पादपी बसून। मंजुळ शब्द करिती पक्षी ।।६९।। अस्तोदयाची ती वेळ। दक्षिण दिङ्मुख गंगाजल। उतावीळसे वाहे निर्मळ। पूर्वमुख व्हावया ।।७०।। ऐसीये सुंदर अवसरी। यतिराज कीं दुजा नरहरी। काषायवस्त्र घेऊनी करीं। वायू घेत स्वहस्तें ।।७१।। काषायांबर परिधानून। दंडकमंडलूतें घेऊन। कृष्णासंगमीं जावें म्हणून। निघती श्रीगुरु तेधवां ।।७२।। मंद मंद शब्दोच्चारित। दिगंबरा दिगंबरा वदत। भूमीवरी पद टाकित। पातले संगमीं तेधवां ।।७३।। कृष्णासंगमा देखून।

अ. १
८

सद्गुरुराज स्वयें आपण। साष्टांग करिती नमन। लोकशिक्षणार्थ तेधवां।।७४।। तीर्थें घेती ज्याचें दर्शन। त्या कासया धर्माचरण। परी लोकानुग्रहालागून। सद्वर्तनें वर्तती।।७५।। जनसंग्रहालागून। कमंडलू घेत भरून। दूरी हस्तपाद प्रक्षालून। येत गंगातीरासी।।७६।। पूर्वाभिमुख बैसून। करिती संध्यावंदन। इतरही तेव्हां द्विज जन। करिती संध्योपासना।।७७।। संध्या जाहलियावरी। यतिराज दंड घेऊनि करीं। सद्गुरु वंदना करी। स्वाश्रमायुक्त तेधवां।।७८।। सायान्हिका आटोपून। स्वासनीं बैसती गुरु आपण। सकळही द्विज करिती वंदन। श्रीगुरूतें तेधवां।।७९।। तत्कालीन सस्यें करून। षट्कुले मंडित दिसतीं जाण। त्रिपथीं वाहे गंगाजीवन। पूर्व पश्चिम दक्षिणेसी।।८०।। गोवत्सें क्षुधित होऊन। स्वशब्दें करिती मात्राव्हान। देती धेनु त्या प्रत्युत्तर। स्वीयशब्दे करूनीया।।८१।। ऐसीये शोभनकाळीं। स्वासनी विराजती यतिमौळी। सर्वजन त्यावेळीं। करिती वंदन गुरुवरा।।८२।। सुहास्य मुखें करून। विलोकिती द्विजगण। हस्तसंकेतें करून। सुचविती बैसावया।।८३।। गुर्वाज्ञें करून। सर्वीं स्वीकारलें स्वस्वासन। श्रीगुरु नित्यपाठ करून। सप्रेम सर्वां विलोकिती।।८४।। सर्वां बैसण्या

अ. १
९

आज्ञा करून। आपण करद्वय जोडून। स्वमुखें करिती ईशस्तवन। नित्य पाठा तत्क्षणीं।।८५।। तो ऐसीये सुवेळी। तत्रस्थ अर्चक एक तपोबळी। येत सद्गुरुजवळी। जोडूनियां करद्वय।।८६।। विश्वव्यापक गुरुमर्ती। द्विजाशया जाणती। परी नेणो ऐसें विचारिती। म्हणती चातुर्य यालागीं।।८७।। सुहास्य मुखें गुरुमूर्ती। तयां कां उभे बसा म्हणती। परी तो पूजक साध्वसचित्ती। तैसाचि उभा राहे पुढें।।८८।। पुनरपि ते यतिराज। म्हणती कां द्विजराय। उभे राहूनी याचिता काय। आम्हा भिक्षुवर्गाकडे।।८९।। सर्व संग परित्ययक्त। विषयीं जाऊं न देणें चित्त। वमनापरी सर्ववस्त। हाच मुख्य यतिधर्म।।९०।। अहो दारिद्र्याकडे याचणें। आत्मतेज हारपविणें। जेंवि शिवरात्र करी मागणें। एकादशीतें।।९१।। तैसे आम्ही संन्यासी। काय मागतां आम्हांपासीं। तुम्हा परीस असतां वशी। काय उणें या लोकीं।।९२।। कामधेनू असतां घरीं। तक्र मागावें कां घरोघरी। स्वाधीन असतां नरहरी। फली करावी आस कां।।९३।। अनंत जन्मींचे पुण्यें करून। कल्पद्रुम लाधला तुम्हां जाण। तया कोण हें नेणोन। कां भिक्षा मागतां।।९४।। चिंतामणी असतां घरीं। कां हिंडावे द्वारोद्वारी। नाभींची नेणोनि कस्तुरी। फिरत काननीं हरिण।।९५।।

अहो जो पयोब्धिजामात। जो द्वारकेसि राहे रुक्मिणींकांत। तो कृष्णातीरी एकांत। पूर्वजें तुमचे आणिला।।९६।। क्षीराब्धीतीरा बसून। कां करावे कदन्न भोजन। श्रीगुरु कल्पतरुपूर्ण। भाग्यें तुम्हां लाधला।।९७।। अहो हा भक्तवेडा श्रीहरी। शुभाशुभा न विचारी। भक्तकन्या ते सुखकरी। गुदप्रक्षालन[१] करूनिया।।९८।। ऐसा परमात्मा असतां वश। काय मागतां आम्हास। जो भीक मागे निर्वाहास। तो अन्या काय दे।।९९।। जो विश्वात्मा विश्वसाक्षी। जो समत्वें सर्वां निरिक्षी। स्वभक्ता वाहतसे कक्षी। तो काय तुम्हां उपेक्षी।।१००।। तथापीही तुमचें मन। काय कांक्षी तें आम्हांलागून। न लाजतां सांगा बसून। बसा बसा आधीं तुम्ही।।१।। अमृतसार सुरस। वचन श्रीचें तें सुरस। परिसतां होय हरुष। द्विजमानसीं अनुपम।।२।। नम्रभावें जोडूनी कर। यथाधिकार श्रीसमोर। बैसत तो द्विजवर। सद्गुरु आज्ञे करुनियां।।३।। पुनरपि सद्गुरु तया वदती। काय इच्छा वसत चित्तीं। न धरतां भय चित्तीं। बोला सत्वर आम्हासीं।।४।। ब्राह्मण म्हणे श्रीगुरुसी। इच्छा कांही न मानसी। परी एक संशय मानसी। श्रीसी पुसण्या भीति

१. नारायणस्वामी गृहस्थाश्रमांत असतांना घडलेली हकिकत.



वाटते।।५।। यतिराज म्हणती तयासी। काय म्हणावें तुम्हासीं। बोला बोला हो त्वरेसी। विलंब कासया करितसां।।६।। ऐसें श्रीचें तें करुण भाषण। परिसून द्विजराज आपण। स्नेहें सद्गद होऊन। कथील पुढील अध्यायीं।।७।। तो विषय परम सुरस। श्रोतीं परिसावा सावकाश। गुरुभक्त संवाद सुरस। इच्छित श्रोतीया देईल।।८।। स्वस्ति श्रीगुरुप्रसादग्रंथ। वक्ता वदविता श्रीगुरुनाथ। लाधती चारी पुरुषार्थ। भावें पठतां भाविका।।९।। भैरव वरदा श्रीयतिवरा। कृष्णासंगम संविहारा। दत्तात्रेया दिगंबरा। अखंड भजन देई तुझे।।१०।। चातुर्य नसतां कवित्वाचें। तव चरित वर्णित साचे। रक्षी ब्रीद पवित्र वाचें। करी इतुकीच विनंती।।११।। त्वत्कृपावलोकनें करून। चिंतामणी होय पाषाण। आस ऐसी धरून। प्रकृतपथें वर्ते मी।।१२।। त्वद्भक्त परम उदारु। श्रीवासुदेवानन्द सरस्वती सद्गुरु। तदाज्ञें हा पामरु। घेत लेखनी लेखना।।१३।। संतचरणाचा किंकर। श्री दत्तसूत हा शंकर। विनवी श्रोतया जोडूनी कर।। करा दास हा पवित्र।।१४।। इति श्रीगुरुप्रसादग्रंथे प्रथमोध्याय:। हरये नम:।। श्रीगुरुदेवदत्त।। श्रीकृष्णार्पणमस्तु।। ओवी११४।।

श्रीगणेशाय नम:ॐ जय जयाजी सद्गुरु। निर्गुण तू निर्विकारु। नच तुमसम अन्य उदारु। लोकत्रयीं निश्चित ।।१।। अनंत संतमहंत जाहले। ते तवानुग्रहेंचि तरले। हें निश्चित जाणूनी धरिलें। तव चरण मी अंतरी ।।२।। तूंचि कारुण्याचा सागरु। अनंत सुखाचा आगरु। म्हणोनि हा शंकर पामरु। अनन्य शरण त्वत्पदीं ।।३।। प्रभो हा दीन हातीं धरून। वर्णवी स्वचरित्र याचेकडून। करद्वय जोडून। हेंचि मागत तव पदा ।।४।। तूं प्रसन्न जाहलीयावरी। दुर्लभ कांही न भूवरी। ऐसा विश्वास तुजवरी। असे जी मम गुरुवर्या ।।५।। ऐसें यथामति सद्गुरु स्तवोनि। चरित्र लेखना लागोनि। घेत हातीं लेखनी। सद्गुरुचरण स्मरूनियां ।।६।। दयार्द्र माझा सद्गुरु। त्यासम मज नान्य थोरु। ऐसा धरूनि निर्धारू। प्रकृतपथीं वर्तत ।।७।। श्रोती व्हा जी सावधान। संगमीं करूनी संध्यावंदन। बैसले असतां तत्रस्थ ब्राह्मण। नमी सद्भावें श्रीपदा ।।८।। तया काय इच्छा म्हणून। विचारीत सद्गुरु आपण। भीती अंतरीं त्यजून। वदा काय तें सत्वर ।।९।। ऐसें विचारितां गुरुमूर्ती। ब्राह्मण तो तुष्ट होत चित्तीं। कर जोडूनि श्रीप्रति। नम्रभावें बोलत ।।१०।। म्हणे जी स्वामी गुरुनाथा। काल दिसे दुर्धर सर्वथा। पूर्वजांच्या सोडूनि सत्पथा। असन्मार्ग सर्वा प्रिय ।।११।। कवण्यापरी वर्तावें। कां गृह त्यजोनि काननीं



जावें। ऐसीये समयीं काय करावें। हें न सुचे जी गुरुवरा ।।१२।। या कलियुगा माझारीं। नामसंकीर्तनाची थोरी। म्हणोनि ब्राह्मण ही करीं। टाळ घेऊनि नाचती ।।१३।। नाहीं स्नानसंध्योपासन। न मुखें वेदमंत्रपठण। नच गृहीं देवतार्चन। वैश्वदेव तो दूरची ।।१४।। नाहीं तर्पण ब्रह्मयज्ञ। करणाऱ्या म्हणती अज्ञ। सुधारक म्हणविती दुष्प्रज्ञ। तुळसी माळा घालूनिया ।।१५।। हव्य नाहीं कव्य नाहीं। शास्त्रसंस्कारा थारा नाहीं। सौभाग्यव्रतें सर्वही। दूरदेशी पळालीं ।।१६।। शास्त्रीय विभूति दूषिती। गोपिचंदना देत महती। व्याघ्रापरि पट्टे रेखिती। नटवत् नटती सर्वदा ।।१७।। पताका घेऊनि नाचती। द्विज ही शूद्रपाय धरिती। परस्पर उच्छिष्ट भक्षिती। बैसोनिया आपणीं ।।१८।। ज्ञानवल्ली घेऊनि हातीं। उदक घालूनि ती मळती। विठ्ठल विठ्ठल मुखें म्हणती। मैंदरूपीं संत हे ।।१९।। वेदवेत्यातें दूषिती। भारवाहक तया म्हणती। देशा आणिली विपत्ती। म्हणती त्या हे मूढजन ।।२०।। तैलेंचि शास्त्रकारा निंदिती। परस्परे वाद करिती। भिन्न मतें स्थापिती। नच मेळ एकमेकातें ।।२१।। पर्णांबुवात भक्षुनि ।। गिरिकंदरीं बसूनी। धर्मशास्त्रे केलीं ज्यानीं। त्यांते मूढ म्हणती हे ।।२२।। शिरोभागी शिखा नाहीं। क्षौर करिती प्रत्यही। कित्येक पंडित ते पाहीं। करिती क्षौर स्वहस्ते ।।२३।। महाराज काय वर्णावी

अ. २
१४

कलिस्थिती। सकलसौभाग्या ज्या म्हणवीती। त्याही कैशा असत् पथीं। वर्तू लागल्या स्वामिया ।।२४।। पूर्वी जयाचें नाम न घेती। ते शस्त्र आले सौभाग्य पेटीं। कुंकुम न दिसे अन्याप्रति। दुर्भिणीवांचून सर्वथा ।।२५।। तेव्हा इतुकीच विनंती चरणीं। काय करावें या ब्राह्मण जनीं। सर्वत्र काळ ऐसा मेदिनी। जावया थारा कोठें नसे ।।२६।। परिसुनि अर्चक भाषण। यतिमुखा पाहति सर्वजन। काय देतील या ते वचन। परिसावया तत्क्षणी ।।२७।। यतिराज म्हणती द्विजवरा। कांसया लोकपंचायति करा। तुम्हां इष्ट तें तुम्ही करा। लाभ कोण येणेंगुणें ।।२८।। कली प्रवर्तला प्रबळ। धर्माकडे न पाहती भूपाळ। उदरनिर्वाहाकडे सकळ। लोक दक्ष जाहले ।।२९।। इतुकीये अवसरी। सायंपूजक मंडपाभीतरीं। येऊनि बैसतां पाटावरी। होत नामाची गर्जना ।।३०।। आधींच तो पौर्णिमेचा दिन। श्रीदर्शनालागून। आले असंख्य भक्तजन। प्रेमभावें तद्दिनी।।३१।। काय त्या समयींचा थाट। भक्तजनें धरला घाट। कित्येक जात येती सुसाट। दत्त दत्त म्हणूनिया ।।३२।। श्रीगुरुदेवदत्त म्हणून। कित्येक घालिती लोटांगण। दत्तदत्त म्हणून। प्रेमें करिती नर्तन ।।३३।। आसमंतीं चहूकडे। रिता ठाव दृष्टी न पडे। कित्येक ते पिसे वेडे। स्तंभा कवळुनि नाचती ।।३४।। दीपप्रकाशें ते वेळा। दशदिशा उज्वलीत जाहल्या।

अ. २
१५

नच थारा कोठें उरला। अंधकारा ते समई ।।३५।। इतुक्यांत धूपपात्रीं कृशानु। आणून ठेविला ब्राह्मणू। पूजकें धूप घेऊन। समर्पित अग्नीवरी ।।३६।। धूप अर्पितां अग्नीवरी। पार्वतीपते हर हरी। म्हणूनियां उच्च स्वरीं। करिती एकचि गर्जना ।।३७।। उच्च स्वरींचा तो नामध्वनी। जात गगनातें भेदुनी। तो साहजीक संगमस्थानीं। श्रीनीं गजर ऐकिला ।।३८।। परिसतां ऐसा नामघोष। कोण न हर्षे मानुष। तुर्या स्थित ते परमहंस। ब्रह्मानंदे डुल्लतं ।।३९।। भगवत्प्रेमें स्फुंदत। मुखें दत्तदत्त ऐसें गर्जत। रोमांत देही उद्भवत। प्रेमाश्रू नेत्रीं टाकिती ।।४०।। वारंवार तो नामघोष। परिसतां अती हर्षे मानस। संतुष्ट मानसें करिती घोष। दत्तदत्त म्हणूनिया ।।४१।। भगवत्प्रेमापुढें कांहीं। देहभान राहिलें नाहीं। ती स्थिती अवलोकिली जिहीं। धन्य धन्य ते गुरुभक्त।।४२।। दत्तदत्त मुखें म्हणत। जोडूनिया दोनी हस्त। वारंवार उठत बैसत। ब्रह्मानंदे तेधवां ।।४३।। ब्रह्मानंदी लागली टाळी। कोण देहातें सांभाळी। ही प्रतीती तत्रस्थानीं। महद्भाग्यें देखिली ।।४४।। प्रयत्नें सर्व कांही मिळत। परी दुर्लभ लोकीं शुद्ध संत। त्यामाजी जेधवां नाचत। स्वानंदसागरीं डुबूनियां ।।४५।। भगवद्भक्तीचें प्रेम। जाणती भगवद्भक्त उत्तम। नेत राहो यते सुगम। धेनुवत्स प्रेमापरी ।।४६।। संत अंतरीचि स्थिती। एक संतचि जाणती।

अ. २
१६

मूढमति पामरे ती। काय करणार वर्णन ।।४७।। सिंहावलोकनें करून। घ्यावें श्रोतीं मागें अवधान। देवासन्निध होत गर्जन। दत्तानामाचें तेधवां ।।४८।। त्या नामघोषें करून। हरपलें श्रीचें देहभान। मग इतर समाजा कोण। पुसे तेधवां संगमीं ।।४९।। श्रीची ती स्थिती पाहून। हस्त टाळ्या पिटून। सर्वही दत्तदत्त म्हणून। सप्रेम नाचती तेधवा ।।५०।। देवा सन्निधीचा घोष। समीपही तोच नामघोष। परिसूनि श्रीचें मानस। देहभाना विसरलें ।।५१।। अंतरीं ज्ञानाचा प्रकाश। बाहेरही नामघोष सुरस। या दोहीं यति मानस। तल्लीन होत अंतरीं ।।५२।। साधु साधुरे भैरवा। म्हणून नाचत तेधवां। जो गोकुळीं वाजवी पावा। त्या कैसा मोहिलासी ।।५३।। व्रजप्रेमार्थ गोकुळांत। गौळणीपुढें पसरी हात। दे नवनीत ऐसें वदत। जें कृष्णाख्य परब्रह्म ।।५४।। जें निर्गुण निर्विकार। मनोवाणीतेंही विदूर। तैं यतिवेषे कृष्णातीर त्वप्रेमें तिष्ठतसे ।।५५।। जो देवाचा परमदेव। तो परमात्मा सदाशीव। जाणून भैरवा त्वद्भाव। कृष्णासंगमीं वास करी ।।५६।। कश्यपादि ऋषीजन। इंद्रादिक अमरगण। शोधिती जयाचे चरण। भैरवाधीन सद्गुरु तो ।।५७।। नारदतुंबरु जया गाती। सनकादि जया ध्याती। तो नरसिंहसरस्वती। कृष्णासंगमी वास करी ।।५८।। जे विश्वव्यापी निर्विकार। जे पराहूनिही पर। ते यतिवेषा घेऊनि सुंदर।

अ. २
१७

कृष्णातटीं वास करी ।।५९।। ऐसीया प्रेमभरांत। हरिलीला मुखें वर्णित। परी वृत्ती बाहेर न येत। अंतर्मुख जाहली जी ।।६०।। पुनश्च दत्तदत्त म्हणत। करवस्त्रें अश्रु पुसत। देहधर्म शुष्क करीत। परि स्थान न सोडी प्रेम तें ।।६१।। पुनश्च सद्गदीत होऊनी। करद्वयातें जोडूनी। अर्ध नेत्र उघडोनी। इतस्ततः विलोकिती ।।६२।। दृष्टी जातां देवाकडे। हात करूनि देवाकडे। म्हणती भगवन् हे काय कोडें। भक्तरक्षणाचें तुज ।।६३।। श्रोते हो विचारा अंतरीं। काय ही प्रेमाची झरी। काय काय न करी। भगवत्प्रेम ।।६४।। ज्ञानीया भक्ति नको म्हणती। शास्त्रविचारें ज्ञानप्राप्ती। कां उगीच बडबड ती। भक्ति भक्ति म्हणोनिया ।।६५।। भक्तिप्रेमावांचून। ज्ञान नको आम्हांलागून। ऐसें अनेक भक्तजन। प्रेमभावें बोलिये ।।६६। दिव्य वस्त्रें अनुपम। ल्यायिली अलंकार उत्तम। परी भाळी नसतां कुंकुम। मुख कोणी न पाहती ।।६७।। चार वेद पाठ येती। षड्दर्शने जया सेविती। परि विनय नसे जया चित्तीं। त्या न होतीं तीं भूषणें ।।६८। आतां असो हें बहु भाषण। भक्ति हेंच परम भूषण। भस्ममाळा न मंडण। देत शोभा न ज्ञानिया ।।६९।। शास्त्रें षोडश वर्णिल्या वृत्ती। चतुर्दश वृत्ती ज्ञानी जिंकिती। भक्तिश्रद्धा दोन वृत्ती। ज्ञानिया जिंकती निश्चयें ।।७०।। देहभान विसरत। परि भगवन्नाम जिव्हा घेत। नेत्रेही

अ. २ १८

अश्रु ढाळित। भगवल्लीला परिसतां ।।७१।। ऐसी जी ज्ञानियाची स्थिती। क्वचित् सद्भक्त ते पावती। तियें तेंच मुनिवर्य म्हणती। ज्ञानोत्तरा भक्ति असे ।।७२।। घ्यावें जी मागें अवधान।। कृष्णासंगमी सद्गुरु आपण। कोणी न पुसतां भाषण। करिती यतिराज आपण ।।७३।। भगवत् गुणानुवादश्रवण। होतां ये त्या सहज स्फुरण। शुचिस्थानी विमलार्चन। देखतां होय ऐसी स्थिती ।।७४।। भगवद्भक्ताची अंत:स्थिती। संतमहंतचि जाणती। अथवा जाणत श्रीपती। मत्सदृशा नाधिकार ।।७५।। अस्तु श्रीगुरुपदा स्मरून। प्रकृतपथें करावें गमन। ऐसें अंतरीं चिंतून। प्रकृत मार्ग अवलंबी ।।७६।। इकडे श्रीसन्निध घाटावरी। शिबिकोत्सव नित्यापरी। करिती तत्रस्थ बरव्या परी। आंदोळिकीं मूर्ती स्थापूनियां ।।७७।। छत्रचामरे ढाळित। मुखें दत्तनाम गर्जत। अत्युत्सवें प्रदक्षिणा करीत। मंदिराभोवतीं आनंदें ।।७८।। तें जाणून अंतरीं। श्रीगुरु येत देहावरी। दंडकमंडलू घेऊनि करीं। येत सद्गुरुदर्शना ।।७९।। सांगातीचेही भक्तजन। येत सद्गुरुपद लक्षून। श्रीसन्निध येऊन। शिबिकोत्सवा विलोकिती ।।८०।। श्रीसद्गुरूचा शिबिकोत्सव। नये वर्णनातें वैभव। जे तें विलोकिती सदैव। भाग्यवंत निश्चयें ।।८१।। शिबिकोत्सव जाहलियावरी। वेदमंत्रें पुष्पें करीं। श्रीसी अर्पिती द्विजवरी। स्वारी निघे तेथूनिया ।।८२।। काय त्या

अ. २ १९

समयाची शोभा। अर्चक अवलंबीत श्रीगुरुराजा। वस्त्रालंकार सुमनप्रभा। नये वर्णना शेषासही ।।८३।। अर्चक करीं बैसुनिया। श्रीगुरु जात शयनालया। भक्तजन पडती पाया। श्रीगुरुचरणीं तेधवा ।।८४।। श्रीयतिराज प्रेमभरांत। ब्रह्मानंद मठी येत। भक्तजना आज्ञापित। जावें आतां स्वगेहासी ।।८५।। आज्ञापितां श्रीगुरुमूर्ती। सर्व आपापले गृही जाती। श्रीगुरुमहाराज शयन करिती। दत्तदत्त म्हणोनिया ।।८६।। द्वितीय दिनीं प्रभातीं। भक्तजन एकत्र होती। नैशवृत्तां करिती। आश्चर्यचकित होऊनिया ।।८७।। आपापणीं सर्व वदती। काय हो रात्रीची ती स्थिती। भैरव भैरव मुखें म्हणती। किमर्थ म्हणूनि गुरुवर ।।८८।। ऐसें परस्परें वदती। परी आदिकारण कोणी नेणती। परी शेवटीं ठरविती। जावें संगमीं सायान्हीं ।।८९।। ऐसा विचार करून। जात आपआपुल्या गृहालागून। पुनः होतांचि सायान्ह। येत सर्वही संगमा ।।९०।। सद्गुरुही त्या वेळीं। जात संगमस्थानाजळीं। इतरही भक्त त्या स्थळीं। येत श्रीचें दर्शना ।।९१।। हस्तपाद प्रक्षालुनी। संध्योपासना सारुनी। गुरुवंदनादि करुनी। स्वासनीं बैसती गुरुवर ।।९२।। इतुकीये अवसरी। जो पूर्व दिनीं विनंती करी। तोच श्रीसी प्रार्थना करी। करद्वय

जोडोनिया ।।९३।। देखुनी अग्री तो अर्चक। यतिराज ते हास्यमुख होवूनी वदती त्या

सम्यक। व्हा आसनस्थ म्हणूनिया ।।९४।। गुरु आज्ञें करून। स्वीकारूनिया स्वासन।
पूर्वदिना अनुलक्षून। श्रीपदीं विनंती करी ।।९५।। परिसून अर्चक भाषण। श्रीगुरु वदती
तुष्ट मन। किमर्थ वृथा तुषणेषण। सत्ता नसतां आपणा ।।९६।। अधि हा कलियुग।
सत्पथा म्हणती ढोंग। दांभीक पूजिती यथासांग। करिती ऐसा काल हा ।।९७।। शुद्धमार्गे
जे वर्तती। सर्व त्याचा द्वेष करिती। होतसे अशी फटफजीती। पदोपदीं तयाची ।।९८।।
कोणत्याही विषयासी। मुख्य राजाश्रय तयासी। जो न मान्य भूपासी। कोण लोकीं
त्या त्राता ।।९९।। असें हे अंतरीं जाणून। कोणा कांहीं न कीजे भाषण। शुद्धमार्गें
वर्तन। कीजे आपण सर्वथा ।।१००।। सत्ता नसतां स्वहस्तीं। वदे तया विक्षिप्त म्हणती।
हें धरूनिया स्वचित्ती। वर्तणें हेंचि युक्त सदा ।।१।। पुनश्च सद्गद होऊनी। वदती सद्गुरु
त्यालागोनी। विप्र हो विचारा निज मनीं। अधर्मे व्यापिली सर्व मही ।।२।। जी वस्तु
कलिप्रिय। तीच सर्वां होत प्रिय। म्हणोनि हें अधर्ममय। जाहले जन अवघे हे ।।३।।
म्हणून तैसें आपण। वर्तावें हें जाणून। सर्व कष्टातें साहून। शास्त्रपथें वर्तावें ।।४।।
शास्त्रविधी सोडून। जे वर्तती कामकारण। नच सिद्धि त्यां मिळे जाण। न सौख्य न
परगती ।।५।। शास्त्रानुज्ञेप्रमाणें। सुज्ञें सर्वथा वर्तणें। नृजन्मसार्थक होय तेणें। हें अंतरी



अवधारा ।।६।। हेंचि निजगुज भगवंते। संग्रामसमयीं अर्जुनातें। कथिलें तेणें तच्चित्तातें।
येत शांती सत्वर ।।७।। अतएव सर्व त्रास साहोनी। कलिकाल हें जाणोनी। दुस्तर्कवादा
त्यजोनी। सन्मार्गे वर्तणें सर्वदा ।।८।। कोणी काय वदो जाण। प्रत्युत्तर न दीजे त्यालागून।
तितिक्षेचा आश्रय करून। स्वात्मचिंतन करावें ।।९।। लोक निंदिता आपणासी। आपण
न निंदिजे तयासी। सर्व सहन करावें ऐसीं। सुदृढ बुद्धी धरावी ।।१०।। नामस्मरणाचें
फळ। बहुत संतां मान्य विमल। परी धर्मा त्यागोनि केवळ। नच भजना आदरीलें ।।११।।
''नामसंकीर्तन साधन हें सोपें। जळतील पापें जन्मांतरीचीं''। ऐसें तुकाराम बोलला।
परि सम्यक उपसर्ग लाविला। याचा विचार कीजे वाहिला। ना तरी व्यर्थ बडबड ।।१२।।
श्रुतीचे प्रत्येक अक्षराशी। नामोच्चारण फळ विशेषी। महर्षी वर्णिले तयासी। नव्हे काय
ज्ञान तया ।।१३।। नामापराधादश। ऐसें पद्मपुराणीं व्यास। बोलिले तयाचा सम्यक।
विवेक कीजे अंतरी ।।१४।। अजामीलो आख्यानीं। ''प्रायश्चित्तं विमर्शनम्'' ऐसें
शुकाचार्य वाणी। तत्संगती विचारूनी। अंतरीं ठरवावा निश्चय ।।१५।। वर्णाश्रम त्यजून
कर्म। मुखें बडबडती रामराम। ते ईशद्वेष्टे होती परम। विष्णुपुराणीं प्रसिद्ध हें ।।१६।।
प्रथम स्ववर्णोचित क्रिया। करूनि मना नेईजे विलया। ऐसें रामगीतेमाजी सौमित्रेया।

कथिलें रामरायानें ।।१७।। जया स्वहिताची आस। त्यानें साहीजे जनत्रास। सेविजे स्वधर्मचि खास। ऐसें पार्था कथी श्रीकृष्ण ।।१८।। अतएव सर्व वर्णाश्रमीं जाण। स्वधर्मानुष्ठान आद्य साधन। तदाचरणें चातुर्वर्ण। श्रेय पावले पावती ।।१९।। कितीही आपणा निंदिलें। उसनें फेडूं नये वहिलें। हेंचि श्रुतिशास्त्रीं कथिले। उद्धारावया मानवां ।।२०।। नाम श्रेष्ठ सर्वी वर्णिलें। परिस्वधर्मा नच त्यागिलें। वैदिक धर्मेंचि ते तरले। याचाही विवेक करावा ।।२१।। आतां जे वैदिक कर्मा अनधिकारी। त्यांही राम कृष्ण हरी। कीजे भजन प्रहर चारी। प्रेमभावें करूनिया ।।२२।। ब्राह्मणेंही रित्या काळीं। घेई जें नाम वेळोवेळीं। आळवावा वनमाळी। प्रेमभरें करूनिया ।।२३।। ब्राह्मणेंही फावले वेळीं। अंतरीं आठवावा वनमाळी। हें नाम नियत वेळीं। घ्यावें ऐसें शास्त्र नसे ।।२४।। याच उद्देशें वामनपंडित। अहो येतां जातां हें पद्य वदत। सारांश नामोच्चारण वृथा न जात। हेंचि सर्वां संमत ।।२५।। अथवा तुमचे मतें ब्राह्मण। धर्म सोडूनि करिती भजन। करिती ते पावन। नाम भजनें होतील कीं ।।२६।। एतद्विषयीं पाल्हाळ सोडून। मुख्य तत्त्व घ्यावें आपण। चर्म तंतु वाद्या घेऊन। ग्राम्य गीत जे गातीं ।।२७।। त्याहूनि हे अधुनिक संत। आम्हां दिसती पसंत। कैसे तरी हरीनाम गात। बहुकाळें तरतील ।।२८।।



मुख्य सारांश इतुका। स्वधर्म हीच दिव्यनौका। श्रीगुरु कर्णधारका। अनुकूल वात श्रीहरी ।।२९।। अगणित या नौकेंकरून। तरले संत महंत जन। महापापीही जाहले पावन। सकल तरले सद्धर्मेंची ।।३०।। अनादि कालापासोनी। स्वधर्माचरण सर्व वर्णी। श्रेष्ठ ठरविलें मुनिवर्यांनी। जे वेदत्रया संमत ।।३१।। त्रयी धर्मसदा फलः। ऐसें युधिष्ठर बोलिला। यक्षेंही तो मान्य केला। वनपर्वांभीतरीं ।।३२।। शास्त्रोक्त कर्म आचरोन। संतुष्ट असो द्यावें मन। सर्वत्र सम दृष्टी ठेवून। अंतरी भजावे ईश्वरा ।।३३।। हें भाषण बोलण्या सुगम। परि आचरण्या दुर्घट परम। कृपा करील जरी घनश्याम। तरीच सुलभ होय हें ।।३४।। अगाध धर्माचें फल। धर्म हाच ईश्वर केवळ। न त्या कदां काळवेळ। अहर्निश सेवावा ।।३५।। नळभूपा कलीनें पीडिलें। राज्य हरुनि कानना धाडिलें। परि त्यानें धर्मा न सोडिलें। म्हणून जाहला पुण्यश्लोक। ३६।। कौरवीं कूट द्यूतें करून। धर्मराज्य घेतलें हिरोन। द्वादशाब्द काननीं फिरून। अज्ञातवासही कंठिला ।।३७।। परी तो धर्मात्मा धर्मराज। राज्यादिकाची त्यजून काज। स्वधर्माचरणें करून। पुण्यश्लोक जाहला ।।३८।। प्रल्हाद पौत्रबली। दानें ख्याती करीत आगळी। सर्वस्व वामना अर्पूनी। केला ईश्वर द्वारपाळ ।।३९।। ऐसे अनेक भक्तजन। स्वधर्माचरणें करून। गेले वैकुंठा

उद्धरोन। नच गणती तयासी ।।४०।। तैसाचि कोणी महानुभाव। नाम तयाचें भैरव[1]। स्वधर्मे वश केला देव। श्रीनृसिंह सरस्वती ।।४१।। तयाचें स्मरण जाहले अंतरी। तेंचि वाचीं आणिलें श्रीहरी। इतुकें बोलूनियां करीं। घेत दंडकमंडलू ।।४२।। उठिले श्रीगुरु देखूनी। विनवी अर्चक कर जोडूनी। कोण भैरव तो कृपा करोनी। कथानक सांगावें ।।४३।। ऐसें अर्चकें विनवितां। श्रीगुरु म्हणती चला आतां। यथावकाशें तत्त्वता। सांगू तुम्हां किंचित ।।४४।। ऐसें वदती गुरु। अर्चक विनवी जोडूनी करु। हें चरित्र ऐकण्या हा पामरु। जरी अधिकारी असेल ।।४५।। तरी कृपा करोनि दीनावरी। वर्णावें चरित्र हें सविस्तरी। पडूं दे कर्णामाझारीं। पामरांच्या स्वामिया ।।४६।। ऐकूनिया विप्रवचन। हास्य मुखे करून। वदती त्या गुरुराज आपण। कथूं उदईक त्या वृत्ता ।।४७।। निशीथ समय जाहला। सर्वी जावें स्वस्थळा। यथावकाशें श्रीचरित्राला। कथूं तुम्हा जा आतां ।।४८।। श्रीआज्ञा शिरसा वंदून। सर्व ही जात गेहालागून। दुसरे दिनीं होता सायान्ह। संगमस्थानीं पातले ।।४९।। सायंसंध्यादि करून श्रीगुरुचरणा करून वंदन। चरित्र श्रवणोत्सुक होऊन। श्रीसान्निध बैसती ।।५०।। त्याची उत्सुकता विलोकून।

१ वाडीच्या पुजाऱ्यांचा मूळ पुरुष



श्रीचरित्र परमपावन। कथितील तयालांगून। पुढिले अध्यायीं श्रीगुरु ।।५१।। अत्यंत दिव्य सच्चरित्र। श्रोत्यावक्त्यासही पवित्र। करील तें सत्पात्र। करील या आशें लिहित मी ।।५२।। अभिमान शब्द प्रसंगानुसार। येत लेखनीं वारंवार। तो संतीं घालवीजे दूर। हीच विनंती सत्पदीं ।।५३।। स्वस्ति श्रीगुरुप्रसाद ग्रंथ। वक्ता वदविता श्रीगुरुनाथ। करुनी शंकरा निमित्त। वदवित तो दयानिधी ।।५४।। मंगलनिधाना गुरुवरा। संतजनांच्या माहेरा। प्रार्थी त्वत्पदीं जोडूनि करा। कीं पुढील चरित्र वर्णवी ।।५५।। अज्ञ दास हा पामर। याचे शिरीं ठेवूनि कर। यातें आपुलासा कर। हीच पायां विनंती ।।५६।। जे त्वत्पदा शरण गेले। ते सर्व भवाब्धी तरले। याच आशें मन माझें रमलें। त्वत्पदीं सर्वदा ।।५७।। संतचरणा किंकर। श्रीदत्तसूत शंकर। विनवी सदैव जोडूनि कर। गुरुप्रसाद परिसावया ।।५८।। इति श्रीगुरुप्रसाद ग्रंथे द्वितीयोध्याय हा। श्रीगुरुदेव दत्त ।।ओवी१५८।।

श्रीगणेशायनम: ॐ सकल मंगलाचें निधान। सद्गुरु माझा कृपाघन। अंतरीं वंदून तच्चरण। घेत हातीं मी लेखनी ।।१।। भावें करितां सद्गुरुस्मरण। सर्व होत निवारण। ऐसा श्रीगुरु गुणनिधान। कृष्णातीरनिवासी जो ।।२।। सद्गुरुसारिखा असतां पाठिराखा। मग इतराची लेखा। कोण करी ।।३।। ऐसें बोलिले ज्ञानराज। तें चिंतून गुरुचरणरज। त्यजून सर्व चिंता आज। होत सादर लेखना ।।४।। कृपासिंधू सद्गुरु। ठेवून मच्छिरीं प्रसाद करु। सांगे अंतरी चिंता न करुं। म्हणूनीया पामरा ।।५।। ईशप्रसादावांचून। एकही शब्द मुखांतून। न निघे ऐसें वचन। बोलिलासे पाणिनी ।।६।। हें विदित सूज्ञां असे। मग अंतरीं साध्वस कायसें। ऐसें जाणून मानसें। प्रकृत तेथें वर्ते मी ।।७।। मागील अध्यायीं पूजकें। विनंती केली गुरुपादुकें। तें चरित्र गुरुनायकें। जैसें तया कथियेलें ।।८।। तेंच यथामति संप्रती। घेवूनिया लेखनी हातीं। लिहीतसे शुद्धमती। धरूनिया अंतरी ।।९।। आतां परिसाजी सच्चरित। जें गंगेहूनि परम पवित्र। श्रवण मननें देत परत्र। निजभक्तांकारणें ।।१०।। श्रीगुरु म्हणती त्या अर्चकासी। भैरव विप्रचरितासी। परिसा सावधान मानसीं। त्वत्पूर्वजवृत्तांतें ।।११।। अलास ग्रामनिवासी।



विप्र एक तपोराशी। भैरवनाम तयासी। स्वधर्मरत वर्ततसे ।।१२।। सदा स्वधर्मे वर्तत। यदृच्छे जें प्राप्त होत। त्यांत संतोष मानित। असे सात्त्विक वृत्तीनें ।।१३।। नैसर्गे भोळा तो ब्राह्मण। नच करी कोणा याचन। ज्योतिषवृत्ती करून। कुटुंबभरण करीतसे ।।१४।। अशीति वर्षे तयासी। षष्ठी वर्षे तद्भार्येसी। दैवयोगें तयासी। संतति नसे कांहींही ।।१५।। संतान नाहीं म्हणून। खेद न करी तो ब्राह्मण। यथाशक्ती अन्नदान। करीतसे अभ्यागता ।।१६।। भार्या तयाची सद्गुणी। भर्तृवाक्यानुसारिणी। स्वप्निही भर्त्या नावमानी। महासाध्वी ते देखा ।।१७।। पतिवाक्यानुसारिणी। विरला सती महद्गुणी। अनंत जन्मीचें पुण्ये करूनी। ऐसी सती लाधत ।।१८।। कांत असोनि धनवंत। कामिनीचें इच्छित पुरवित। तरीच त्या अनुरक्त वर्तत। अन्यथा छत्तीस आंकडा ।।१९।। भार्या प्रतिकूल जयाची। प्रतिपदीं फजिती तयाची। सुख वार्ता कैंची। गृह नोहे तें कानन ।।२०।। गजेंद्रलक्ष्मी वसे गृही। परी कांता अनुकूल नाहीं। क्षणही न बसावें त्या गृहीं। गृह नोहे तें कानन ।।२१।। प्रपंचीं असोनी धन विपुल। स्त्रीपुत्र वर्तती अनुकूल। होतां कालगती प्रतिकूल। तया कोणी न पुसती ।।२२।। जो कां नर सकंचन। तया सर्व

करिती वंदन। विपद्ग्रस्ता दंडण। पदोपदीं होतसें।।२३।। आज्ञाधारी सुत। भार्याही अनुकूल वर्तत। गृहस्वामी स्वधर्मरत। हेंच सौख्य गृहाश्रमीं।।२४।। आदरें अतिथीपूजन। असेल तें देत तया अन्न। दंपतीचें संतुष्ट मन। हेंच सौख्य गृहाश्रमीं।।२५।। गेहीं अठरा विसवे विपत्ती। परि दंपती तुष्ट वृत्ती। अहर्निश रमापती। न विसंबे तयागृही।।२६।। आतां असो हे बहु भाषण। तो भैरव नामा ब्राह्मण। नच अंतरी कदा उद्विग्न। तैसीच भार्या तयाची।।२७।। सदा सत्पथें वर्तत। निज भर्त्या ईश्वर मानीत। तदाज्ञा प्रतिपाळीत। कायावाचामनेंसी।।२८।। प्रत्यही वा सार्वकाळ। विपत्ति असतां नांतरीं विव्हळ। निज भर्त्यां जें मिळेल। त्यांतचि संतुष्ट सर्वदा।।२९।। दिनचर्या त्या साध्वीची। श्रोतीं परिसावी साची। जैसी वृत्ती भर्त्याची। तैसीच आपण वर्ततसे।।३०।। भर्तृपश्चात् शय्यासन। स्वीकारी ती प्रतिदिन। तेवी रात्रोत्तरभागी जाण। पती आधीं हो जागृत।।३१।। गृहस्थ केरकचरा काढून। सडासंमार्जनादि करून। पतिपूर्वी करुनी स्नान। पूजा सामग्री करीतसे।।३२।। अग्न्युद्धारण करून। चंदनादि साहित्य पूर्ण। पंचामृतपात्रीं भरून। देवासन्निध देतसे।।३३।। सर्व एषणा सोडून। अहर्निश भर्तृसेवन। न कंटाळे तिचें मन।



कदापीही भर्तृसेवें।।३४।। पर्णकुटिकेसम स्वमंदिर। परि तयामाजी अमरपूर। कोणीं कूटत्वें बोलतां नर। नेदी प्रत्युत्तर तया।।३५।। आत्मगेह सोडून। शेजारींया गृहालागून। केव्हांही ती न जाये आपण। स्वाश्रमींच सदा वसे।।३६।। ज्या साध्वीचे पुण्यें करून। जो विश्वात्मा विश्वभावन। सकळ भुवनें तीर्थे सोडून। येत कृष्णासंगमीं।।३७।। तिचें तप:सामर्थ्य वर्णावया। समर्थ एक वक्रतुंडजाया। सकळ तीर्थे जिचे पायां। अहर्निश सेविकीं।।३८।। ऐसी ती दिव्य दंपत्ती तत्त्वता। स्वधर्मे वर्तत असतां। तद्भाग्यसूर्य श्रीगुरुनाथा। कैसा दर्शवी तें परिसा।।३९।। भक्तिप्रिय नारायण। भक्ता प्रिय जगज्जीवन। ही प्रतीती नारायणें। दाविली गोकुळीं।।४०।। भक्तिवेडा नारायण। जेवि गोपोच्छिष्ट अन्न। अभक्तांचे दिव्यान्न। न सेविलें कधींही।।४१।। काय आवडी भक्तिची। भक्षी फळें भिल्लिणींची। नसे अंतरी भक्ती त्याची। संगती न करी श्रीरंग।।४२।। भगवत्भक्तीवांचून। काय कीजे शुष्क ज्ञान। घृतविरहित शुष्कान्न। दे शांती कीं अंतरी।।४२।। ज्ञानाचें मुख्य लक्षण। सदा अंतरी समाधान। जया नांतरीं समाधान। काय कीजे त्या ज्ञाना।।४४।। भगवंतीं नसे प्रेम। फळा नये त्याचे श्रम। न संपादितां

अ. ३

३०

भर्तृप्रेम। काय जिणें तें स्त्रियेचें।।४५।। कैसी आवडी भक्तीची। ही साक्ष घ्यावया साची। आस त्यागूनि सर्वांची। येत श्रीगुरु दक्षिणे।।४६।। नवमास जिणे गर्भी वाहिला। शैशवी जिणें संरक्षिला। त्या मातृप्रेमा सोडूनि वहिला। येत कृष्णासंगमीं।।४७।। जिचिये सद्व्रतेंकरून। अवतरे त्रैमूर्ति आपण। त्या मातापित्याचें समाधान। करून येत औदुंबरी।।४८।। जो स्वयंप्रकाश चिन्मय। तया कैंची बापमाय। ये धावूनी दत्तमाय। भैरव विप्राकारणें।।४९।। सव्य घालुनि मेरूसी। सर्व तीर्थां करित प्रकाशी। षड्गुणैश्वर्य तेजोराशी। येत कृष्णासंगमा।।५०।। बदरिकाश्रमापासोनि। रामेश्वरादिक फिरोनी। पादचारें करोनी। सर्व तीर्थें विलोकिलीं।।५१।। परि दुजे वैकुंठ भुवन। श्रीनृसिंहवाटिकास्थान। या विलोकितां समाधान। होत चित्तीं तत्क्षणीं।।५२।। कृष्णापंचगंगासंगम। रम्य हें स्थान अनुपम। म्हणोनि भक्तकामकल्पद्रुम। अहर्निश येथें वसे।।५३।। कृष्णापंचगंगासंगमीं। स्थान हें भूषविलें अनेक द्रुमीं। कित्येक पादप स्वर्गगामी। भूसरिसे जाती किती।।५४।। माध्यान्हीं येताही दिनकर। प्रकाशमय त्याचे कर। नच पडती भूमीवरी। वृक्षीं वसति अंतरिक्ष।।५५।। संगमसे जोड निंब। असंख्य

अ. ३

३१

त्या पथीं वृक्षनिंब। न दिसे कधींही सूर्यबिंब। दंडकारण्य ऐसें दिसे।।५६।। वट अश्वत्थ गुंजादिक। कंटक उंबरादि प्लक्ष। कमठ जंबीरादि चंपक। असंख्य शमी वृक्ष ते।।५७।। इंगुदी धात्री पलाश। कित्येक स्पर्शति आकाश। पशुसंचारावकाश। न दिसे कोठेंही।।५८।। नाना लता विराजती। दिव्य पुष्पें त्या शोभतीं। भूतमात्रा तोषविती। असंख्य वक्ष चहुंकडे।।५९।। वन बिल्वादिपादप। पत्रपुष्पें शोभती अमूप। वेणूवेत्रादि समीप। गंगेच्या त्या विराजती।।६०।। गगनचुंबित वृक्ष जाती। अनेक तेथें विराजती। वृक्षाग्रीं पक्षी जाती। बैसून करिती नर्तना।।६१।। भारद्वाजमयूरादिक। स्वस्वशब्दें सम्यक। नानापक्षी भल्लूरादिक। मधुरगान करितीं सदा।।६२।। वृक्षीं बैसूनि वानर। भुभु:कारें गर्जती थोर। वायसमर्कटादि चकोर। चकोर क्रौंच गर्जती।।६३।। कुरंग सुकर सवत्स। इत:स्ततो धावती सहर्ष। श्वानव्याघ्रादि क्रूर सर्प। यथेच्छ क्रीडे करिती पैं।।६४।। पशुपक्षि शब्दें करून। अहर्निश नादितसे वन। रम्यैकांत स्थळ देखून। राहती संगमीं श्रीगुरु।।६५।। तप:सामर्थ्य प्रगट करावया। वसे सद्गुरु त्या ठाया। यतिवेष धरूनिया। तपाचरित अहर्निश।।६६।। तप:प्रभाव काय न करी। हें भक्तजनांच्या

अ. ३
३२

अंतरीं। प्रतीती दाखववावया श्रीहरी। कृष्णासंगमी वास करी।।६७।। या पवित्र स्थानाची थोरी। वर्णण्या योग्य ब्रह्म कुमरी। ज्या स्थानीं श्रीनरहरी। द्वादशाब्द वास करी।।६८।। निबिड काननामाझारी। नच वसतिस्थान शेजारी। कलि कल्पद्रुम औदुंबरीं। वास करीत यतिराज।।६९।। तत्र एक यतिराज। तेज:पुंज अपर दत्तराज। त्रिंशत वर्षें आदौ अज। यद्दर्शनार्थ वास करी।।७०।। सुवर्णसम देहकांती। मस्तकीं जटा विराजती। तप:प्रभावें अपरगभस्ती। ज्ञानें सिंधू महात्मा।।७१।। आजानुबाहू महानुभाव। सद्गुरुदर्शनाची धरून हांव। अत्यंत पवित्र पाहून हा ठाव। एकाकी वसतसे।।७२।। काषायांबर परिधानून। अहर्निश भगवत् चिंतन। रिता जाऊं न दे क्षण। कदापी तो महात्मा।।७३।। परम वैराग्यसंपन्न। मुखीं अनारत नामस्मरण। तपस्तेज विद्युल्लतेसमान। कायीं प्रकाशा देतसे।।७४।। हठयोग राजयोग। आचरोनि यथासांग। प्राणायामादि उपांग। यच्चरणा सेविती।।७५।। आश्रमोक्त कर्मीरत। ऐसा गमे लोकांत। परी सदा अंतर्निष्ठ। महाराज योगी तो।।७६।। भेदाभेदा नसे ठाव। ऐसें जयाचें आत्मवैभव। जन्ममृत्यूतें कैंचा ठाव। लाभे तयासन्निध।।७७।। अंतरीं अत्यंत उदासी। परि सद्गुरु

अ. ३
३३

असे या ठायासी। प्राप्त तो हृषीकेशी। श्रीरामचंद्र योगिराज।।७८।। सर्वत्र सम दृष्टी ठेवून। अर्धोन्मीलित लोचन। नासाग्रीं दृष्टी ठेवून। विचरे तो मुनिवर्य।।७९।। जयापासून सर्वां अभय। तया भय करित काय। ऐसा रामचंद्र योगिराज। कृष्णासंगमी वास करी।।८०।। मुकुंदराज शिष्य जयाचा। कोण वर्णील प्रभाव तयाचा। यन्नामस्मरणें वाचा। पूत होय तत्क्षणीं।।८१।। विश्वात्म भाव उदित अंतरीं। परी या सद्गुरुची मार्गप्रतीक्षा करी। महानाची महंताची थोरी। जाणती नान्य प्राकृत।।८२।। असो ऐसा तो सिद्धराज। अमर जयाचे चरणरज। वांछिती तया हा अज। दुर्लभ होय स्वर्लोकीं।।८३।। जगदात्मभावें त्या काननीं। अहर्निश वसे तो मुनि। सर्पवृश्चिकादि असंख्य प्राणी। सात्त्विक बुद्धी विचरती।।८४।। धेनु व्याघ्र एक स्थानीं। वसती पै प्रेमें करूनि। तमोगुणी एकही प्राणी। नसती तेथें कोणीही।।८५।। सद्गुरूची मार्गप्रतीक्षा। अन्नपानादिकांची कांक्षा। त्यजुनि महत्त्वाची आकांक्षा। एकाकी वसत काननीं।।८६।। वत्सालागीं धांवत। येत धेनु वत्स जेथ। तैसाचि हा सद्गुरुनाथ। निजभक्तार्थ येतसे।।८७।। काय तप:प्रभावाची वोढी। त्यागुनि जननि जनक गोडी। रामचंद्र भक्त

अ. ३
३४

ओढी। ये धावत कृष्णातटीं ।।८८।। ऐसे तें सच्चरित्र। परिसुनि जाहला पवित्र। ऐसा तो आर्चक सत्पात्र। प्रेमें प्रश्न करितसे ।।८९।। रामचंद्र सिद्धयोगी पुरुष। हे सद्गुरुही जो अमांनुष। हे उभयतां सिद्ध पुरुष। किमर्थ येथें पातले ।।९०।। काय तयाचें कारण। निवेदावें कृपा करून। सत्चरित्रश्रवणा हा दीन। लीन श्रीपदीं हा असे ।।९१।। ऐसिये त्या कृष्णाकाननीं। उभय योगिराज ऐक्य होऊनी। निराहार सुधामृतपानीं। द्वादशाब्द वसत पैं ।।९२।। सिंहावलोकनें करून। श्रोती घ्याजी पृष्ठीं अवधान। भैरव भाग्योदयापासून। वर्णू तच्चरित्रामृत ।।९३।। येच अध्यायाची ओवी। एकोनचत्वारिंशत पहावी। येथून पुढें वर्णवी। भैरवचरित्रा सद्गुरु ।।९४।। एक दिनीं तो भैरव द्विज। ज्योतीष वृत्तीचें धरून काज। ज्या औदुंबरी सद्गुरुनाथ। वसति त्या पथें जातसे ।।९५।। प्रात:काळींचा तो समय। स्नान करूनी श्रीगुरुराय। औदुंबरी तळीं दीनमाय। प्रातरान्हीका बैसली असे ।।९६।। जो स्वयंप्रकाश श्रीनरहरी। कोणत्या विभूतींचे वर्णन करी। भस्मभूषित तनू साजिरी। काषायांबर धारिजी ।।९७।। निखिल मंडनाचें मंडन। तपस्तेज झळके पूर्ण। दशदिशा जात कोंदून। दिव्यतेजें जयांच्या ।।९८।। कंठीं रुद्राक्ष विराजती।

अ. ३
३५

दंडकमंडलू शोभती। तत्तेजें लोपला गभस्ती। ऐसें दिसे त्या द्विजवरा ।।९९।। जयाची भीति कलिकाळा। जो तीव्रतर भक्तीचा जिव्हाळा। तो कंठीं रुद्राक्षमाळा। धारण करित हें चित्र ।।१००।। दरींकंदरीं बसून। वल्कले परिधान करून। जया दर्शनालागून। अहर्निश ध्याती अंतरी ।।१।। सनकाद्यादि तापसी। कृतकृत्य व्हावयासी। अंतरीं ध्याती जयासी। तो प्रणव जपा करीतसे ।।२।। ऐसी सद्गुरुमूर्ती सांवळी। जी दीन भक्ताची माउली। तो औदुंबर वृक्षातळीं। ध्यानयोग करीतसे ।।३।। यथोक्त आसनीं बैसून। दंडकमंडलू सन्निध ठेवून। नासाग्री दृष्टी ठेवून। प्रहास्य मुखें करी तपा ।।४।। अस्तु तो भैरव ब्राह्मण। श्रीकृष्णेच्या पैलतीराहून। त्या सद्गुरुचरणा निरखून। आश्चर्यचकित होतसे ।।५।। पुनरपि विचारी मानसीं। या घोर काननीं हा तापसी। कदा प्राप्त या स्थानासी। कैसा येथें वसतसे ।।६।। ऐसें विचारीत मानसीं। दीन भाव धरूनि हर्षी। करुनी हस्तपादप्रक्षालनासी। साष्टांग वंदन करीतसे ।।७।। श्रीगुरुरायें तें जाणूनी। प्रसन्न अंतरीं होऊनी। तत्कर्णी पोचवी ध्वनी। नारायण म्हणोनिया ।।८।। परिसूनि ती सद्गुरूची वाणी। आल्हादें विप्र अंत:करणीं। कृष्णानदीपार होवोनी। श्रीसन्निध पातला ।।९।।

देखूनि ती दिव्य मूर्ती। अत्यंत संतुष्ट होत चित्तीं। साष्टांग नमन एक भक्ति। करी तो विप्र तेधवां ।।११०।। वारंवार तो द्विज। वंदी श्रीगुरुचरणरज। हास्यमुखे श्रीगुरुराज। नारायण नाम उच्चारिती ।।११।। स्वकार्याची विप्रा त्वरा। निघे तेथूनि जोडूनि करा। वारंवार तो माघारा। श्रीगुरुचरणा वंदित ।।१२।। महत्कष्टें तेथून। निघे तो भैरव ब्राह्मण। अंतरीं श्रीगुरुचरण। वारंवार स्मरितसे ।।१३।। तेथून शिरोळा जावून। ज्योतिष कार्य आटपून। परतोन येत सद्गुरुचरण। दर्शनार्थ तेथ तो ।।१४।। आल्हादें श्रीचें दर्शन। घेत तेणें समाधान। मानून निघे तेथून। येत स्वगृहालागूनी ।।१५।। श्रीदर्शनाची महती। कथित निज भार्येप्रती। संतोष साध्वीचे चित्तीं। होत श्रवणें करूनिया ।।१६।। ऐसीये परी तो भैरव। वर्तत असतां तद्वैभव। प्रतिदिनीं वर्धत अभिनव। गुरुप्रसादें करूनिया ।।१७।। ज्योतिषमिषें करून। वारंवार गुरुदर्शनालागून। येत तो सगुण ब्राह्मण। औदुंबरीं निरंतर ।।१८।। विलोकूनि ती दिव्यमूर्ती। साष्टांगें वंदी एक भक्ती। श्रीही प्रहास्यमुखें त्याप्रती। नारायण म्हणती आनंदें ।।१९।। ऐसें करितां कालक्रमण। श्रीगुरुदर्शनावांचून। त्या विप्रा नान्य ध्यान। गुरुदर्शनावांचूनिया ।।१२०।। द्वादशवर्षे ऐसीये स्थिती। ब्राह्मण



श्रीगुरुचरण चित्तीं। धरूनियां भाव भक्ती। दर्शनार्थ येतसे ।।२१।। एवं द्वादश वर्षे श्रीसी सेवित। परी श्री त्या कांहीं न पुसत। ब्राह्मणही स्वीयव्रत। श्रीं ते कांहीं न कथीच ।।२२।। ऐसे परी सेवितां। भैरव द्विज भाग्यसविता। उदयाद्रितें सेवितां। परमाश्चर्य होत पैं ।।२३।।नित्य नियमानुलक्षून। शिरोळा जावया गृहांतून। येऊनि घेत श्रींचें दर्शन। जाय वृत्यर्थ तेथूनी ।।२४।। स्वोद्यमापूर्ण करून। निघे तेथून तो ब्राह्मण। श्रीगुरुदर्शना कारण। औदुंबरी पातला ।।२५।। अस्ताचल शिखरीं। आरूढत तमारी। तेव्हां श्रीगुरू कृष्णातीरीं। संध्योपासना बैसती ।।२६।। दर्शनार्थ तो भैरव द्विज। येत तो श्रीगुरुमहाराज। ध्यानस्थ बैसले योगिराज। देखिलें विप्रे तेधवा ।।२७।। नोहे हा समय वंदनाचा। ऐसा विचार करीत साचा। नियमन करोनि मनोवाचा। श्रीसन्मुख तिष्ठत ।।२८।। द्विज तिष्ठत हें जाणून। श्रीगुरुराज कृपाघन। हस्तसंकेतें करून त्या खूण। बैसावया विप्रवरा ।।२९।। परि तो न बैसे विप्रवर। तथापि जोडूनि दोनी कर। तिष्ठे तें विलोकूनी गुरुवर। पुन: हस्तसंकेत दाविती ।।१३०।। गुर्वाज्ञा मानून। बैसे विप्र तो हात जोडून। श्रीगुरूंचे मुखावलोकन। वारंवार करीतसे ।।३१।। किंचित् काळ तेथें बैसतां। अस्ताचली जाय सविता। रात्र होईल हें आणून चित्ता। वंदन करूनि निघतसे ।।३२।। स्कंधी घेवोनी

अ. ३ धोकटी। करीत वंदना मागुती। निघतां तया श्रीगुरुमूर्ती। प्रसन्न चित्तें बोलती ।।३३।।
३८ अहो विप्रवरा धर्मभूषणा। संध्याकाळीं मार्गक्रमणा। त्यागोनिया कृष्णा जीवना। नोहे
उचित हें ब्राह्मणा ।।३४।। संध्याकाळीं मार्गक्रमण। हें धर्मबाह्य वर्तन। तें न कीजे
आपण। ऐसें आम्हां वाटतें ।।३५।। काळवेळां विलोकून। सर्वे कीजे वर्तन। ऐसी
शास्त्र आज्ञाप्रमाण। हें अवधारी द्विजवरा ।।३६।। अतएव ही संध्याकाळ। कृष्णोदक हें
परम निर्मळ। ऐसें असतां मन चंचळ। न किजे या समयीं ।।३७।। परिसुनि श्रीची
दिव्यवाणी। विप्रें जोडूनि द्वय पाणी। प्रव्ही भावा अवलंबुनी। दीनवाणी बोलत ।।३८।।
भगवन् भवत् आज्ञाप्रमाण। परंतु स्त्री एकाकी गृहीं जाण। नान्य सहकारी तये लागून।
म्हणून चंचल होत मन ।।३९।। अतएव कृपा करून। द्यावी आज्ञा समय लक्षून। एवढी
विनंती श्रीचरणा। अवधारिजे महंती ।।१४०।। परिसूनिया विप्रवचन। कृपासिंधू
जगज्जीवन। प्रहास्य मुखें वदती वचन। अमृतासार सरस्वती ।।४१।। स्व स्व
प्रारब्धाधीन। जीव हा सर्वथा एकाकीजाण। सहकारित्व हें मायीक जाण। क्षणभंगूर
सर्वदा ।।४२।। कोण कोणा न सोबती। जोंवरी चाले याची शक्ती। तोंवरी भोवती
नाचती। प्रसंगीं होती पाठमोरे ।।४३।। स्त्रीपुत्रादिक प्रेम। कोठवरी करिती हे परम।

अ. ३ जोंवरी हा तयाचें काम। पूर्ण करीत तववरी ।।४४।। परिवाराविरुद्ध जे वर्तती। ते
३९ स्वजना शत्रू होती। मोठमोठ्याही प्रतीती। आली असे निश्चयें ।।४५।। संसार हा अवघा
मायीक। पुरा करुनि याचा विवेक। जे विचारे वर्तती देख। तेच तरती भवसिंधू ।।४६।।
दुर्लभ हा नरदेह। यांत विवेकें ऊहापोह। करुनि त्यागिजे सर्व मोह। तरीच याचें
सार्थक ।।४७।। सर्वा कष्ट देऊनी। कपर्दी कपर्दी करोनी। द्रव्य मेळविलें लक्षगुणीं।
भूमिमाजी राहतसे ।।४८।। पशुपक्षी प्रेमे पाळिले। ते स्वस्वस्थानीं राहिले। परम प्रेमें
जीस पाळिले। ती कांता येत द्वारावधिं ।।४९।। स्मशानापर्यंत स्वजन। करिती याचें
अनुगमन। देह चित्तेमाजी दहन। नये कोणीं सांगाती ।।१५०।। शुभाशुभ कर्मा घेऊन।
करी हा परलोकी गमन। यालागी विवेक करून। वर्तणें मनुजें सर्वदा ।।५१।। ऐसें
सद्गुरु आपण। उपदेशिती द्विजालागून। तंव निशा जाहली दारुण। अंधःकार
पडियेला ।।५२।। पुनश्च श्रीसी करुनि वंदन। निघे जावया तो ब्राह्मण। क्रोध तत्परसे
श्रीगुरु आपण। वदति तया विप्रातें ।।५३।। काय भट्टजी हें साहस। काय म्हणावें
तुम्हांस। दुग्धें नहाणिला वायस। परी नये तया हंसता ।।५४।। इतुका काळ आमुचा
घेऊनी। निघाला स्वगृहालागुनी। यत्किंचितही तुमचे मनीं। न होयेकीं विवेक ।।५५।।

अशती वर्षे देहासी। काय प्रीती हीं स्त्रीपुत्रासी। करुनी विचार मानसीं। अजून तरी सावध।।५६।। अहो शत सहस्त्र जन्म गेले। कर्मानुसार फळ मिळालें। नच कोणी सहकारी जाहले। काय याचा विवेक।।५७।। आतां तरी व्हा सावध। दैवी मायाही अगाध। स्वप्न संसारी प्रबोध। करणेचा समय हा।।५८।। तरी विवेकें धैर्यावलंबूनी। तत्काली आशा सोडूनी। अंत:करणा दृढ करोनी। कीजे वास ये स्थळीं।।५९।। षष्टि आयनें उल्लंघतां। गृह त्यागावें सर्वथा। साधावया परमार्था। धीरें सेविजे कानन।।१६०।। असार संसार हा जाणूनी। वैराग्यस्त अवलंबूनी। सर्व पाश शिथिल ज्या मनीं। तया धीर वदती शिष्ट।।६१।। स्वत: वा अन्यापासोनी। निर्वेद प्रबोधूनि मनीं। श्रीहरी स्वांती करूनी। गृह प्रव्रजन जो न करी।।६२।। तया महात्म्यातें शिष्ट। नरोत्तम म्हणती स्पष्ट। सहस्त्रीं ऐसा वरिष्ठ। मातृजठरीं येतसे।।६३।। अहो दुर्लभ हा नरदेह। क्षणभंगुर न संदेह। सुविवेक परत्र इह। साधनीं तोच कृतार्थ।।६४।। ऐसें सुधासम भाषण। वदती श्रीविप्रालागून। शेवटी म्हणती आज येथून। नच जावें निजगृहा।।६५।। परिसतां श्रीचें भाषण। तळमळे भैरवाचें मन। परि नोल्लंघावें सिद्ध वचन। ऐसें मानसीं विचारीं।।६६।। भाग्योदय जयापरी। तया तैसी बुद्धी हरी। देत हें सर्वांतरी। असो घ्यावा विवेक।।६७।। सद्गुरु आज्ञा मानून। राहे तेथें तो ब्राह्मण। हस्तपाद प्रक्षालून।



संध्योपासना करीतसे।।६८।। नित्यविधी आटोपून। यथाधिकार तो ब्राह्मण। बैसत गुरु आज्ञें करून।। श्रीसन्निध तेथेंचि।।६९।। श्रीगुरुराजही तेधवा। स्वकर्मे तोषवूनि केशवा। सुहास्यमुखें भैरवा। येथून प्रश्न करतील।।१७०।। तें चरित्र अति रसाळ। सद्गुरू मुखें वर्णतील। करूनी अंतर प्रेमळ। श्रोतीं सावधान परिसिजे।।७१।। स्वस्ति श्रीगुरुप्रसाद ग्रंथ। करुनि शंकर निमित्त। वक्तावदविता श्रीगुरुनाथ। औदुंबर संविहारा।।७२।। भैरव वरदा श्रीयतिवरा। कृष्णासंगम संविहारा। दत्तात्रेया दिगंबरा। अखंड भजन देई तुझें।।७३।। नसता चातुर्य कवित्वाचे। तव चरित्र वर्णित साचे। रक्षी ब्रीद पवित्र वाचे। करी इतुकीच विनंति।।७४।। त्वत्कृपावलोकनें करून। होय चिंतामणी पाषाण। ऐसी आस धरून। प्रकृतपथीं वर्तत।।७५।। संतचरणीचा किंकर। श्रीदत्तसूत हा शंकर। विनवी श्रोतयां जोडूनि कर। श्रीगुरुसाद परिसाजी।।७६।। सद्भावें परिसतां अथवा पठतां। दया येईल श्रीगुरुनाथा। ठेवील कृपा हस्त तया माथा। नि:संदेह सद्गुरु।।७७।। श्रीगुरुप्रसादग्रंथे। तृतीयोध्याय:।। हरये नम:।। श्रीगुरुदेवदत्त।। ओवी १७८।।

श्रीगणेशायनम: ।। ॐ जय जयाजी अनसूयाकुमारा। मंगलात्मका परमोदारा। तव चरित्र वर्णना शंकरा। मार्गद्रष्टा होय तूं ।।१।। त्रयी सहा जया शोधिती। सनकादिक जया उपासीती। तो तूं परमात्मा जगज्योती। त्वच्चरित्रवर्णना पथ दर्शवी ।।२।। परमात्मा तूं मंगलधाम। असोनि स्वत: अल्पकाम। अहर्निश भक्तकाम। पूर्ण करिसी हें प्रसिद्ध ।।३।। तुजसारिखा पाठिराखा। होतां इतरांची काय कथा। पिता माता बंधू सखा। तूंचि माझें सर्वस्व ।।४।। अनन्य दास हा तव शरण। अभिता करि याचें रक्षण। करवी तव चरित्रवर्णन। सन्मती या देऊनिया ।।५।। ऐसें विनविता जगदीश। अंतरी प्रविष्टे हृषीकेश। म्हणे नभीं तूं लवलेश। पाठीराखा असे मी ।।६।। पूर्वाध्यायीं तो विप्रवर। बैसत मर्यादें श्रीसमोर। निशा होत भयंकर। गाढांधकार चहूंकडे ।।७।। जो स्वयंप्रकाश चिद्घन। जो तपनाचाही तपन। त्या दीपप्रकाश हें विडंबन। मर्त्य दृष्टीस हें तम ।।८।। श्रीचरणसन्निध द्विजवर। बैसला असतां त्या गुरुवर। वदती त्या उचलोनि कर। काय हो वेदो नारायण ।।९।। कवण ग्रामीं आपुला वास। काय परिवार तुम्हास। तैसेंचि कुटुंबनिर्वाहास। कवण वृत्ती करीतसा ।। १० ।। इतर परिवार किती। वास एकत्र कीं विभक्ती। कोण व्यासंगातें करिती। ऐसें पृच्छती श्रीगुरु ।।११।। जो विश्वात्मा



विश्वभावन। सर्वज्ञ जो नारायण। परि व्यवहारा अनुसरून। प्रश्न करीत भक्तांते ।। १२ ।। अरण्ये बसोनि पाही। लौकिक व्यवहार चातुरही। सर्वज्ञातें विदित नाहीं। ऐसें कायसें त्रिजगतीं ।। १३ ।। तथापि व्यवहारानुसरून। भैरवा प्रश्न करी आपण। अथवा द्विज भाग्य तें आपण। बोलवीत गुरुवर्या ।।१४।। ऐसें कारुण्य परिपूर्ण। सद्गुरूचें तें दिव्य भाषण। परिसतां तो ब्राह्मण। आनंदित जाहला ।। १५।। पाणिद्वया जोडून। प्रव्ही भाव स्वीकारून। कथीतसे वर्तमान। निज जीवनाचें तेधवां ।।१६।। म्हणे जी सद्गुरूस्वामी। अलास ग्रामीं वसतो आम्हीं। एक भार्येवीण नाहीं। कोणी परिवार आणिक।। १७।। अशीती वर्षे मजसी। षष्ठी वर्षे पत्नीसी। करित वृत्ती ज्योतिषी। आहे स्वामी सद्गुरो ।।१८।। ज्योतिषवृत्तीचे ग्राम सात। वृत्त्यर्थ तया जात येत। यदृच्छें जें प्राप्त होत। त्यांत निर्वाह करीतसो ।।१९।। वार्धक्य या देहा आलें। व्यवसाय सोडविणार नुरले। कोणी जगीं त्या योगें धाले। अंत:करण श्रीगुरो ।।२०।। तीर्थयात्रादिसाधन। करावेसें चिंती मन। परि वार्धक्य आणि निर्धन। कैसें करणार साधन ।।२१।। नाना वृत्ती दरिद्रें उठती। परि जेथल्या तेथें विरती। ऐसी दारिद्र्याची स्थिती। काय सांगू गुरुनाथा ।।२२।। परिसूनि ऐसें विप्र भाषण। श्रीगुरी बोलती आपण।

अ. ४ दारापुत्रादिकरुन। दृष्टानुसार प्राप्त होती ।।२३।। जैसें जयाचें प्राक्तन। तदनुसार स्त्रीधन।
४४ अनंत श्रम केले तरी जाण। प्रारब्धाधीन फल पैं ।।२४।। करून ऐसिये सुविचारा। सूज्ञे
संतोषित ठेवावें अंतरा। ईश्वरीं ठेवूनि भारिभारा। आनंदरूप असावें ।।२५।। आणखी
एक विप्रा खूण। सांगतो तयाची आठवण। अंतरीं असो द्यावें समाधान। हरिस्मरणें
सर्वदा ।।२६।। इतुकें करुनिया भाषण। विरामती श्रीगुरु आपण। तों नैशपती होत
उदित आपण। निराश तम हरावया ।।२७।। तत्रस्थ कुसुम गंधा येवूनी। वृक्ष लते
हालवूनी। सहकारी पक्षी मंजुळ ध्वनी। घेऊनि समीर वाहत ।।२८।। सर्वत्र शांतता
विलोकूनी। श्रीगुरु विचार आणिती मनीं। या वेदोनारायणा या स्थानीं। स्वीय अर्चक
करावा ।।२९।। ऐसा आशय आणोनि मनीं। श्रीगुरु वदती हास्य वदनीं। काय हो
भट्टजी या स्थानीं। बसाल कां तुम्ही एकटे ।।३०।। सुरळीत योगक्षेम चालेल। ऐसी
व्यवस्था जरी कोणी करील। तरी तुम्हां सौख्य वाटेल। काय येथें राहावया ।।३१।।
विप्र वदे श्रीगुरुसी। त्यागूनि ग्रामगृहासी। भयप्रद ऐसीये प्रदेसीं। वसोनिया काय
लाभ ।।३२।। एकाकि या निर्जन वनीं। हिंस्र जीव या काननीं। असंख्य स्वेच्छें करोनि।
वसती हो विलोकिजे ।।३३।। अन्यत्र मार्ग नाहीं म्हणून। मुष्टींत जीव घेऊन। जात येत

अ. ४ नर येथून। शिरोळ ग्रामा श्रीवरा ।।३४।। आसमंतांत नसतां वसती। कैसे वसावें जी
४५ यतिपती। पाहा विचारुनिया चित्तीं। नंतर आज्ञा करावी ।।३५।। तस्कर वस्ती या
वनीं। म्हणून कृषीवल हे क्षेत्रा सोडूनी। जात सायान्हीं गृहालागोनी। सोडूनि सस्या
शेतीच्या ।।३६।। येथें देव ना धर्म। ऐसीये स्थळी अकर्म। सांडूनि ज्ञाती कुलधर्म।
किमर्थ वास ये स्थळीं ।।३७।। संगमा स्नानाकारण। कदा कदा येती ब्राह्मण। पांच
पंचवीस मिळून। भीत भीत या स्थानीं ।।३८।। ऐसीये अघोर स्थळीं। किमर्थ वास जी
सन्मुनी। काय लाभ तयापासूनी। काननीं वास कासया ।।३९।। दुजी विनंती ऐसी।
ऐंशी वर्षे या देहासी। सद्यःस्थिती असतां ऐसी। किमर्थ वसावे या स्थळी ।।४०।। ऐसें
ब्राह्मणांचे भाषण। परिसुनि सद्‌गुरु आपण। पुनश्च विप्रालागून। कृपाळूपणें
बोलत ।।४१।। अहो द्विजवर विचारा मनीं। कीं ईशइच्छेवांचूनी। कांहीं न घडत जनीं
वनीं। हे श्रुतिशास्त्रा प्रमाण ।।४२।। गुह्याहून गुह्य आणिक। कथितों त्याचा विवेक।
करा तुम्ही सम्यक। निजचित्तीं हो द्विजवरा ।।४३।। या स्थानीं एक दैवत। स्थापन
करण्यालागीं दत्त। आज्ञापिती दिन बहुत। युष्मत्कार्यार्थ भैरवा ।।४४।। त्या ईश
आज्ञेस्तव। सांगतों तुम्हां अभिनव। उदया येईल तव वैभव। श्रीदत्तगुरुप्रसादें ।।४५।।

श्रीपाद श्रीदत्तगुरु। देईल तुम्हां इच्छित वरु। किमपिही चिंता न करूं। विश्वास ठेवा या
वचनीं।।४६।। वैकुंठवासी श्रीपती। सुरासुर जया आराधिती। तो तव कल्याणार्थ
मजप्रती। पाठवीत या स्थानीं।।४७।। ऐसें तें दिव्य भाषण। परिसतां तो ब्राह्मण।
अंतरीं चकित होऊन जाण। पुनरपि श्रीतें विनवित।।४८।। म्हणे अगा भक्तवत्सला।
ज्ञानसिंधो तव चरणकमला। शरण येत या सत्पथाला। लाविजे स्वामि श्रीगुरो।।४९।।
अमृतप्राय तव भाषण। परिसतां धाले अंतःकरण। काय सेवादासा कारण। निवेदिजे
गुरुवरा।।५०।। परिसुनि तें द्विज भाषण। श्रीगुरु हृष्ट होऊन। वदती त्या विप्रालागून।
प्रहास्य वक्त्रें तेधवां।।५१।। या पवित्र संगमस्थानीं। भक्तोद्धारालागोनी। एक अभिनव
दैवत स्थापूनी। जावें पुढें येथुनी।।५२।। ऐसी आम्हां ईशप्रेरणा। तरी तयेच्या अर्चना।
विप्र असावा तुष्ट मना। परम शुचि धर्मज्ञ।।५३।। तें कार्य तुमचेकडून। होईल ऐसें
आमुचें मन। अंतरीं कथितसे अनुदिन। देखूनि तुमचें वर्तना।।५४।। ऐसें वदतां
श्रीगुरुमूर्ती। भयभीत होत विप्र चित्तीं। म्हणे जी महाराज त्रैमूर्ती। परिसिजे विनंती
दासाची।।५५।। आधींच हें दुर्गम वन। येथें अन्न आच्छादन ये कोठून। तो विचार
झालीयावांचून। कैसें होय म्हणावे।।५६।। आणि तें जरी धर्मार्ह असेल। नये वृत्ती तें



दूषण। तदाचरणे विमल मन। निरंतर असावें।।५७।। यांचा करावया श्रीचरणीं। येथें
न आलो जी गुरुमुनी। सहज दर्शनार्थ या स्थानीं। पातलों मी गुरुवरा।।५८।। तरी
देशकाल विलोकूनी। माझें वार्धक्य आणूनी मनीं। आदि अंती यदा चरणीं। सौख्य
असावें सर्वदा।।५९।। आरंभी दाक्षिणात्य शूर। ऐसें म्हणती आम्हां नर। अतएव तें
आचरण्या सुकर। असावे जी दयाघना।।६०।। निर्दोष चालावें निरंतर। लोभाविष्ट न
होईजे अंतर। ऐसा करोनिया विचार। आज्ञा व्हावी या दासा।।६१।। ऐसें तें करुण
भाषण। श्रवण करुनी सद्गुरु आपण। प्रत्युत्तर हास्य करून। देत द्विजा तत्क्षणीं।।६२।।
श्रीगुरु म्हणती विप्रासी। येवढी भिती त्या कैची। सौख्य होईल तुम्हासी। जें सांगूं तें
आचरिता।।६३।। ऐसीये पुनित स्थानीं। एक दैवत असावें निर्गुणी। जयां अर्चितां
निशिदिनीं। इष्ट फल होय सर्वां।।६४।। ऐशा सद्गुरु पादुका। ज्या नाम मनोहर ऐका।
सद्भावें अर्चिता भाविकां। चतुःपुरुषार्थ लाभती।।६५।। त्या पादुकेच्या अर्चना। तुम्ही
योग्यसे वाटतें मना। विचारूनि अंतःकरणा। व्हावें तुम्हीं पूजक।।६६।। तपोयोगें
अर्चकाच्या। अतिशायित अर्चनाच्या। योगें दैवत्व त्रिवाचा। वसें देवत्व तत्र पैं।।६७।।
हेंच आमुचें सांगणें। विचारें तुम्हीं आंगिकारणें। चारि पुरुषार्थ येणें गुणें। लाधती तुम्हां

भरवसें ।।६८ ।। ऐसें तें सद्‌गुरुचें भाषण । परिसूनिया तो ब्राह्मण । वदे दीन भावें करून ।
श्रीसन्निध तेधवा ।।६९ ।। म्हणे जी स्वामी श्रीपती । स्वीकारावया अर्चक वृत्ती । श्री
चरण जे अज्ञापिती । त्या पादुका कोण देवाच्या ।।७० ।। स्वयंभू की स्थापीत । धातुभूत
कीं अश्मभूत । ये स्थळीं केवी उदित । जाहल्या ते निवेदिजे ।।७१ ।। तीर्थवासी असतां
आपण । या स्थानाचे परिज्ञान । श्री चरणा हें दिव्य ज्ञान । केवि ज्ञात जाहलें ।।७२ ।।
कांहीं अधिकाराबाहेर । भाषा वदत हा पामर । ते श्रीचरण थोर । क्षमा करतील
सर्वथा ।।७३ ।। ऐसें बोलूनि ब्राह्मण । करद्वया जोडून । करी साष्टांग वंदन । श्रीचरणातें
तेधवां ।।७४ ।। पुनरपि वंदूनियां चरण । प्रार्थीत श्रीचरणा लागून । एकाकी या काननीं
कोण । वसले हे विचारिजे ।।७५ ।। संन्यस्त विषय जया । ही उपाधी कासया तया ।
राजाश्रय नाहीं जया । ते न जायीच शेवटा ।।७६ ।। ऐसें विनवितां ब्राह्मणें । श्री गुरु
वदती त्या कारणें । आम्ही सांगू तें अंगिकारणें । त्यांत मिळेल श्रेय तुम्हां ।।७७ ।।
सर्वतोपरी विचार । आम्हां दिसतसे शुभकार । याहूनही तुमचा विचार । काय तो वदा
सत्वर ।।७८ ।। विश्वास ठेवून आमुचे वरीं । अंगिकारावें अंतरीं । कदापि तुम्हां श्रीहरी ।
नोपेक्षील निश्चयें ।।७९ ।। पूर्व प्रश्ना अनुसरून । वदती श्रीगुरु ब्राह्मणा लागून । ये स्थळी



दैवतन प्राचीन । आम्ही करणार स्थापन ।।८० ।। पादुका स्थापूं अश्मसार । चतु:पुरुषार्थ
ज्या देणार । अक्षय्य कल्याण करणार । तुमचे तव वंशाचे ।।८१ ।। धातू त्यागून पाषाण ।
कां योग्य अर्चना कारण । परिसा त्याचे निदान । कां घेती त्या अर्चना ।।८२ ।। ते
कोणाचा द्वेष न करिती । कोण कांही न मागती । परनिंदा नच करिती । न येती गृहा
बोलावितां ।।८३ ।। न कोणापासून त्या भिती । म्हणूनच अश्ममूर्ती । सर्वत्र पूजना
घेती । पूर्वीपासून सर्वहीं ।।८४ ।। अत्र स्थापूं पाषाण पादुका । श्रीपाद श्री नृसिंह रुपका ।
अक्षय्य भोळ्या भाविका । कृत कार्य करणार ज्या ।।८५ ।। मूर्ती न स्थापितां पादुका ।
कां ऐसी कराल तुम्ही शंका । तद्विषयीं सांगतो ऐका । नारदोक्ती भागवतीं ।।८६ ।। धर्म
अर्थ काम मोक्ष । हे चारी पुरुषार्थ प्रत्यक्ष । देत श्रीहरी निशंक। भगवत् पादाब्ज
सेवनें ।।८७ ।। अतएव मूर्ती न स्थापितां । पादुकाची स्थापूं निश्चिता । तयाच्या अर्चनें
तत्त्वता । अखंड कल्याण तवान्वया ।।८८ ।। ऐसें ध्रुवा उपदेशिलें । त्यानें ही तैसेचि
आचरिलें । त्यायोगें त्या लब्ध झालें । ध्रुवपद ।।८९ ।। ही दैवी वाणी जाणूनी । अशेष
कुशंका त्यागूनी । व्हा अर्चक तोष मानुनी । मनोहर पादुकेचे ।।९० ।। तुमचे वंश परंपरि ।
कृपासिंधु श्रीनरहरी । चक्र धरुनिया करीं । सर्व तो रक्षील नि:शंक।। ९१ ।। जरी स्वभाव

चंचल संपद्विपत्ती । तरी त्या तव वंशा न बाधिती । सहाय जया यदुपती । कोण पीडा करील त्या ।।९२।। कामधेनूचें पाडस । कदापि न उपवास । काढील हें अंतरीं खास । अवधारी तूं द्विजवरा ।।९३।। सर्व आशंका त्यागुनी । अर्चा पादुका मनापासुनी । कल्पद्रुम हा तव सदनीं । प्रेषित श्रीहरी स्वानंदें ।।९४।। पीयूषसार सरसवाणी । परिसी परी भीत मनीं । एकाकी मी हें आणोनीं मनीं । काय करावें म्हणतसे ।।९५।। अर्चकवृत्ती ही निंदित । हें वारंवार ये चित्तांत । परि अमृतसम श्रीगुरुनाथ । काय करावें म्हणतसे ।।९६।। पुनरपि विचार करी मनीं । निजभार्येतें विचारुनि । अनंतर श्रीगुरुचरणीं । निवेदावें काय तें ।।९७। ऐसा निर्धार ठरवुनि मनीं । पुन: करद्वया जोडुनी । श्रीगुरुचरणा वंदुनी । नम्रभावें बोलत ।।९८।। म्हणे जी यतिवरा दातारा । श्रीची आज्ञा या पामरा । शिरसामान्य परि गुरुवरा । किंचित् विनंती ही असे ।।९९।। धर्मार्थकर्माचरणीं । भार्या संमत घेवोनी । वर्तावें ऐसें शिष्ट जनीं । रूढी घातली असे कीं ।।१००।। अतएव गृहीं जाऊनी । पत्नीचा विचार घेऊनी । उभय विचार ठरवूनी । सांगेन येऊन श्रीपदीं ।।१।। ऐसें तें विप्र भाषण । समीचीनसें जाणून । तथास्तु तया म्हणून । शय्यासनीं बैसती ।।२।। श्रीगुरु म्हणती विप्रवरा । शय्यासमश्रुत करा । निद्राही सर्व जंतु नरा । विश्रांतीचे धाम असे ।।३।। ऐसें



द्विजातें सांगून । निद्रित होती तत्क्षणीं आपण । ब्राह्मणही श्रीआज्ञा मानून । होय तेथेंचि निद्रित ।।४।। विप्र सुप्त घोर कांतारीं । दीनबंधु श्रीनरहरी । कृपाछत्र तच्छिरीं । धरुनी भक्तां रक्षित ।।५।। श्रीसन्निधभैरव असे । अपत्याची चिंता नसे । भार्या गृहीं त्याची असे । नेत लेखनीं तद्दर्शना ।।६।। श्रीदत्तसुत शंकर । विनवी श्रोतया जोडूनी कर । श्रीसन्निध सुप्त द्विजवर । मग्न आनंदसागरीं ।।७।। स्वस्ति श्रीगुरुप्रसाद ग्रंथ । करूनी शंकरा निमित्त । वक्तावदविता श्रीगुरुनाथ । श्रीनृसिंह सरस्वती ।।८।। भैरव वरदा करुणाकरा । कृष्णासंगम संविहारा । दत्तात्रेया दिगंबरा । अखंड भजन देई तुझें ।।९।। भक्तोद्धारार्थ काननीं । श्रीनृसिंह सन्मुनी । वसे अखंड तो मन्मनीं । वसो वर्णना स्वलीला ।।११०।। अर्चक चरित्रा विलोकुनी । स्ववृत्त सर्वी सुधारुनी । वर्तलीया सद्गुरु निर्गुणी । प्रसाद निश्चयें करील ।।११।। संतचरणींचा किंकर । श्रीदत्तसुत हा शंकर । विनवी श्रोतया जोडूनी कर । गुरुप्रसाद सेवावया ।।१२।। इति श्री गुरुप्रसादे चतुर्थोध्याय: ।। हरयेनम: ।। श्रीगुरुदेवदत्त ।। ओवीसंख्या ।।११२।।

अ. ५
५२

श्रीगणेशायनमः। जयजयाजी अंबिकानंदना। मौंजी होतांचि त्यागूनि सदना। प्रमोद देऊनि माधवमना। निघे काशीस जावया ।।१।। वाराणसीं कांहीं वास। करित तेथें योगाभ्यास। तें देखूनी मानस। सज्जनाचें तुष्ट होत ।।२।। तो विश्वात्मा विश्वभावन। म्हणे मद्भक्तचरित्र गहन। परम पावन करी वर्णन। सतीवृत्ता येथूनिया ।।३।। तदाज्ञा शिरसा वंदून। प्रारंभीं सतीवृत लेखन। श्रवणें तोषोत संतजन। ऐसी आस धरुनिया ।।४।। श्रोतीं देईजे अवधान। ज्योतिषकार्यार्थ जाऊन। भैरव विप्र शिरोळाहून। औदुंबरीं पातला ।।५।। महद्भाग्यें करून। जाहले तया श्रीचरणदर्शन। सद्गुरु आज्ञें करून। तन्निशिं तेथें राहत ।।६।। सायान्हीं परत येईन। ऐसें भार्येतें सांगून। गेला विप्र हें पूर्वकथन। जाहलें असें ।।७।। पुढें भैरवगृहीं तत्कामिनी। नित्यकर्म सर्व सारुनी। मार्गप्रतीक्षा करित मनीं। गृहकार्या करीतसे ।।८।। तों अस्ताचला जाय सविता। विप्रभार्या ती पतिव्रता। गृहकार्य उरकूनि तत्त्वता। स्नान करीत तेधवा ।।९।। करून धौतवस्त्र धारण। हरिद्राकुंकुम लेवून। अग्निसन्निध बैसून। अग्न्युद्धारणा करीत ।।१०।। यथाविधी आचमन। करुनिया संकल्प पठण। अग्नि ध्यान करून। परिसमूहनादि करीत ।।११।। पुढें होमाहुती देऊन। यथाशास्त्र करुनि पूजन। अग्न्युपस्थान करून। प्रदक्षिणा करीतसे ।।१२।। सप्त प्रदक्षिणा

अ. ५
५३

करून। करीत साष्टांग वंदन। यस्यस्मृत्येति पठून। कर्म समाप्त करीतसे ।।१३।। गोदोहन करून। सर्वेचि पाकगृहीं जाऊन। अग्नि प्रदीप्त करून। पात्रें चुलीवरीं ठेवित ।।१४।। तव निशात्रिमुहूर्त। जाहली तरी कांत। कां न येति म्हणोनि चिंतित। द्वारीं वाट पाहतसे ।।१५।। निशा जाहली दारुण। कां न येति गृहालागून। येतों ऐसें सांगून। न राहती कधींही ।।१६।। ऐसें वारंवार बोलत। अंतर्बाह्य जातयेत। भर्तृपंथ लक्षित। चिंतातूर होऊनिया ।।१७।। जंवजंव निशा अधीक होत। तंव तंव ती अंतरांत। म्हणे काय करूं येथ। तें मज न सुचे कांहीही ।।१८।। दश घटिकेपर्यंत। भर्तृमार्ग प्रतीक्षा करीत। नच कोणी जात येत। त्या पंथेचि तेधवा ।।१९।। भर्तृ आगमनाची वेळ। होऊनी गेली ही तळमळ। अंतरीं होत तेणें विव्हळ। नयनीं नीर वाहत ।।२०।। देहीं रोमांच उभारती। गद गद शब्द उच्चरि ती। बाहेर येऊनि मागुती। मार्गप्रतीक्षा करीतसे ।।२१।। सर्व लोक होत निद्रिस्त। शून्य दिसे ग्रामपंथ। साध्वी ती जात येत। आंतबाहेर सारखी ।।२२।। एकादशीचा तो दिन। जाहलें बाई उपोषण। सांगून मला गेले आपण। येत मी गृहा उपाहारा ।।२३।। त्या शब्दीं ठेवूनि मन। करित मी मार्गप्रतीक्षण। त्या होय स्थिती ऐसी जाण। दैववशें काय करूं।। २४।। किं उपवासें मार्गक्रमण। जाहलें त्यायोगें थकून।

मार्गी व्याकूळ होऊन। राहिले कीं पडले बाई ।।२५।। उपाहारार्थ पाथेय। न्यावें म्हणून धरिले पाय। मज म्हणती राहतों काय। गृहीं आलियावाचून।।२६।। परत येणार म्हणोन। कंबलवस्त्र कांही आन। न नेले संगेंही कोण। सहकारी कोण ही।।२७।। ऐसें नाना कुतर्क करीत। अंतरीं अत्यंत तळमळत। वारंवार अश्रू पुसत। वस्त्र हातीं घेऊनिया।।२८।। सर्व भावें भर्तृपूजन। हेंचि स्त्रियांना परम भूषण। त्रिमूर्ती बाळ जाहले जाण। अनुसूया तपें करुनिया।।२९।। तिचिये पातिव्रत्या भुलून। सृष्टिस्थिति संहारक आपण। परि लोळले शिशु होऊन। अत्र्याश्रमीं प्रसिद्ध हें।।३०।। सामर्थ्य पतिव्रतेचें। कोण वर्णिल मनुजवाचें। काशीखंडीं पतिव्रतेचें। सामर्थ्य वर्णी बृहस्पती।।३१।। श्रोते विचारा अंत:करणीं। अघटित ज्या प्रभूची करणी। तो कृष्णातटी घोर काननीं। किमर्थ राहिला श्रीगुरु।।३२।। माझें मत हेंच ठाम। जो दयाघन आप्तकाम। दाता भक्ता स्वीयधाम। जो परमात्मा श्रीहरी।।३३।। तो भैरव स्त्रीचे तपें करून। सर्वा सुलभ दयाघन। राहिला संगमीं सनातन। प्रेमळ भक्ताकारणें।।३४।। सारांश ती भैरवकामिनी। न ये पती म्हणोनी। तळमळे विव्हळ होऊनी। मध्यरात्रपर्यंत।।३५।। आधीच ती उपोषित। भर्तृपदीं लागलें चित्त। यामुळें कांही नाठवत। भर्तृचरणावांचून।।३६।। तों ऐसिये अवसरीं।



स्मरण होत अंतरीं। कीं कुलदैवत निर्धारी। एकवीरा आमुचे।।३७।। तत्पदीं गेलिया शरण। होईल नाथचरणदर्शन। ऐसें स्मरोनि तत्क्षण। देवसन्निध जाय ती।।३८।। हस्तपाद प्रक्षालून। करूनिया आचमन। देवीसन्मुख बसून। हरिद्राकुंकुमें पूजित।।३९।। यथाशक्ती करूनी अर्चन। साष्टांग नमस्कार घालून। मन स्थिर करून। प्रार्थी देवीतें तेधवा।।४०।। जय जय भगवती कृपाकरे। महामाये एकवीरे। मयूरपिच्छकटिधुरें। धरुनि करिसी संचारा।।४१।। गुंजा हार सुंदर। विलसती तव कंठी मनोहर। तव तनु शाम सुंदर। प्रहास्य आस्य शोभतसे।।४२।। वदनारविंदी दंतपंक्ति। अपर नक्षत्रेंच विराजतीं। रत्नापरी पडे कांती। हास्यमुखे बोलतां।।४३।। दिव्य तव देहकांती। नीलवस्त्रे विराजतीं। वीरश्री भासत चित्तीं। परिपूर्ण ती मुखावरी।।४४।। ये समई तुझ्यावीण। मातें नान्य मजशरण। जननीं तूं होऊनी सुप्रसन्न। भर्तृपदाब्जा दर्शवी।।४५।। हे एकवीरे महामाये। तूंच माझी बापमाय। सोडूनिया तुझे पाय। सांग कोठें जाऊं मी।।४६।। विनविते हात जोडूनी। माते तूं प्रसन्न होऊनी। प्राणेश्वर गृहीं आणुनि। दाव माते सत्वरीं।।४७।। सांग माते काय करूं। नाहीं मजसी कीं लेकरूं। बंधुभगिनी प्रेम करूं। नच माते कोणीही।।४८।। स्त्री जाती निसर्गेपामरु। त्या भर्ता हाच सर्वेश्वरु। नान्य

आम्हां ईश्वरु। भर्तृचरणावांचूनियां।।४९।। हें तव माते सर्व ठाऊक। मी तव लेकरूं सम्यक। करूनि ऐसा विवेक। भर्तृपदाब्जा दाखवी।।५०।। ऐसी प्रार्थना करून। देवीपुढें करी शयन। पडतां व्याकूळ होऊन। झोप येत सतीतें।।५१।। ऐसा किंचित् समय जात। तव सुषुप्तीमाजी देखत। सौभाग्य स्त्री सन्निध येत। आश्वासित तेधवा।।५२।। म्हणे गे साध्वी महाभागे। अभय तुजपुढें मागें। चिंता कांहीं करूं नको गे। क्षेम असे भर्ता तव।।५३।। चिंता तूं काही न करी। श्रीकृष्णेच्या पैलतीरीं। तव पती असे औदुंबरी। श्रीसद्गुरूच्या सन्निध।।५४।। प्रत्यक्ष दत्त तो नरहरी। द्वादशाब्द तो औदुंबरी। तुम्हांकरता गे भाग्येश्वरी। तप करित बैसलासे।।५५।। कृपाळू तो जगन्नाथ। संप्रति एकदोन दिवसांत। तव भर्तृशिरीं वरदहस्त। ठेवील माते निश्चयें।।५६।। ऐसा दृष्टांत दाखवूनी। एकवीरा ती अंतर्ध्यानीं। जाय तत्क्षणीं तेथूनि। अभय सतीतें देऊनिया।।५७।। ऐसें होतां तत्क्षणीं। साध्वी ती जागृत होऊनी। इतस्ततः विलोकूनी। पुनरपि होय निद्रिस्त।।५८।। तों निद्रेमाजी देखत। दिव्य यति एक शोभत। औदुंबरी आसनस्थ। तत्संनिध असे पती।।५९।। ऐसीये चमत्कारा पाहुनी। धैर्य येतसे तिचे मनीं। कुशल प्राणनाथ हें जाणुनी। होत संतोष मानसीं।।६०।। इतुका समय जों जात। तों प्रभातकाळ

अ. ५
५७

होय प्राप्त। उदयाद्रि शिखरीं उदित। होत अरुण तेधवा।।६१।। इकडे भैरवस्त्री उठोनी। सडासंमार्जनादि करोनि। गृहकार्यातें सारुनी। गोदोहन करीतसे।।६२।। करुनिया प्रातःस्नान। अग्न्युद्धारण करून। यथाकाली होमादि करून। रंगवल्ली करीतसे।।६३।। चंदनादि पूजा सामायन। कुंभा करीं घेऊन। उदक अनयनाकारण। कृष्णावेणीस जातसे।।६४।। इकडे सुरम्य कृष्णातीरीं। औदुंबरी श्रीनरहरी। भैरव विप्रा जागृत करी। उषःकाळी तेधवा।।६५।। हांका मारितां तो ब्राह्मण। तत्काल उठे शय्येवरून। मुखप्रक्षालनादि करून। वंदून निघे श्रीपदा।।६६।। अवलोकोनी विप्रवरा। श्रीगुरु म्हणती विप्रवरा। कां असे किंचित् स्थीर करा। स्वीय मानस वृत्तीतें।।६७।। अहो ब्राह्मीं मुहूर्तीं उठोन। करावें मुख्य स्वात्मचिंतन। हस्तपाद प्रक्षालून। द्वयाचमना करावें।।६८।। स्ववेदोक्त प्रातःस्मरण। करोनी कुलदैवत स्मरण। ब्रह्मामुरारित्यादि पठून। पुण्यश्लोकां स्मरावे।।६९।। बलिर्बिभीषणेत्यादि पठून। षड्वैष्णवांचे कीजे स्मरण। प्रल्हाद नारदादि स्मरून। शुद्ध करावें अंतर।।७०।। ऐसा प्रातर्विधी न आचरितां। गृहगमनार्थ त्वरा करिता। काय म्हणावें तुम्हां आतां। हें न कळेचि आम्हांसी।।७१।।

अशीती वर्षे झाहली देहा। अद्यापि न त्यागितां मोहमोहा। नये काळ पुनः हा नरदेहाचा

अवधारा ।।७२।। सकळ जीवा विषयावड। त्यालागी करिती धडपड। हानी होता
तीळपापड। अंत:करण होत पैं ।।७३।। अहो दैवी माया ही दुर्धर। इनें सुरासुर केले
जर्जर। सोडूनि कित्येक ते कलेवर। विषयीं गेले यमपंथा ।।७४।। अहो भट्टजी विप्रवरा।
अंतरीं कांहीं विचार करा। प्रात:स्नान कृष्णातीरा। करून जावें गृहासी ।।७५।।
प्रात:स्नान सप्तदिन। संध्या न करतां त्रिदिन। द्वादश दिन नसतां अन्न। द्विजा शूद्रत्व
येतसे ।।७६।। अत: प्रात:स्नान करून। करावें येथूनिया गमन। ऐसी श्रीआज्ञा मानून।
स्नान करीत तेथचि ।।७७।। प्रातर्विधी आटोपून। श्रीचरणीं प्रणिपात करून। निघे
तेथूनि तो ब्राह्मण। स्वगेहातें जावया ।।७८।। इकडे गृहीं त्याची भार्या। गृहकृत्यातें
सारुनिया। भर्तृपंथा लक्षूनिया। निघे सत्वर तत्सती ।।७९।। निघूनिया गेहांतून। भर्तृपंथी
लक्ष लावून। वेसीपर्यंत येऊन। भर्तृमार्गा विलोकी ।।८०।। तो दुरून येत प्राणनायक।
निरखून ऐसें सम्यक। मनीं म्हणे मारूं कां हाक। तो विचार होत अंतरीं ।।८१।।
मर्यादा सोडून वर्तणें। हे सतीला लाजीरवाणें। ऐसें वदती शाहणे। म्हणून मर्यादा
पाळणें ।।८२।। ऐसा जो विचार करीत। तो भर्ता सन्निध तेथ येत। प्रेमें मस्तक ठेवीत।
पतिचरणी तेधवा ।।८३।। हास्यमुखें बोलत द्विज। हें काय नविन आज। मी गुरु कीं



परकी द्विज। काय काज वंदना ।।८४।। ऐसें प्रेमें बोलत। स्वगेहा होती ती प्राप्त।
यथाकालोपचार देत। साध्वी पतीतें तत्क्षणीं ।।८५।। दुर्भार्येची संगती। सौख्य न त्या
त्रिजगती। शिष्ट ऐसें वर्णिती। ते तीन ओवींत देखिजे ।।८६।। कांहीं काळ विश्रांती
घेऊन। विप्र बैसत उठोन। तैं साध्वी हात जोडून। नम्रभावें बोलत ।।८७।। अस्तमानीं
येईन म्हणून। केलें येथूनिया गमन। न येण्याचें कारण। काय झालें असावें ।।८८।।
गतदिनीं कोठें अशन। अथवा जाहलें उपोषण। न मिळालें असेल भक्षण। किंचित्
उपाहार करावा ।।८९।। ऐसें प्रेमभावें बोलत। पादप्रक्षालनार्थ आणित। जलपात्र
जलपूरित। तत्क्षणीं सती आदरें ।।९०।। विप्रें तत्क्षणीं उठून। हस्तपाद प्रक्षालून। किंचित्
उपाहार करून। पुन: स्वासनीं बैसत ।।९१।। भर्तृमानस जाणावें। हें साध्वीपासून
शिकावें। इतरातें न वर्णवे। साध्वीवर्तन सर्वथा ।।९२।। महत् कष्टें श्रमून। येत गृह हें
विश्रांती म्हणून। पत्नी तया देखून। म्हणे पीडा आली घरा ।।९३।। चार दिवस शांत
होते। न कोणाचें एक दोन ते। आतां नाचवील भोंवते। भर्ता म्हणूनीया मज ।।९४।।
मनासारखे भूषण। अथवा वस्त्रपरिधान। नच कधीं सुग्रास अन्न। अरेरावी
प्रतिपदीं ।।९५।। ऐसीये स्त्रियेपासून। जें सौख्य तें दु:खाकारण। करूं नये मुखावलोकन।

ऐसियेचि सर्वथा ।।९६।। कुबेर संपत्ती असे गृहीं। परि गृहिणी अनुकूल नाहीं। गृहीं त्या
नरा कधींही। नच मिळे संसारसुख ।।९७।। लोकनिंदा करूं नये। दुःसंगती धरूं नये।
अभक्ष्य कदा भक्षूं नये। ऐसें शिष्ट संवादती ।।९८।। परि प्रसंगानुसार। केला लेखनीनें
दुराचार। तो व्हावया परिहार। सतीवृत्ता वर्णवीत ।।९९।। उपरीनिर्दिष्ट गुणा। भैरवस्त्री
ऐसी न जाणा। सदा ईश्वर ऐसी भावना। पतीविषयीं जियेची ।।१००।। असो ती
विप्रभार्या। वंदूनिया भर्तृपाया। होय उदित पृच्छावया। गृहा न येण्याचें कारण ।।१।।
तें विप्रें जाणून। हास्यमुखें वदे आपण। गतदिनीं न येण्याचें कारण। प्रश्न करणार हेंच
ना ।।२।। परिसूनीया भर्तृभाषण। विनययुक्त हास्य करून। बोले सती तदा वचन।
काय अंतरज्ञान हें ।।३।। भैरव म्हणे सांगतो तुज। कांही त्रास काल न मज। एक
भेटला यतिराज। कृष्णासंगमीं महात्मा ।।४।। संध्याकाळ जाहला म्हणून। त्यांनी
घेतला मज ठेवून। धन्य सिद्धाचें दर्शन। जे त्रिविधताप भेषज ।।५।। ऐसें भार्येतें
सांगत। तव ती वेळा जाणोनि हात जोडित। स्नान व्हावें आतां म्हणत। देत उदक
स्नानार्थ ।।६।। स्नान करूनियां त्वरित। देवतार्चनातें करीत। देव वैश्वदेव स्थानी बैसत।
वैश्वदेव करावया ।।७।। वैश्वदेव करून। करीत नैवेद्य समर्पण। काकबली पात्र घेऊन।



येत द्वारीं तेधवा ।।८।। बलि समर्पून तद्भक्षकातें। निरिक्षी अतिथी मार्गातें। तो तत्क्षणीं
त्याच पंथें। सिद्ध एक येतसे ।।९।। विप्रें अतिथीसे जाणून। ये त्वरे उदक घेऊन।
कोणी जटाधारी त्वरें करून। याच पंथे येतसे ।।११०।। श्रोतीं व्हावें सावधान। अकल्पित
अतिथी येत कोण। परिसा तयाचें कारण। मागें लक्ष देऊनिया ।।११।। श्रीगुरु आज्ञा
घेऊन। विप्र जात संगमाहून। श्रीगुरु विचार करिती आपण। भैरवहितार्थ मानसीं ।।१२।।
द्विज तो तेथून गेला। परि आपण कोण हें त्याला। विदित सम्यक् व्हावयाला। रूपांतर
करावें ।।१३।। ऐसें अंतरीं ठरवून। जटाधारी वेष घेऊन। माध्यान्ह समय लक्षून।
भैरवद्वारीं येत पै ।।१४।। इकडे विप्रें बली अर्पून। द्वारी उभा राहून। अतिथीमार्ग
अवलोकन। करित विप्र तेधवा ।।१५।। तरी सद्गुरुच अतिथी होऊन। सिद्धरूपा
धरून। येत विप्रद्वारी आपण। श्रोतीं मानसीं जाणिजे ।।१६।। ऐसें भर्तृवचन परिसता।
उदकपूरित कलश हस्ता। येत सती गुणवंता। सिद्धदर्शनार्थ तेधवां ।।१७।। तव तो
योगी त्वरें करून। पुढें करूं इच्छी गमन। तें विप्रें ओळखून। हात जोडीत तेधवा ।।१८।।
विप्र बोले नम्रवचन। गृहीं पाकसिद्धी होऊन। वैश्वदेव करून। काकबळी दिधला ।।१९।।
तव भगवत् चरण देखिले ।। मन अत्यंत संतोषलें। येऊं देत चरण आपुले। दीन गेहें जी

स्वामिया ।।१२० ।। सिद्ध बोलत सुधावाचे । कार्य होतें त्वरित गमनाचें । परि सर्वोत श्रेष्ठ भोजनाचें । कार्य शिष्ट बोलती ।।२१ ।। अन्नासदृश लाभ नसे । मृत्यूसम हानी नसे । सद्गुरुसम श्रेष्ठ नसे । अन्य दैवत त्रिलोकीं ।।२२ ।। ऐसें करुनियां भाषण । कमंडलीं उदक घेऊन । वस्त्रें ठेवूनिया चरण । प्रक्षालित तत्क्षणीं ।।२३ ।। म्हणती जाहलेसें प्रात:स्नान । तथापि माध्यान्ह कर्माकारण । उदक द्यावे स्नानाकारण । वेळ तुम्हां होतसे ।।२४ ।। गंगा दूर हे ऐकून । स्नान केले गेहींच आपण । कौशेयांबर धारण । केलें मुनिवर्ये तेधवा ।।२५ ।। पीठ ठेवूनि सती त्वरीत । भोजनपात्रें सवेचि ठेवित । घृतेपात्रे अभिधारित । हर्षे चित्तीं तीं सती ।।२६ ।। साधू संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा । तोच दिन अति साजरा । ऐसें म्हणती शिष्टसंत ।।२७ ।। द्वारीं देखतां अतिथीतें । अठ्या घाली ती कपाळातें । व्हा पुढें म्हणती त्यातें । क्रोधयुक्त होऊनिया ।। २८ ।। षड्रस अन्न भक्षिति आपण । परिग्रास एक धेनुकारण । न देती ऐसें मूढजन । मग अतिथी काय तया ।।२९ ।। वैश्वदेव समयींचा अतिथी । अत्यंत श्रेष्ठसे शास्त्रीं वदती । हे नेणूनी पाप मती । करिती धिक्कार तयाचा ।।१३० ।। नाम ऐसियाचे घेऊं नये । परि प्रसंगानुसार लेखनी तेच ये । संतीं रोष मानूं नये । ऐसें विनवीत हा पामर ।।३१ ।। काय योग्यता



अतिथींची । जाणिली रन्तीदेवें हे साची । कीर्ती चिरकाल जयाची । धन्य तोचि महात्मा ।।३२ ।। ऐसे अनेक संतजन । कीर्ति जयांची अजरामर । दातृत्वें चढले स्वर्गशिखर । नसे गणती तयांची ।।३३ ।। अस्तु गुरुराया पात्रीं बसवूनी । अन्यत्र धावत लेखनी । तीतें सत्पथीं लावूनी । सरळ जावें लेखना ।।३४ ।। ऐसें श्रोतया विनवून । प्रकृत मार्गें करित लेखन । पात्रीं अभिधार करून । अन्न घेऊन येत सती ।।३५ ।। शाकपाकादि षड्रस । अन्न वाढिलें उभयतास । विप्र प्रोक्षी तत्पात्रांस । गायत्री मंत्रें करोनि ।।३६ ।। ईश्वरार्पण करूनि अन्न । मुनिकडे विलोकून । संज्ञा करी ब्राह्मण । भोजनारंभ करावया ।।३७ ।। एकमेकें संकेत करून । घेत उभयतां आपोशन । प्राणाहुती प्राणा देऊन । आरंभिलें भोजन ।।३८ ।। विप्र प्रार्थना करीत । महाराज आहे त्यांत । मागून घ्यावें जी त्वरित । शाकपाकादि येधवा ।।३९ ।। अनंत जन्मीं तपेंकरून । न जयाचें होत दर्शन । तो परमात्मा परिपूर्ण । अतिथि होत भैरवाचा ।।१४० ।। जया प्रीत्यर्थ यज्ञ करिती । यत्प्रीत्यर्थ दान करिती । ब्राह्मण जयाचें मुख म्हणती । श्रुतिशास्त्रें सर्वदा ।।४१ ।। षड्रस अन्नें जया अर्पिती । जो आप्तकाम श्रीपती । तो नित्य तृप्त यतिपती । कण्या भक्षी भैरवगृहीं ।।४२ ।। श्रीवासुदेवानंद सरस्वती । प्रहास्यमुखें त्या अर्चका वदती ।

परिसा भैरवभाग्याप्रती । अव्यग्र चित्तें करूनिया ।।४३ ।। अर्चक म्हणे श्रीगुरूसी । ज्याचें भाग्य तयासी । आम्हां दीन पामरासी । काय कीजे स्वामिया ।।४४ ।। श्रीगुरु म्हणती तयासी । कल्पवृक्ष आणिला गृहासी । तयाच्या वंशजासी । कोण म्हणेल पामर ।।४५ ।। अस्तु पूर्वचरितासी । श्रवण करा हो भावेसी । तत् श्रवणेंच तुम्हासी । भेट देईल श्रीहरी ।।४६ ।। श्रीगुरु म्हणती अर्चका । तो सिद्धरूपी श्रीगुरु ऐका । भैरवगृहीं मारीत भुर्का । कण्यातक्राचा तेधवा ।।४७ ।। काय त्यां पुण्य केलें । न प्रार्थितां द्वारी गेले । सिद्धरूप धरून आगळें । श्रीनृसिंह सरस्वती ।।४८ ।। भोजन परिपूर्ण करून । केलें हस्तमुखादि प्रक्षालन । उभयता बैसती येऊन । विप्रगेहीं तत्क्षणी ।।४९ ।। करूनिया आचमन । करिती शतपदीं गमन । भैरव स्त्री प्रार्थना करून । भोजन करीत तेधवा ।। १५० ।। हस्तपाद प्रक्षालून । दे भर्त्या कंबलासन । पति आज्ञे दर्भासन । देत योगीयाती सती ।।५१ ।। हस्त जोडी द्विजवर । हे महाराज गुरुवर । वामकुक्षी क्षणभर । व्हावी या दीन गृहीं ।।५२ ।। परिसूनि तें भक्तवचन । करिती वामकुक्षी शयन । गृहकार्यातें आटपून । होत सती मोकळी ।।५३ ।। सिद्ध निद्रिस्त देखून । भर्तृसमीप उभी राहून । प्रार्थी सती हात जोडून । निजभर्त्यातें तेधवा ।।५४ ।। गतदिनीं कोठें वास । काय कारण रहावयास । जाहलें



ऐकावयास । मी इच्छित संप्रती ।।५५ ।। कंबलवस्त्रादी कांहीं नसता । त्रास जाहला कीं चित्ता । उपवास घडला कीं उपाहारार्था । काय कोठें मिळालें ।।५६ ।। ऐसिये परी प्रश्न करितां । विप्र सांगे श्रीगुरुकथा । शिरोळाहून परत येता । कृष्णातीरा पातलों ।।५७ ।। वस्त्रादिक सांवरून । आतां कृष्णेंत ठेवावा चरण । तों औदुंबरतळीं ब्रह्मप्रधान । यतिराज एक देखिला ।।५८ ।। कंठीं रुद्राक्ष विराजती । काषायवस्त्रें देहीं शोभतीं । तपोराशी दिव्ययती । कृष्णातटीं देखिला ।।५९ ।। काय तेज तयाचें । वर्णूं न शके मी वाचे । महद्भाग्य होतें आमुचें । म्हणोनि जाहलें दर्शन ।। १६० ।। सुवर्णसम देहकांती । मज वाटले बैसला गभस्ती । कमलपत्राक्ष भ्रुकुटी । धनुषाकार शोभत ।।६१ ।। पंचाशत असावें वय । दिव्य तयाचे अवयव । वाणी किती अमृतमय । कथूं भार्ये तुजलागीं ।।६२ ।। सरळ नासिका शोभत । दंत रत्नासम भासत । बोलतां कांती फांकत । आसमंत प्रदेशीं ।।६३ ।। केशरकस्तुरीचे परी । देह सुगंध येतसे दूरी । दंडकमंडलू शोभत करीं । दिव्य सुमनमाळा गळां ।।६४ ।। ऐसा तो यतिराज नरहरी । देखिला मी कृष्णातीरीं । तद्दर्शनाची थोरी । काय वर्णूं तुजलागीं ।।६५ ।। देखतां तयाचे चरणकमल । तत्काळ मन जाहलें शीतळ । गेली सर्व तळमळ । तच्चरणदर्शन होतांची ।।६६ ।। ऐसें त्या गुरुवरा ।

साष्टांग वंदिलें मी श्रीवरा। निघे तेथून माघारा। गृहीं यावें म्हणोनी।।६७।। तों रात्र जाहली म्हणून। अत्याग्रह करून। घेतला सन्निध ठेवून। दीनानाथें या पामरा।।६८।। महद्वाक्य उल्लंघून। पुढें करूं नये गमन। ऐसा विवेक करून। राहिलों मी तेथेंचि।।६९।। दिव्य फळें उपाहारार्थ। मजसी अर्पितो समर्थ। मज वाटलें कृतार्थ। जाहलों तत्पददर्शनें।।१७०।। परिसतां भर्त्यांचे भाषण। साश्चर्य होत साध्वी मन। तें विलोकून ब्राह्मण। म्हणे ही ऐसी कां दिसे।।७१।। म्हणे साध्वीतें ते अवसरीं। ऐसी कां मुद्रा बावरी। काय विचार हिचे अंतरीं। ऐसी स्थिती व्हावया।।७२।। परिसूनि भर्तृभाषण। सती सांगे तया स्वप्न। हें काय असावें म्हणून। करिती विचार परस्परें।।७३।। स्तब्ध करोनिया मन। करिती तयाचें चिंतन। परि तयाचें निदान। कांहीं न होय निश्चित।।७४।। पुढें तो विप्र भार्येसी। सांगे श्रीगुरु आज्ञेसी। करा औदुंबरी वसतीसी। अर्चक वृत्तीनें संतत।।७५।। निंद्य ही जीविका म्हणोन। अत्यंत मीं केलें विनवण। वास करण्या युक्त न स्थान। घोर कानन इत्यादि।।७६।। तेव्हां ते श्रीवरदहस्ता। करुनि बोलले तत्त्वता। ईशरक्षक तुम्हां असतां। काय अरण्य करील हें।।७७।। जया प्रसन्न श्रीपती। तया त्रिलोकीं नच भीती। स्वर्गीचे देव आज्ञा वंदिती। काय कथा इतरांची।।७८।। सर्व

भावें करून। जया भगवान सुप्रसन्न। तया काय पडे न्यून। कलिकाळही भीति तया।।७९।। ऐसीये मोहक भाषें करून। आज्ञपिती जगज्जीवन। न सुचे मज कांहीं जाण। ऐसें जाहलें तेधवा।।१८०।। तो एकदम चकित झालें मन। पुढें तुझें निमित्त करून। आलों तेथून निघून। प्रकाश होत अंतरीं।।८१।। तरी पुढें कैसें करावें। होय कीं नाहीं म्हणावें। कां तिकडे नच जावें। सांग काय तें झडकरी।।८२।। भर्तृवचन परिसून। साध्वी नम्रत्वें बोले आपण। आम्ही स्त्रिया बुद्धिहीन। काय विवेक आम्हांतें।।८३।। स्त्रिया चातुर्य चुलीपासी। ऐसीये काजीं काय त्यासी। दूरदृष्टी अबलांसी। न कोठेंही ऐकिली।।८४।। हास्यमुखें द्विज बोलत। मी न तुजला पुसिला शास्त्रार्थ। काय करावें इत्यर्थ। सांग झडकरी ये क्षणीं।।८५।। परिसूनि भर्तृवचन। वदे साध्वी मृदुवचन। घेईजे कोपा आवरून। करावे युक्त तें आपणा।।८६।। अथवा मला वाटतें एक। सुदैवें हे सिद्धनायक। पातले आमुचे घरीं एक। ईशप्रेरणें येधवा।।८७।। तत्पदीं विनंती करून। प्रश्न कीजे त्यालागून। जे आज्ञा करतील चरण। तैसें कीजे निश्चयें।।८८।। समयोचित स्त्री भाषण। पटलें विप्रालागून। तच्चरणीं जाऊनि शरण। स्ववृत्त तया कथितील।।८९।। ती रसाळ कथा। पुढले अध्यायीं यथार्था। श्रोतीं परिसावी सर्वथा। एकचित्तें

अ. ५ करूनिया ।।१९० ।। स्वस्ति श्रीगुरु प्रसाद ग्रंथ । करुनि शंकरानिमित्त । वक्तावदविता
६८ श्रीगुरुनाथ । अर्चक वरद श्रीहरी ।।९१ ।। भैरवान्वयरक्षणार्थ । अहर्निश श्रीगुरुनाथ । कृष्णातीरीं वसे जागृत । श्रीनरसिंह सरस्वती ।।९२ ।। तो या पामराचे अंतरीं । जैसी जैसी प्रेरणा करी । तैसेंच मी लेखन करी । घेऊनिया लेखनी ।।९३ ।। भक्तवत्सला परमानंदा । दर्शवी तव पदारविंदा । स्मर्तृगमना तूं मुकुंदा । नान्य यांचा तव पदीं ।।९४ ।। संतचरणाचा किंकर । श्रीदत्तसूत शंकर । विनवी श्रोतया जोडूनि कर । गुरुप्रसाद सेवावया ।।१९५ ।। श्रीगुरुप्रसादे श्रीवासुदेवानंद सरस्वती संवादे पंचमोध्यायः ।। ओवी संख्या १९५ ।।

अ. ६ श्रीगणेशायनमः ।। श्रीसद्‌गुरवेनमः । ॐ जय जयाजी विश्वरूपा । जय
६९ जयानंदस्वरूपा । भक्तानुग्रहार्थरूपा । धरिसी अनंतानंत तूं ।।१ ।। त्या तव रूपाचा पडिवारू । काय मी दीन जाणे पामरू । म्हणोनि ठेवित त्वत्पदीं शिरू । दे अभय पामरा या ।।२ ।। जयजया अंबिकानंदना । तव पदीं मी करित वंदना । दे या क्षोदिष्ठा वरदाना । त्वच्चरित्र वर्णावया ।।३ ।। माझें अंतर तुज ठावें । कासया वारंवार विनवावें । त्वत्ब्रीदा उचित तें करावें । सद्यःस्थिती पाहूनिया ।।४ ।। कृपासिंधू तूं जनकजननी । तुज विना अन्य मज कोणी । दीन तारक तूं म्हणोनी । ठेवी भाळ मी त्वत्पदीं ।।५ ।। दीनबंधू जगज्जीवन । परमोदारा तूं मनमोहन । नाहीं ज्ञान मज म्हणून । नच कंटाळू गुरुराया ।।६ ।। प्राज्ञा आज्ञा माय सम । नच तियेकीं सम विषम । दोघावरी सम प्रेम । अहर्निश जननीये ।।७ ।। असो सारांश एक मागणें । दीन मूढा हातीं धरणें । आपुलें चरित्र वदविणें । स्वब्रीद रक्षी गुरुनाथा ।।८ ।। ऐसी प्रार्थना करून । घेत हातीं मी लेखन । गुरु माझा पाठीं राहून । चेतना करित लेखना ।।९ ।। जैसें सुचवित गुरुनाथ । तैसेचि लिहित येथ । हें जाणावया समर्थ । उदार बुद्धी सज्जन ।।१० ।। पूर्वाध्यायीं भैरव सती । नम्रभावें भर्त्याप्रती । विनंती करी पुसा युक्ती । योगिश्वरा वंदुनी ।।११ ।। तें विप्रें मान्य करून ।

मुनिसन्निध येऊन। प्रेमभावें करूनि वंदन। नम्रभावें प्रश्न करी।।१२।। तत्पूर्वी योगिरायें। प्रक्षालूनि हस्तपाय। आसनस्थ होऊनि गुरुमाय। अत्यादरें त्या पुसत।।१३।। योगिराज म्हणती तयासी। काय इच्छा असे मानसीं। भय सोडूनि मानसीं। अवश्य विचारा निर्भयें।।१४।। व्यक्त वा गुप्त ठेवितां। पश्चात्ताप होय चित्तां। जें आम्हां कळेल तत्त्वता। सांगूं तुम्हां अवधारा।।१५।। परिसूनि मुनीचें अभय वचन। बोले विप्र नम्रवचन। महाराज कृष्णा पैलतीरीं जाण। औदुंबर वृक्षातळी।।१६।। एक दिव्य तपोराशी। वसतसे अहर्निशी। नेणो कैंचा तो तापसी। किमर्थ तेथें वास करी।।१७।। दिवसा भय जेथें दिसे। ऐसिये स्थानीं तो वसे। तो मज आज्ञापीत असे। त्या स्थानीं वसावया।।१८।। तो मज आज्ञापी गुरुवर। येथें ईशपादुका मनोहर। स्थापना तुम्ही करणार। त्यांचे अर्चक व्हावया।।१९।। जडमूढ उद्धारार्थ। या पादुका महासमर्थ। देणार चारी पुरुषार्थ। अत्यादरें सेवितां।।२०।। तया पादुकांचें अर्चन। करावें सद्भाव धरून। तुम्हां रक्षील ईश परिपूर्ण। संशय न धरावा मानसीं।।२१।। महाराज तें प्रत्यक्षकानन। हिंस्र जीवांचें वसतिस्थान। तरी परिवार संगें घेऊन। कैसें तेथें वसावें।।२२।। सद्वचन जीवें पाळावें। सर्वथा असत्य त्यागावें। वृथा कोणा न पीडावें। ऐसें वदती संतजन।।२३।। तरी

महाराज कृपा करून। निवेदिजे दयाधन। ये संकटी मी कैसा तरेन। कृपासिंधू निवेदिजे।।२४।। ऐसें तें विप्रवचन। परिसूनि बोलती मुनि आपण। किमर्थ आम्हां करितां कथन। काय आम्ही सांगणार।।२५।। हितार्था आत्ममती। त्याहून उच्च गुरुमती। परबुद्धिनाश पावती। स्त्रीबुद्धी होय प्रळय।।२६।। आपुले अंतरीं विचारून। निश्चित करावें स्वीयमन। इहपरत्र साधन। त्यायोगेंचि होईल।।२७।। ऐसें ते दिव्य भाषण। परिसूनि वदे तो ब्राह्मण। शरणांगता जी दयाघन। नोपेक्षावें स्वामिया।।२८।। ऐसें तें करुणा भाषण। ब्राह्मण सद्वर्तनी हें जाणून। नोपेक्षीजे दीन भाषण। बुद्धिमंतें सर्वदा।।२९।। ऐसा विवेक करून। वदती त्या भैरवालागून। महद्भाग्यें करून भगवद्दर्शन। जाहलें तुज।।३०।। अहो औदुंबरवासी जी सद्गुरु। कलिमाजी तोचि कल्पतरु। भोळ्या भाविकांचा उद्धारू। करण्यार्थ येथें पातला।।३१।। त्रयमूर्ती अवतार तो देख। येविषयीं होय तूं नि:शंक। तव भाग्य उदेलें देख। तत्पददर्शने सर्वथा।।३२।। ऐसें ते भर्तृभाषण। परिसूनि सती बोले वचन। त्रयमूर्ती अवतरण्या कारण। काय जाहले निवेदिजे।।३३।। परिसूनि ब्राह्मणभार्येचें वचन। विप्र बोलती त्यालागून। सद्गुरु अवतरण्या कारण। सांगतों तुम्हां किंचित्।।३४।। अनुसूया तपें करून। श्रीदत्त अवतरला

जगज्जीवन। दत्त अवतार श्रीपादजाण। विदित तुम्हां असेल।।३५।। श्रीपाद योगी कुरवपुरीं। असतां एक द्विजनारी। सत्पुत्र तयाचे चरण धरी। सद्गती व्हावया कारणें।।३६।। तत्पुत्र स्वकर्मे मंद। नये विद्या म्हणोनि मंद। काय त्याग कीजे ऐसा खेद। करी तज्जननीं सर्वदा।।३७।। पुढें त्या लोक निंदिती। पशुसम त्या तुच्छ मानिती। निंद्यस्थिती आणोनि चित्तीं। निघे प्राण त्यागावया।।३८।। विलोकूनि पुत्रस्थिती। जननी खेद करित चित्तीं। नानापरी त्या संबोधिती। परी तो कांहीं नायकेची।।३९।। पुत्राचा पाठलाग करित। तया पाठी हांक देत। तीं दोघे प्राप्त होत। कृष्णातटीं तेधवा।।४०।। तों त्याचे महद्भाग्यें जाण। जाहलें सद्गुरुदर्शन। दुःखें धाऊनि धरती चरण। अनाथ नाथ म्हणोनिया।।४१।। देखतां श्रीपादचरणासी। दुःख अत्यंत मानसीं। होऊनि लोळे धरणीसी। महाराज महाराज म्हणोनिया।।४२।। म्हणे मी स्वामी काय करूं। प्राण त्यजित हें लेकरूं। तया मी कैसी आवरूं। आपण कांहीं सांगावे।।४३।। ऐसें वारंवार वदत। श्रीपादपदी डोकें ठेवित। महाराज महाराज म्हणीत। अति काकुळती येतसे।।४४।। जाणुनि दुःख सतीचें। कळवळले अंतर सद्गुरूंचे। सद्गद शब्दें बोलती वाचे। विप्रसतीतें तेधवा।।४५।। वज्राहूनि कठोर। पुष्पाहूनि सुकुमार। लोकोत्तरांचे



अंतर। क्वचित् विरळ जाणती।।४६।। म्हणती सद्गुरु तियेसी। कां माते तूं दुःख करिसी। विश्वात्मा हृषीकेशी। तुज रक्षील निश्चित।।४७।। मनीचें भय त्यजून। सांग माते दुःखकारण। सर्व संकट निवारण। ईश करील निश्चयें।।४८।। सुधासम तें गुरुवचन। परिसतां ती सती जाण। सद्गदीत होऊन। म्हणे स्वामी परिसाजी।।४९।। मद्भर्ता वेदो नारायण। श्रुतिशास्त्रांमाजी निपुण। तया समान नच आन। विप्र या देशीं स्वामिया।।५०।। तया महाभागापासून। हा कुलांगार होत जनन। नये संध्या याकारण। व्यर्थ जन्म ययाचें।।५१।। निंदा करिती अवघेजन। मूढपाषाण म्हणून। माझ्यासमोर निंदिती जन। कैसा अवमान साहूंजी।।५२।। गंगेंत त्यजावे प्राण। म्हणोनि प्राप्त ये स्थळीं जाण। न होय आत्महत्या जेण। ऐसा मार्ग दाखवी।।५३।। ऐसें तिचें दीनवचन। परिसून सद्गुरु आपण। वदती प्रेमें हास्य करून। न भी माते कांही तूं।।५४।। जीवमात्रें यथाशक्ती। उद्योग कीजे एकभक्तीं। सदुद्योगें श्रीपती। कृतकार्य भक्तां करित।।५५।। ऐसे ऐकूनि विप्रसती। चरण धरी एकभक्ती। म्हणे इच्छा एक चित्तीं। कृपासिंधू पूर्ण करा।।५६।। पुढील जन्मामाजी मज। पुत्र व्हावा ज्याचें तेज। स्वर्गा लावील कीर्तिध्वज। ते म्यां डोळां पाहावें।।५७।। कौमार्यापासून। अहर्निश त्या पाहून। तुष्ट व्हावें

अंत:करण। ऐसें असे मानस ।।५८।। लज्जा सोडूनि श्रीचरणीं। विनवित मी दीनवाणी। मुख्य वासना अंत:करणीं। एक देवा हीच असे ।।५९।। तुम्हासमान दिव्यसुत। उदरीं यावा जी निश्चित। जोडूनिया दोन्ही हात। शिर ठेवीत श्रीपदीं ।।६०।। ऐसें करुणार्ह भाषण। परिसतां द्रवलें श्रीपादमन। वदती मातें सांगेन। उपाय सत्पुत्र व्हावया ।।६१।। शनिप्रदोषीं सर्वेश्वरू। पूजी माते तूं कपूर्रगौरू। तो महेश कृपासागरू। तव वांछा पुरवील ।।६२।। प्रसन्न होतां गौरीशंकरू। मग काय इतराचा पडिवारू। यत्किंचित् चिंता तूं न करूं। कार्य तुझें होईलची ।।६३।। अश्वासूनि सतीसी। करविती व्रत समीक्षेसी। भविष्य आणूनि मानसीं। क्षेत्र शुद्ध करवीत ।।६४।। सर्वेचि तिचा जो मूढसुत। तच्छिरीं ठेविती वरदहस्त। वाक्पतीसम केला त्वरित। निमिषमात्रें तेधवा ।।६५।। पुढें विख्यात तो जाहला। सद्गुरुकृपें विवाह झाला। भोगुनि ऐहिक विषयाला। जात सत्पदीं गुरुकृपें ।।६६।। भार्येते वदे विप्रवरू। तोचि हा जाण अवतरू। तव भाग्यें कल्पतरू। कृष्णासंगमीं वसतसे ।।६७।। सर्व विकल्प सोडून। तदाज्ञा करी शिरसावंदन। नृसिंह सरस्वती यतिरत्न। कृतार्थ आम्हां करील ।।६८।। ऐसें सती भर्त्यास बोलूनिया। निघे मुनिवर तो जावया। भैरव दंपती धरती पायां। कळवळुनी तेधवा ।।६९।। विलोकोनि

विप्रप्रेम। कृपाळू तो पुरुष परम। उठवी तया मनोरम। करित भाषण तेधवा ।।७०।। तुमचे सद्वर्तनें करून। द्रवतसें अंत:करण। आड पडण्याचें कारण। काय तें निवेदा झडकरी ।।७१।। दंपती म्हणे ती मुनीसी। माझे रसने मधु लाविलासी। औंदुबरस्था म्हणसी। श्रीपादयोगी प्रत्यक्ष ।।७२।। श्रीचें मधुर भाषण। कर्णपीयुष सप्रमाण। तरी हे अवतरल्यापासून। चरितामृता पाजवी ।।७३।। परिसूनि स्त्रीचें भाषण। विप्र म्हणे हास्य करून। समग्र चरित्रवर्णन। कोण श्रींचे करील ।।७४।। तुझी सद्भावना देखून। तिरस्कार न करवे म्हणून। सारांश करितों तुम्हां कथन। एकचित्तें पर्येसा ।।७५।। कुरवपुरीं ज्या साध्वीसी। प्रदोषव्रताचरावयासी। कथिलें ती बहु दिवशीं। प्रदोषव्रता आचरे ।।७६।। तद्देहावसानानंतरी। जन्म घेतला कारंजपुरीं। वाजसनीय विप्राघरीं। ब्राह्मण कुळी जन्मली ।।७७।। सद्गुणी कन्या सुंदर। देखूनि आल्हादती मातापितर। कांहीं काळ जातां उपवर। होय ती कन्या अंबिका ।।७८।। विवाहा योग्य जाहली यावरी। चिंता उपजे तया अंतरीं। कन्यारत्न हें कोणाकरीं। अर्पण करावें म्हणोनिया ।।७९।। तो नगरीं एक ब्राह्मण। नाम तया माधव जाण। तया केली कन्यार्पण। शास्त्रविधी करूनिया ।।८०।। विवाह जाहलियावरी। अंबिका ती भर्तृमंदिरीं। पातिव्रत्यें वर्तन

करी। बालपणापासोनिया ।।८१।। पुष्पवती जाहलियावरी। गर्भाधानादि संस्कार करी। डोहाळे पूर्ण करी। माधव विप्र तेधवा ।।८२।। नवमास पूर्ण होत। तो अजन्मा प्रभू जन्मा येत। उपजतांचि प्रणवोच्चारित। दिव्य शिशू तो पर्येसा ।।८३।। अद्भुत नवल देखून। मातापितर विस्मित मन। प्रणवोच्चार परिसून। आल्हादती नागरीं कीं ।।८४।। उपनयनापर्यंत। मौनव्रत स्वीकारित। कोणी कांही पुसतां हांसत। प्रणवोच्चार करूनिया ।।८५।। मूक मूक लोक म्हणती। कोणी कांही पूसती। कित्येक ते हांसती। बोल बोल म्हणूनिया ।।८६।। जननी जनक ही चिंता करिती। कैसें दैव ओढवलें म्हणती। आराधिला उमापती। शनिप्रदोषें करूनिया ।।८७।। दिधला दिव्य कुमरक। परी जाहला कैसा मूक। गौरीहरा तूं विन्मुख। कां जाहलासी कळेना ।।८८।। ऐसे शब्द उच्चारित। स्फुंदस्फुंदोनि अश्रु टाकित। ते देखोनि जवळी येत। दिव्य तो शिशू तत्क्षणीं ।।८९।। स्वकरें तदश्रू पुसत। जननींकंठीं मिठी घालित। प्रहास्य मुखें चुंबित। जननींमुख आदरें ।।९०।। आश्वासीत पितयासी। मेखलाबंधन कटीसी। करावें ऐशा खुणेसी। संज्ञा दावी तेधवा ।।९१।। जाणूनि शिशूचें अंतर। जननीजनका हर्ष थोर। करिती सर्व संभार। उपनयनाचा तत्क्षणीं ।।९२।। सुमुहूर्ता विलोकून। करिती शिशूचें

व्रतबंधन। यज्ञोपवीत त्या घालून। माता भिक्षा घालित ।।९३।। भिक्षा घालितांचि जाण। करी चतुःश्रुती उच्चारण। देखतां आल्हादलें मन। मातापितयांचे तत्क्षणीं ।।९४।। सर्व लोक आश्चर्य करिती। प्रत्यक्ष ईश त्या मानिती। साष्टांग नमस्कार घालिती। बटु चरणातें सर्वही ।।९५।। पुढें जननीतें वंदून। वेदाध्ययना कारण। मागे निरोप आपण। काशीक्षेत्रीं जावया ।।९६।। परिसतां ऐसें पुत्र भाषण। सद्गद बोले माता आपण। काय बाळ हें भाषण। यावया उचित काय हें ।।९७।। नुकतें वर्ष आठवें लागत। त्यजूनिया जननीतात। तीर्थयात्रे जातों म्हणत। काय म्हणावें या धर्मा ।।९८।। हा धर्म कीं आमुचें कर्म। मी नेणें याचें वर्म। लोक म्हणती श्रेष्ठपरम। कोण शास्त्रीं तुजलागीं ।।९९।। पृथ्वीहूनि मातागुरुतर। नभाहूनि तात उच्चतर। यक्ष प्रश्नें ऐसें उत्तर। धर्मराये दीधले ।।१००।। वृद्धपणीं पोसावयासी। पुत्र मागती ईश्वरासी। तो जाहलिया तीर्थवासी। काय गती वृद्धांची ।।१।। हा विवेक करूनि अंतरीं। मग तूं गृहत्याग करी। ऐसें म्हणत रुदन करी। मुक्तकंठें तेधवा ।।२।। विलोकूनि मातृस्थिती। अश्वासी तये अतिप्रीती। दुःख देऊनि तव चित्तीं। जात नाहीं अवधारीं ।।३।। कांही काळ गृहीं राहून। पूर्ण खूण त्या पटवून। जननीजनक समाधान। करित हा नरहरी ।।४।। जननीचें समाधान। हेंचि

पुत्रांकर्तव्यपूर्ण। ऐसा विवेक करून। राहे गेहीं श्रीहरी।।५।। पुढें एक वर्षाचे आंत। व्हावया आपण गृहमुक्त। सुतद्वय माते देत। स्वेच्छें हा नरहरी।।६।। त्रिमासी बाळ जाहलेवरी। श्रीगुरु माताचरण धरी। आतां जाहली कामनापुरी। दे आज्ञा आनंदें।।७।। आणिकही सद्बोध करून। जनकजननी समाधान। करूनि निघे आपण। उत्तरपंथा लक्षूनिया।।८।। अष्टवर्षे पूर्ण न होत। तव सोडून गेह आप्त। मातापिता बोळवीत। ग्रामसीमांत तेधवा।।९।। नगर लोका परतवीत। मातापित्याचे चरण धरित। तत्काल श्रीपादरूप धरित। पूर्वस्मृत्यर्थ तेधवा।।११०।। पूर्वजन्मींचा वृत्तांत। स्मरण करुनि देत त्वरित। माता साश्चर्यचकित होत। सांगे तदवृत्त पतीसी।।११।। श्रीपाद स्वरूप देखून। जननीजनक धरिती चरण। श्रीगुरु तया अश्वासून। प्रेमें करूनि बोलती।।१२।। मातृकंठीं मिठी घालून। सद्गदशब्दें बोलत आपण। जा आई तूं परतून। माझी चिंता करूं नको।।१३।। जो परमात्मा परिपूर्ण। तो मातृवियोगें जगन्मोहन। होय मोहित जगज्जीवन। मग इतरांची काय कथा।।१४।। मातृप्रेमासम प्रेम। नान्य दैवत सद्गुरुसम। नान्य तृप्ती अन्नासम। हा अनुभव प्रसिद्ध।।१५।। त्रिंशत वर्षे फिरून। येईन मी इकडे जाण। होईल तुम्हां पुनर्दर्शन। यतिरूपें हें निश्चित।।१६।। आणि एक सांगतो तुज। ज्या ज्या



काळीं स्मरसी मज। सहस्र कार्या त्यजून। देईन दर्शन तुजलागी।।१७।। ऐसें तयां संबोखून। आपणही दृढ करूनिया मन। जननीजनका परतवून। निघे वाराणसीसी।।१८।। मनोवेगें मार्ग क्रमित। काशीक्षेत्रीं प्राप्त होत। दिव्य तप तेथें करित। आनंद चित्तें करूनिया।।१९।। कृष्णसरस्वतीपासून। तूर्याश्रमातें घेऊन। काशीवास कांहीं करून। निघे उत्तर यात्रेसी।।२०।। सर्व यात्रा पायी करीत। देवरुद्रप्रयाग पाहात। कर्ण प्रयागा देखत। जन्मोत्री स्थाना जातसे।।२१।। गंगोत्री केदारा जाऊनी। नारायणदर्शन करूनी। शिष्यासह श्रीगुरुमुनी। मानस सरोवरा जातसे।।२२।। तेथें कांहीं वास करून। मेरू प्रदक्षिणा करून। सशिष्य गुरुराज आपण। जात गंगासागरा।।२३।। स्नानादि विधी करून। सर्वेचि जगन्नाथा जाऊन। ती धामयात्रा करून। फिरे दक्षिणे यावया।।२४।। कांहीं गंगातीर फिरत। नाना क्षेत्रें विलोकित। मातृआज्ञा स्मरोनि त्वरित। येत कारंजपुरासी।।२५।। जनका दर्शन देऊन। करून मातेंचें समाधान। भ्रातृभगिनीतें तोषवून। मातृसन्निध राहतसे।।२६।। मातृपितरा कृतार्थ करून। नागरीक सन्मान घेऊन। सर्वा आनंदित करून। येत गोदातीरासी।।२७।। गंगातीराचीं क्षेत्रें। अवलोकिली पवित्रें। तीर्थें होतीं पवित्र। यच्चरणदर्शनें

करूनिया ।।२८।। नाशिक त्र्यंबकेश्वरीं जाऊन। सह्यागिरी दर्शन करून। गंगाद्वारा विलोकून। वैजनाथा येतसे ।।२९।। वैजनाथदर्शन करून। पुण्यक्षेत्र तें पाहून। शिष्या तीर्था पाठवून। वर्ष एक तेथें वसे ।।१३०।। पुढें त्वद्भाग्य वोढी। कृष्णावासीं वाटून गोडी। फिरत कृष्णातीर तातडी। येत औदुंबरी गुरू।। ३१ ।। चातुर्मास तेथें वसून। द्विजा वाचस्पतीसा करून। वरुणासंगमी स्नान करून। येत या कृष्णासंगमी ।।३२।। अहो आमुचें भाग्य थोर। नच आम्हासम अन्यतर। अहो ध्याती जया सुरासुर। तो तव गेहीं पातला ।।३३।। पंचाग्नीसाधन करून। शरीरकष्टविती दारुण। परी न होय जयाचें दर्शन। तो परमात्मा नरहरी ।।३४।। विश्वात्मा यती वेषी। नरू नव्हे तो हृषीकेशी। त्वद्भाग्यें कृष्णातीरासी। ये परमात्मा चालुनी ।।३५।। नारदोपदेशें करून। ध्रुवें आराधिला जो भगवान। तो अनायासें करून। कृष्णासंगमी वास करी ।।३६।। गांगेया तुष्ट जो नारायण। तो हा सद्भक्तपरायण। त्वद्भाग्यें करून। औदुंबरी वसतसे ।।३७।। आतां एकचि सांगतों तुजसी। जरी विश्वास मद्वचनासी। तरी अंतरीच्या टाकून संशयासी। तत्पदीं रत हो निश्चयें ।।३८।। तो कृपासिंधू नारायण। अक्षय्य करील कल्याण। प्रसन्न जाहलीया नारायण। काय न्यून पडे शंकरासी ।।३९।। ऐसें उपदेशूनि दंपतीसी। निघे तो



ईश जावयासी। दोघे धरती चरणासी। कृपा असावी म्हणोनिया ।।१४०।। परतोनि सद्गुरु आपण। हास्यमुखे करी भाषण। दयासिंधू जगज्जीवन। प्रसन्न असे तुम्हावरी ।।४१।। नका करूं कांहीं चिंता। आपणही येतो आतां। ऊर्ध्व करूनी वर हस्ता। जात तेथुनी सद्गुरु ।।४२।। श्रीवासुदेवानंद यती। प्रेमें वदती त्या पूजकासी। कैसा प्रसन्न हृषीकेशी। जाहला अर्चक पूर्वजा ।।४३।। चारीधाम हा देह फिरला। परी भैरवासम नर न देखिला। काय वर्णावें तद्भाग्याला। धन्य धन्य तो महात्मा ।।४४।। योगीदर्शनें करून। दंपत्या त्या आल्हादपूर्ण। ती निशा गृहीं क्रमून। निघती सद्गुरुदर्शना ।।४५।। प्रातरान्हीक सारूनी। नैवेद्य वैश्वदेव करूनी। निघतां विप्र तो तन्मनीं। होय आल्हाद अभिनव ।।४६।। भार्येते म्हणे भैरव। आजि भेटेल आम्हां माधव। उदेलें आमुचें वैभव। सत्य सत्य हें निश्चयें ।।४७।। यास्तव एक आलें मन्मनीं। आलें तें सांगतों तुजलागोनी। महद्दर्शना रिक्त पाणी। नच जावें गृहस्थें ।।४८।। पूजासामग्री सिद्ध करून। महाफलादि साधन। तैसेंचि यावया जावून। बराच वेळ होईल ।।४९।। नैवेद्य देवास करावा। औदुंबर तो सद्गुरु तोषवावा। आपण ही प्रसाद घ्यावा। तेथेंचि हें योग्य दिसे ।।१५०।। परिसूनिया भर्तृवचन। पाकसामग्री सिद्ध करून। पाकपात्रेंही

अ. ६

८२

घेऊन। निघे दंपती तेथुनी ।।५१।। मार्गी शुभ शकुन होती। स्तनपान वत्स करिती। शुभ्र धेनू अकल्पिती। येत सामोरी तयांच्या ।।५२।। चातक भारद्वाज मयूर। नृत्य शब्द करित मधुर। वामभागीं जाती सत्वर। ऐसें देखत दंपती ।।५३।। दुग्धपात्र भरून। येत सुवासिनी। शिरीं घेऊन। वत्सद्वया संगें घेऊन। येत सामोरी कुरंगी ।।५४। नकुल वामभागीं देखून। भैरव आल्हादोनि पूर्ण। निजपत्नीतें भाषण। करी संतोषकारक।। ५५।। म्हणे भार्ये पाहे स्थिती। शुभ शकुन बहुत होती। मंगल भवितव्य सूचविती। हात आनंद मानसीं।।५६।। ऐसें प्रेमें बोलत। परस्परा प्रेम पाहत। शनैः शनैः मार्ग क्रमित। प्राप्त होत कृष्णातटीं ।।५७।। संगमातें विलोकून। करिती साष्टांग नमन। कृष्णोदका शिरीं वंदून। पैलतीरा येत पै ।।५८।। औदुंबर वृक्षातळीं। देखोनिया चंद्रमौळी। भाल ठेविती चरणकमळीं। अतिभक्ती करूनिया ।।५९।। संतोषोनि सद्गुरुनाथ। उभय शिरीं वरदहस्त ठेवूनि आल्हादें बोलत। अक्षय्य कल्याण हो तुमचें ।।१६०।। इह परत्र होवो शिव। ऐसे वदे तो देवाधिदेव। उठा उठा हो सुदैव। आलें उदया तुमचें ।।६१।। सद्गुरु आज्ञें करून। ती दंपती मर्यादा धरून। बैसती मर्यादा पाळून। श्रीसन्निध तेधवा ।।६२।। पुढील अध्यायीं कथा सुंदर। भैरवा प्रश्न करतील गुरुवर। जाणोनि त्याचें अंतर। अक्षय्य प्रसाद

अ. ६

८३

करतील ।।६३।। तें चरित्र अति रसाळ। वदवील मन्मुखें दयाळ। प्रसन्न जाहलीया घननीळ। काय काय न होईल ।।६४।। स्वस्ति श्रीगुरुप्रसाद ग्रंथ। करुनि शंकरानिमित्त। वक्त वदविता श्रीगुरुनाथ। परमात्मा दयानिधी ।।६५।। संतचरणींचा किंकर। श्रीदत्तसूतशंकर। विनवी श्रोतया जोडूनि कर। द्याजी अवधान सादरें।।६६।। तुम्हां संतासमोर। काय मी बोलणार पामर। वदविती जैसे गुरुवर। तैसेंच वदेन सर्वथा ।।६७।।

इति श्रीगुरुप्रसादग्रंथे षष्ठोध्यायः ।।ओवी १६७।।

अ. ७
८४

श्रीगणेशायनमः ।। श्रीमत्सद्गुरुचरणाविंदाभ्यां नमः ।। ।।जय जया औदुंबरनिवासा । भक्तजनमानस राजहंसा ।। नमन तव चरणीं विश्वेशा । शतशतः करीत मी ।।१।। तव चरित्र वर्णावयासी । दयार्द्र तूं हृषीकेशी । स्फूर्ति दे ऐशी मानसीं । जिये संत संतुष्टती ।।२।। मज पामरा बुद्धी कैशी । विश्वात्मया तूं जाणशी । तरी सत्‌बुद्धी होऊनि यासी । तव चरित्र वर्णवी ।।३।। तूं समर्थ प्रसन्न होतां । अष्टसिद्धी येतील हातां । ऐशा निश्चयें तत्त्वता । घेत हातीं लेखनी ।।४।। वारंवार गुरुस्मरण । आणि एकनिष्ठ करूनि मन । प्रकृतपथें प्रवर्ते जाण । लीन दास हा शंकर ।।५।। पूर्वाध्यायीं भार्येसहित । भैरव विप्र औदुंबरी येत । अश्वासूनि त्या सद्गुरुनाथ । आदरें सन्निद्ध त्या घेती ।।६।। सर्वज्ञ असूनि सद्गुरुनाथ । विनोदें त्या विप्रा पुसत । कोण ही सहकारी येथ । स्वकीय परकीय असे ।।७।। ऐसें हास्य मुखें बोलत । भैरव करद्वया जोडित । सर्वज्ञा नाहीं विदित । ऐसे जगीं काय असे ।।८।। तथापि विनोदें करूनि । प्रश्न हा आम्हांलागूनी । पूर्वी भार्या संगति घेवूनि । येतों ऐसें बोललो ।।९।। तरी अपरोक्ष मत घेतल्याहून । प्रत्यक्ष करवावें दर्शन । म्हणोनि सांगाति घेऊन । आलों आज सद्गुरो ।।१०।। तरी

अ. ७
८५

प्रत्यक्ष श्रीनीं पुसावें । तिचिया मता परिसावें । मम हस्तें करूनि घ्यावें । जी इच्छा असेल ती ।।११।। परिसूनिया विप्रवचन । सद्गुरु हासति आपण । सतीकडे वळून । प्रसन्नचित्तें बोलती ।।१२।। आई साध्वी महामती । कल्याण तव करो श्रीपती । आम्ही सांगूं तें घेई चित्तीं । दूरदृष्टी देऊनिया ।।१३।। तुमचें व्हावया कल्याण । ईश आज्ञें करून । देव केलासे येथें नवीन । औदुंबर वृक्षातळीं ।।१४।। सतत तयाचें अर्चन । करावें तुम्हीं ऐसें भाषण । केलें त्वत्‌भर्त्यालागून । गत दिनीं या कृष्णातटीं ।।१५।। त्यांनींही आडवें घेतलें । तें तें सर्व निवारिले । शेवटी भार्याविचारीं ठेविलें । तेथें निरुपाय आमुचा ।।१६।। तरी तुम्हां उभयतांचा । काय विवेक ठरला साचा । निश्चय करोनि अंतरीचा । निवेदिजे आम्हांप्रती ।।१७।। अमृतप्राय ते गुरुभाषण । कर्णद्वारीं करितां प्राशन । अवर्णनीय समाधान । होत दंपती अंतरी ।।१८।। भैरव पत्नी उठोन । श्रीगुरुचरणीं करी वंदन । मर्यादें हात जोडून । विनवीत नम्रभावेंसी ।।१९।। म्हणे जी यतिवरा दातारा । खेटकीं बसणाऱ्या पामरा । युक्तायुक्त विवेक साजिरा । कोठोनिया येईल ।।२०।। तरी श्रीनींच विचार करणें । आम्हां शक्य ऐसीची सांगणें । व्यर्थ जाऊं नच देणें । महत् आज्ञा गुरुवरा ।।२१।। दूरदृष्टी

देऊन। शक्ती आमुची विलोकून। जेणें राहील सन्मान। आपुला ऐसें निवेदिजे।।२२।। दाक्षिणात्य आरंभ शूर। ऐसा अपवाद आम्हांवर। निर्धार श्रीचरणावर। असे आमुचा निश्चयें।।२३।। भगवन् आमुच्या बुध्यनुसार। दिसे हें कठिण आम्हां फार। परिसावें तयाचे विचार। दीनबंधूंनीं ये क्षणीं।।२४।। मुख्य आद्यविचार हा कीं। स्थान हें असें एकाकी। नच वास्तव्य आश्रय कीं। हिंस्रपशूस्थान हें।।२५।। ऐसीये निर्जन वनीं। तस्कर लुटतील दिवा येऊनी। सहाय न अन्य कोणी। याचा विचार करावा।।२६।। मनुजद्वय आम्ही येथ। मालक जातील उद्योगार्थ। एकटी अबला आश्रमांत। बसूं कैसी स्वामिया।।२७।। भिक्षुकी केलियावांचून। नान्य निर्वाह साधन। संग्रहीं असें कीं नसें धन। हेंही विदित श्रीचरणा।।२८।। आणखी एक असे विनंती। अशीति वर्षे त्यांना असती। त्यांत न्यून विंशती। असती मज स्वामिया।।२९।। उदरीं नसेची संतान। आतां व्हावयाची आशा न। कैसें चालेल हे अर्च्चन। महत् चिंता ही असे।।३०।। विनंतीचा या विचार करा। युक्त ऐसी आज्ञा करा। श्रीपुढें पसरतें पदरा। क्षमा कीजे गुरुवर्ये।।३१।। अंतरीं सद्गद होऊन। श्रीपुढें पदर पसरून। दीनभावें करून। सती



विनवी तेधवा।।३२।। ऐसें कारुण्य भाषण। परिसून सद्गुरु आपण। वदती त्यांकडे पाहून। हास्यमुखें तत्क्षणीं।।३३।। जरी सत्य आमुचें कथन। तुमचे अंतरीं पटेल खूण। ऐसेची वदतों तुम्हां लागून। धरा निर्धार अंतरीं।।३४।। तुमचें कल्याण चिंतून चित्तीं। एकची सांगू तुम्हांप्रती। आमुचें वचन श्रीपती। सत्य करील निश्चयें।।३५।। ऐकून सद्गुरुवचन। हात जोडिती दंपती आपण। महाराज कीजे आज्ञा आपण। प्रमाण संदेश आपुला।।३६।। सद्गुरु म्हणती तयासी। या मनोहर पादुका तुम्हांसी। कृतार्थ करतील निश्चयेंसी। कांहीं चिंता करूं नका।।३७।। सद्भावें पादुकार्चन। निर्धार मानसीं धरून। करितां होईल या वयीं जाण। पुत्र एक तुम्हांप्रती।।३८।। श्रीपाद नाम तयासी। ठेवा आमुची भाषा ऐसी। उद्धरील तुमच्या वंशासी। कीर्तिवंत होईल।।३९।। तया होतील चार सुत। तेही होतील विख्यात। पादुका अर्च्यांव्या संतत। मनोभावे करोनिया।।४०।। या औदुंबरा फळें जैशीं। तैशींच फळें तव वंशासी। होईल हें सत्य मानसीं। धरा निर्धार उभयतां।।४१।। मद्वचनीं विश्वास करा। विसरू नका जगदीश्वरा। परात्पर दीन सोयरा।। तवान्वया रक्षील पै।।४२।। वदुनि ऐसें दिव्य भाषण। कुंकुम नारीफल घेऊन। तैसींच

पुष्पें करीं घेऊन। घ्या हा प्रसाद म्हणती तया।।४३।। ऐसें म्हणतां ती सती। नमस्कारूनी एक भक्ती। पसरी ओटीं श्रीपुढती। अंतरीं सद्गद होऊनी।।४४।। श्रीगुरुदेव दत्त म्हणून। प्रसन्नयुक्त अंत:करण। होऊनी सद्गुरु आपण। श्रीफल ओटींत घातलें।।४५।। उपरी तुष्ट होऊन आपण। म्हणती हो तुमचें कल्याण। कृपासिंधू नारायण। रक्षो तुम्हां कालत्रयीं।।४६।। ऐसें ते सद्गुरु भाषण। परिसूनि दंपती आपण। करिती साष्टांग वंदन। श्रीगुरूतें तेधवा।।४७।। इतकें जाहलीया वरी। श्रीगुरु म्हणती उठा सत्वरीं। माध्यान्हा आला तमारी। भोजन करा येथेंचि।।४८।। पाकसिद्धी करून। करा पादुकांचे अर्चन। आजचि असे सुदिन। प्रारंभ करावें अर्चना।।४९।। ऐसें म्हणता श्रीगुरुनाथ। उभयतां स्नान करिती तेथ। शुचिवस्त्रें धारण करित। सद्गुरु आज्ञें तेधवा।।५०।। सद्गुरु आज्ञा वंदुनि शिरीं। विप्र पादुकार्चन करी। तत्पत्नी पाकसिद्धी करी। आल्हादुनि अंतरीं।।५१।। कृपासिंधू चंद्रमौळी। बैसति भैरव विप्राजवळी। अर्चन विधी न्याहाळी। कृपादृष्टी सद्गुरु।।५२।। विलोकून पादुकार्चन। संतुष्ट होती जगज्जीवन। डुल्लती स्वानंदे करून। साधु साधु म्हणोनिया।।५३।। सद्गुरु श्रीवासुदेवयती। प्रेमें म्हणती अर्चकासी।



पूजेने तोषविला हृषीकेशी। नान्य केलें साधन।।५४।। भावें पादुका अर्चितां। चतुर्विध अर्थ येत हातां। हें अंतरीं रक्षिजे सर्वथा। सकळही अर्चकीं।।५५।। सद्भावें करिता अर्चन। तत्काल चित्त शुद्ध होऊन। अज्ञान तम नष्ट होऊन। ज्ञान होईल पादुकार्चनें।।५६।। ऐसें सद्गुरु प्रेमें बोलत। धन्य धन्य भैरवा म्हणत। नेत्रें प्रेमाश्रू टाकित। सद्गद होऊनि अंतरीं।।५७।। श्रोतीं द्यावें अवधान। इकडे जाहले पादुकार्चन। भैरवें पाक विलोकून। पूजा संपविली तेधवा।।५८।। पाकसिद्धी जाहलीया वरी। भैरव वैश्वदेव करी। नैवेद्या सिद्ध करूनि सत्वरीं। श्रीचरणासी समर्पित।।५९।। काकबली समर्पून। करुनि हस्तपाद प्रक्षालन। द्वयाचमन करून। स्वस्थानीं येत विप्र तो।।६०।। घालूनि सद्गुरुसी आसन। मंडलविध्युक्त करून। पात्रस्थ घेऊनि जीवन। सद्गुरु करीं घालीत।।६१।। चंदन पुष्प तुलसी करीं। घेऊनि अर्पिली श्रीशिरीं। स्वानंदें मंत्र पठण करी। दीर्घतमा नामक।।६२।। पात्रीं करूनि अभिधार। षड्रस अन्न वाढिलें सत्वर। हस्तोदक घेती गुरुवर। विप्रहस्ते तत्क्षणीं।।६३।। करूनी भोजना प्रारंभ। दिनबंधू तो स्वयंभुव। विप्राकडे विलोकून। म्हणती बैसा भोजना।।६४।। श्रीचा नैवेद्य

घेऊन । करा भोजन परिपूर्ण । प्रसाद पत्नीतें ठेवून । करा तुम्ही भोजन ।।६५ ।। सद्गुरु आज्ञा मानून । भोजना बैसे तो ब्राह्मण । विप्रपत्नी अन्न घेऊन । आल्हादें दोघां वाढित ।।६६ ।। श्रीगुरु भैरवा बोलत । भोजन करा स्वस्थचित्त । विप्र अंतरीं आल्हादत । गुरुप्रेमे तेधवा ।।६७ ।। विप्र सांगे निज भार्येसी । वाढा वाढा हो श्रीगुरुसी । सर्वेचि विनवित श्रीगुरूसी । घ्यावें इच्छा वाटेल तें ।।६८ ।। दीनदास हें विलोकुनी । आहे त्यांत घ्यावें मागुनी । संकोच न करावा मनीं । दीननाथें येधवा ।।६९ ।। नित्य तृप्त जो जगन्नाथ । तो भक्ताच्या कण्या भक्षित । प्रेमें मिटक्या मारित । भक्त अन्ना तोषुनी ।।७० ।। शक्रादुर्लभ जें इंद्रपुरीं । तें तक्र मागे नरहरी । स्वभक्ता प्रसन्न श्रीहरी । दुर्लभ अभक्त मानवां ।।७१ ।। भक्तप्रेमें आल्हादोनी । वारंवार मागती गुरुमुनी । आकंठ भोजन करूनी । हस्तोदक स्वीकारती ।।७२ ।। हस्तमुखादि प्रक्षालून । विधियुक्त आचमन करून । तुलसीपत्र चर्वण करून । शतपावुली करीत ।।७३ ।। शतपावुली फिरत । भैरव पत्नींतें बोलत । पात्र वाढुनि घ्यावें त्वरित । बैसावें आतां भोजना ।।७४ ।। सद्गुरु आज्ञें करून । अन्न घेत पात्रीं वाढून । भोजन करित सावधान । विप्रपत्नी तोषुनी ।।७५ ।। विप्रेंही भोजन करून ।

---



हस्तमुखादी क्षालून । करूनिया आचमन । शतपावुली करीतसे ।।७६ ।। शतपावुली करून । आसनस्थ श्रीगुरु आपण । बोलती विप्रा लागून । या बैसा येथ असे ।।७७ ।। विप्रपत्नी भोजन करून । उत्तरांगा आटोपून । श्रीआज्ञें करून । यथाधिकार बैसत ।।७८ ।। श्रीसन्निध बैसल्यावरी । सुचे विप्राचे अंतरीं । म्हणे महाराज कवणेपरी । अर्चन वर्तन करावें ।।७९ ।। तैसेंचि वास्तव्य कोठें करावें । कवण काळीं पूजन करावें । येथें कैसें रहावें । कीजे याचा निर्णय ।।८० ।। देवापुढें जें येईल । त्या स्पर्शतां काय होईल । न घ्यावें तरी नेईल । वाटेल तो येथुनी ।।८१ ।। देवद्रव्यविनियोग । त्याज्य त्यांतील कोण भाग । तो आज्ञापिजे सांगोपांग । मुख्य विषय हा असे ।।८२ ।। लाभ होऊं लागल्यावरी । ग्रामाधिकारी पीडितील भारी । द्रव्यदृष्टी देखिल्यावरी । न होय जी मोह कोणा ।।८३ ।। विदित केल्या विषयाचा । उलगडा कीजे आदि साचा । नाहीं तरी आमुचा । थारा न होय सर्वथा ।।८४ ।। निरंतर येथें वसणें । श्रीचरण हेंच मागणें । आपणावीण काय करणें । पामरें आम्ही येस्थळीं ।।८५ ।। सर्वतोपरी श्रीचरणाचा । आधार आम्हां होय साचा । नचाश्रय अन्याचा । श्रीचरणा हें विदित असे ।।८६ ।। परिसून ऐसें विप्र भाषण ।

अ. ७
९२

प्रेमें वदती श्रीगुरु आपण । कांही काल गृहीं बसून । अर्चन कीजे ते असें ।।८७।। ब्राह्मीं मुहूर्ती उठोन । प्रातरान्हीक करून । यावें येथें निघून । तुम्ही एकाकी येस्थळीं ।।८८।। संगमीं स्नान करून । धौतवस्त्रे सुकवून । वस्त्रद्वय परिधानून । भस्म धारण करावें ।।८९।। पूजासामुग्री घेऊन । एकाग्र करूनिया मन । उत्तराभिमुख करून । द्वयाचमन करावें ।।९०।। प्राणायाम करोनी । इष्टकुलदेवता स्मरोनी । पूजा संकल्प करोनी । विघ्नेशातें नमावें ।।९१।। आसनविधि करूनि । पुरुषसूक्तादि न्यास करूनी । कलश शंखार्चन करोनी । ध्यान करावे स्वस्थ मनें ।।९२।। काषायवस्त्र परिधान । दंडकमंडलू विराजमान । रुद्राक्षमाळा भस्म धारण । शंखचक्रगदा करीं ।।९३।। त्रिभुवनैककमनीय । अत्यंत दिव्य अप्रमेय । ऐसी सद्गुरुमाय । घ्यावी अंतरी भरूनी ।।९४।। सर्व सुखाचें आगर । परमात्मा कृपासागर । निजभक्तांचे माहेर । दीनबंधू श्रीगुरू ।।९५।। मनः स्थीर करूनी । अरूप असतां भक्तालागुनी । सगुण जाहलासे जाणुनी । चित्त स्थीर करावें ।।९६।। ऐसें करूनिया ध्यान । आनंदित करावें मन । प्रव्ही भाव धरून । अर्ची विप्रा गुरुवरा ।।९७।। पुरुषसुक्तमंत्रे करून । उपचार अर्पावे पावन । पंचामृत अर्पून । रुद्राभिषेक करावा ।।९८।। गंधाक्षता

---

अ. ७
९३

समर्पून । तुलसी पुष्पें स्वयें आणून । श्रीपदीं अर्पूनि तनुमन । अर्चन करावें सर्वदा ।।९९।। धूपदीप समर्पून । द्यावा नैवेद्य पात्रीं ठेवून । हस्तप्रक्षालना नीर देऊन । तांबुल दक्षिणा देईजें ।।१००।। वेदमंत्रे करून । पुष्पांजली श्रीपदीं देऊन । सर्वोपचारार्थ तुलसी घेऊन । भावें श्रीपदीं अर्पिजे ।।१।। भावें प्रदक्षिणा करून । साष्टांग करावें वंदन । मन स्थीर करून । मूलमंत्र जपावा ।।२।। एवंविधी अर्चन करून । स्वगृहीं करावें गमन । येथें न वसतां जाण । प्रत्यही करावें पूजन ।।३।। कांहीं कालें करून । येथें ग्राम होईल स्थापन । मग एथेंचि वसून । करावें पूजन श्रीपदीं ।।४।। श्रीपुढें जें येईल । तें सर्व घेऊं नये मोहून । शुभाशुभ विलोकून । सांगतों तें स्वीकारीजे ।।५।। घृततैलादि सिद्धान्न । नेवूं नये गृहा येथून । श्रीपुढें विनियोग करून । शुभद्रव्य स्वीकारीजे ।।६।। तंडुलादि अक्षता । नेऊ नये गृहा सर्वथा । नैवेद्य सिद्धान्न येता । प्रसाद त्यासी दीजिये ।।७।। आपण घेऊं नये अन्न । घेतलीया महद्दूषण । ऐसा विवेक करून । स्वस्थचित्तें असावें ।।८।। श्रीगुरुप्रसादें करून । पुत्र होईल गुणनिधान । तव वंशा उद्धरून । नेईल सत्पदीं निश्चये ।।९।। गरोदर होईल ही सती । सर्व संस्कार यथामती । कराल तुम्ही शुद्धमती । युक्तकाली

भैरवा ।।११० ।। पौत्र देखाल तुम्ही नयनीं । मग वसावें येथें येऊनी । तावत्काल गृहीं राहोनी । करावें येऊनी अर्चना ।।११ ।। आतां पुढें करणार प्रयाण । परिस्थान आम्हां हेंचि जाण । न जावूं तुम्हां सोडून । हें निर्धारा अंतरीं ।।१२ ।। ब्राह्मीं मुहूर्तीं येथें येऊन । संगमीं करूं प्रातःस्नान । प्रातःपूजा येथें घेऊन । मग जाऊं भीमातटीं ।।१३ ।। कांहीं अवशेष कार्य आन । तें गाणगाग्रामीं बसून । पूर्ण करूनिया गमन । श्रीशैल्यशिखरा होईल ।।१४ ।। शेवटीं एकचि सांगतों । गाणगापुरा जरी जातों । परि सतत येथेंचि राहतों । हें निर्धारा मानसीं ।।१५ ।। दिवसें दिवस हें स्थान । अत्यंत प्रख्यात होईल जाण । शुद्धभावें करितां सेवन । त्या मी प्रसन्न निश्चयें ।।१६ ।। कालमानें करून । त्वदंशा करतील पीडन । परि धैर्य सोडूं नका जाण । समर्थ रक्षणा मी असे ।।१७ ।। कांहीं विघ्न आलिया दुस्तर । नैश पूजन झालिया नंतर । सर्वी एकचित्तीं जोडूनि कर । श्रीपदीं करावी प्रार्थना ।।१८ ।। ऐसी विज्ञप्ति केलिया । सर्व संकटें जातील विलया । नच नमावें अन्यपायां । श्रीपादुका सोडुनी ।।१९ ।। वैकुंठपति जया रक्षितां । तया इतराची काय कथा । सिंहार्भकातें पिडितां । क्षेम कोणा होईल ।।१२० ।। राजपुत्रापराध करून । कोण



जगतीं सुखी राहील । मद्भक्ता दुःख देऊन । नांदेल तो काय सुखीं ।।२१ ।। कन्या बेदर भूपतिची । मद्दर्शनार्थ येईल साची । कालगती विपरीतची । तीतें दर्शन होईल ।।२२ ।। ती आपुल्या भ्रात्याप्रती । उपदेशील महामती । पूजार्चनार्थ श्रीप्रती । दोन ग्रामें ती देईल ।।२३ ।। सारांश भैरवा तुजप्रती । प्रसन्न आहे श्रीपती । कांही चिंता न करूं चित्तीं । वंशजांची भैरवा ।।२४ ।। अत्यंत पवित्र हें स्थान । अतएव द्वादशाब्द जाण । वास केला येथें येऊन । तुजसाठी रे विप्रवरा ।।२५ ।। मद्भक्तरक्षणार्थ । अन्नपूर्णा ठेवितों येथ । सर्वदा मी वसून येथ । पुरवीन भक्त कामना ।।२६ ।। अष्टतीर्थे या स्थळीं असतीं । स्नानपानें पाप नाशती । ये स्थळाची महत्ख्याती । वेदव्यासें वर्णिली असे ।।२७ ।। अनंत जन्मीचें दुष्कृत । कृष्णा देखतां जाय त्वरित । भक्तीने जे स्नान करीत । काय वर्णावें तत्फला ।।२८ ।। ग्रहरोगादी पीडन । स्नानमात्रें निवारण । होईल हें सत्य भाषण । जाण सत्य तूं भैरवा ।।२९ ।। भावें भजतां श्रीहरी । सर्वार्ती स्वयें दूर करी । द्वारकानाथ नरहरी । जागृत सदा येथ वसे ।।१३० ।। ऐसें वरदान देऊन । पुनरपि त्यांकडे वळून । प्रेमभावें बोलती आपण । काय आणिक इच्छा असे ।।३१ ।। अमृतप्राय तें गुरुभाषण ।

परिसुनि दंपती आपण। प्रेमाश्रुनें चरण क्षालन। करिती श्रीचे तेधवा।।३२।। म्हणती महाराज या उभयतासीं। मातापिता तूं अससी। बंधूसोयरा तूंच निश्चयेसी। आजपासूनी श्रीवरा।।३३।। विनंती हीच चरणासी। विसरूं नका या दीनासी। श्रीचरणें सोडलिया परदेशी। असो आम्ही उभयतां।।३४।। ऐसें वदतां सद्गद होती। श्रीचरणीं भाळ ठेविती। स्फुंदस्फुंदोनी अश्रु ढाळिती। श्रीपदी करुणें दंपती।।३५।। करुणासागर श्रीगुरु। उठवी तयां अभयकरूं। ठेविती तच्छिरीं श्रीगुरू। आपण सद्गद होऊनी।।३६।। श्रीगुरु म्हणती दंपतीसी। कांहीं चिंता न करा मानसीं। नरहरी पाठीराखा तुम्हांसी। येथें राहिला सत्य हें।।३७।। ऐसें दंपत्या समाश्वासुनी। पुनरपि वदती तया लागुनी। काय अभीष्ट असें मनीं। वदा सत्वर निश्चयें।।३८।। ऐसें तें कारुण्य भाषण। परिसतां आल्हादें ब्राह्मण। अंतरी सद्गदित होऊन। भाल ठेवीत श्रीपदीं।।३९।। तैसीच ती विप्रभार्या। सप्रेम नमी सद्गुरुपाया। अतिसद्गद होऊनिया। प्रेमाश्रु ढाळीत श्रीपदीं।।१४०।। अंगीं रोमांच उभारती। तैसेचि अष्टभाव तिये वारिती। नच साध्वीतें देहस्मृति। सद्गुरुप्रसादे तेधवा।।४१।। वारंवार अश्रु पुसती। सद्गुरुवदना विलोकिती। तव ते प्रत्यक्ष दत्तरूप



दिसती। षड्भुज ध्यान विराजे।।४२।। भैरव स्त्री निजभर्त्यासी। विनवी चकित मानसीं। विलोकाजी सद्गुरूसी। कैसे दिसती श्रीगुरु।।४३।। निरीक्षी विप्र सद्गुरुसी। तैसेंच तद्रूप तयासी। दिसती सद्गुरु हृषीकेशी। विप्र अंतरीं चकित होय।।४४।। श्रीगुरु म्हणती तयासी। ऐसें काय 'विलोकितोसी। इच्छा असेल ते मानसीं। वदा तुम्ही सत्वर।।४५।। परिसूनि श्रीचें भाषण। वदती दंपती कर जोडून। नान्य इच्छा दयाघन। विदीत श्रीपदा सर्व असें।।४६।। एकचि विनंती श्रीचरणासी। निराधार या उभयतांसी। करुनिया परदेशी। नच जावें जी येथुनी।।४७।। ऐसें प्रेमें बोलत। श्रीपदी भाल ठेवीत। ढळढळा अश्रू टाकित। श्रीपदीं विव्हळ होऊनी।।४८।। श्रीगुरु म्हणती तयासी। उपदेशिलें कीं तुम्हासी। या स्थानीं मी अहर्निशी। भक्तार्थ जागरुक असे।।४९।। कैसा तुम्हा होत मोह। वृथा जाण हा संमोह। एतद्विषयी उहापोह। करीत असावें साधकें।।१५०।। तरी सर्व आशंका सोडुनी। निश्चय धरावा दृढमनीं। सतत वसे मी या कृष्णाकाननीं। सत्य सत्य हें त्रिवाचा।।५१।। पूर्वीच कथिलें कीं तुम्हासी। कांही अवशिष्ट कार्यासी। जाणें असे पूर्व दिशेसी। तथापि गुप्त वसती ये स्थळीं।।५२।। ऐसें तें श्रीचें भाषण। परिसूनि

विनविती दंपती आपण। कांहीं असो हे चरण। न सोडूं आम्ही सर्वदा।।५३।। श्रीगुरू मनीं विचारिती। काय करावें या भैरवाप्रती। जाणें आम्हा त्वरितगती। तो हा प्रकार येथें असा।।५४।। अस्तु ज्या कार्यार्थ वास केला। तो संतुष्ट पाहिजे केला। ऐसीये विचारें भैरवाला। म्हणती नाहीं जात आजि।।५५।। ऐसें तुष्टवोनी तया। म्हणती हें स्थान सोडूनिया। केवी जावें अग्रकार्या। चिंतनीय दिसत हें।।५६।। बहुधान्य नाम संवत्सरासी। येऊं आम्ही श्रीशैल्यासी। वैजनाथीं शिष्यासी। सांगोनी तीर्था धाडिलें।।५७।। पूर्वावतारीं रजकासी। पुढील अवतारीं तुजसी। होईल दर्शन अनायसी। ऐसें तया संबोखिलें।।५८।। वासरग्रामीं सायंदेवा। जाणूनि तयाच्या भावा। पंचदशवर्षे तुझिये गांवा। समीप वास होईल।।५९।। ऐसें अनेक भक्तांसी। समाश्वासूनि गृहासी। धाडिले ते श्रीगिरीसी। येतील विश्वासें आमुच्या।।१६०।। ऐसा विचार करीत। कृष्णासंगमीं श्रीगुरु वसत। वसुदेवगेहीं नंद राहात। जेवी त्रिमास मथुरेसी।।६१।। अति काकुळती येऊनी। नंदे विनवावें वसुदेवचरणीं। द्याजी आज्ञा म्हणूनी। प्रत्यही प्रार्थना करावी।।६२।। बरे आजचे दिवस राहावें। उदईक गमन करावें। ऐसीयेपरि ठेवून घ्यावें।



जेवी नंदा वसुदेवें।।६३।। तैसेंचि येथें जाहलें। भैरवप्रेमें सद्‌गुरु मोहिले। मायाधीशाही मोहिले। यया म्हणती भक्तप्रेम।।६४।। ऐसें भक्तप्रेमें मोहित। त्रिमास तेथें राहात। प्रत्यही गमना निघत। मागुती येत परतोनि।।६५।। श्रीगुरु म्हणती अर्चका। धन्य भक्त भैरव बांका। मोहोनिया जगन्नायका। घेत त्रिमास ठेवूनि।।६६।। निर्गुणत्वें निरंतरीं। अक्षय्य वास श्रीहरी करी। परिसगुणरूपें नरहरी। त्रिमास पुनरपि रहात।।६७।। अश्विन वद्य द्वादशी। भैरवहस्तें हृषीकेशी। अर्चन मनोहर पादुकेसी। करवीत सन्निध बैसूनी।।६८।। भक्तेच्छा पूर्ण करोनी। त्रिमास तेथें राहुनी। घेत दंपतीस तेथें ठेवूनी। औदुंबरीं श्रीगुरु।।६९।। गोपाळकाला तेथें करूनी। निघति श्रीगुरु तेथूनी। दंपती आडपडती चरणीं। रहा स्वामी म्हणूनिया।।१७०।। पुनरपी त्या संतुष्ट करोनी। निघती श्रीगुरू तेथोनी। गाणगाग्राम लक्षुनी। गमन करिती पादचरें।।७१।। सद्‌गुरु आज्ञा शिरसा वंदुनी। वर्ते भैरव संतुष्ट मनीं। प्रत्यही येथें येऊनी। पूजा करुनि जात असे।।७२।। आपण एकाकी म्हणोनी। दिधले ज्योतिष सोडूनी। अन्य द्विज पाठवूनी। वृत्ती रक्षण करीतसे।।७३।। पुढें सद्‌गुरुकृपेंकरून। भैरवस्त्री असतां वर्षन्यून। जाहली गर्भिणी

परिपूर्ण। संस्कार भैरव करीत पैं।।७४।। भरला नवमास पूर्ण। सती प्रसवे पुत्ररत्न। आनंदलें उभयतांचे मन। जातकर्मा करित द्विज।।७५।। नामकरणादि संस्कार। यथाकाली करी द्विजवर। सद्गुरुप्रसाद आम्हांवर। म्हणऊनि श्रीपाद नाम ठेवित।।७६।। तया श्रीपादा चार सुत। जाहले त्या फाडे बोलत। ऐसा हा वंश भाग्यवंत। असे भट्टजी तूमचा।।७७।। ऐसें सद्गुरु वासुदेवानंद वदत। अर्चक होऊनी सद्गदित। साष्टांग श्रीचरणा वंदित। स्फुंदफुंदोनी अश्रु ढाळी।।७८।। पुनरपि वदती अर्चकासी। पाहा तपःप्रभावासी। आपुलासा केला हृषीकेशी। धन्य धन्य तो भैरव।।७९।। काय स्वधर्मवर्तनाचें फळ। वैकुंठ केलें कानन केवळ। जाहला जन्म त्याचा सफळ। केला घननीळ आपुला।।१८०।। श्रीगुरु म्हणती अर्चकाला। ज्यानें सत्कीर्तीध्वज लाविला। तोचि नर धन्य जाहला। पुरुष तोचि म्हणावा।।८१।। निरतिशय सौख्य जया पाहिजे। तेणें विश्वंभर आराधिजे। तत्प्रसादें कैवल्य पाविजे। हेंचि कर्तव्य नराचें।।८२।। निर्भयत्व जया पाहिजे। तये अच्युतपदाब्ज सेविजे। त्यानें विश्वात्म भाव पाविजे। तत्प्रसादें कृतार्थता।।८३।। ऐसें भागवतीं कविवर्य। विदेहा वदला ज्ञानवर्य। वासुदेव मुनिवर्ये। हेंचि सांगे नारदू।।८४।।



अतएव नृदेह हा अमूल्य। रिता जाऊं न दे एक पल। सेविजे सद्गुरुचरणकमल। दृढविश्वासें सर्वदा।।८५।। भैरव तपःप्रभावें करून। विपिनीं राहिला जगज्जीवन। असंख्य भक्तोद्धारण। केलें करीत अद्यापी।।८६।। पुंडलीकभक्तें श्रीहरी। उभा केला विटेवरी। जड मूढांचा उद्धार करी। नामसंकीर्तनें सर्वदा।।८७।। अहो पूजक गुरुभक्ता। तुम्हां कथितों एक आतां। संप्रति कलिकाल हा तत्त्वतां। जाणूनिया वर्तणें।।८८।। कोणा कांहीं बोलूं नये। सन्मार्ग आपण सोडूं नये। ईश्वरा संकट घालूं नये। प्रारब्ध सर्वी भोगिजे।।८९।। ईश्वरा कांही न मागावें। प्रारब्ध ठेवील तैसें रहावें। भगवच्चिंतन करावें। जगलज्जा सोडूनिया।।१९०।। ऐसीयेपरि वर्ततां। ईश्वर येईल खास हातां। तत्कृपें चित्ता समाधानता। खास देईल सद्गुरु।।९१।। दीनबंधू श्रीगुरु। अनाथासी कल्पतरू। उभारून स्वीय करूं। सप्रेम अश्वासी पूजका।।९२।। भैरववृत्त अहर्निशी। विलोकावे निजमानसीं। लोकेषणा त्यजोनि निःशेषीं। स्वात्म वर्तन सुधारा।।९३।। चरित्र हें अहर्निशी। प्रेमें कथावें परिवारासी। हळुहळु त्यांचे मानसीं। धर्मजागृती करावी।।९४।। ऐसें यतिराज वदतां। सर्व घालिती दंडवता। श्रीगुरु त्या दर्शवी अभय हस्ता। नारायण नारायण

म्हणोनी ।।१९५।। पुनः हास्यमुखें गुरुनाथ। श्रीगुरुदेव समर्थ। ऐसें वदत वंदित। पाय कृष्णावेणीचे तेधवा ।।१६।। दंड कमंडलु घेऊनी। निघतां श्रीगुरु तेथुनी। भक्तही सर्व श्रीमागुतीं। येत देवा सान्निध ।।९७।। यथाविधी दंड घेऊन। करिती श्रीदेवा वंदन। चला स्वगेहीं म्हणून। सर्वा आज्ञा देत पैं ।।९८।। गुरू आज्ञें भक्तजन। स्व स्वगेहा करिती गमन। श्रीगुरु स्वासनस्थ होऊन। अंतरीं लीन होत पैं ।।९९।। ऐसां सद्गुरुभक्त संवाद। वर्णविती सद्गुरुराज परद। श्रवणपठणें जो परत्रद। सद्भाविका देणार जो ।।२००।। सद्गुरुमुखपीयूष। वर्णना शक्त एक शेष। तें अमृत क्षुद्र मानुष। काय शक्त वर्णना ।।१।। हृदिस्थे जैसे प्रेरिलें। तैसें यथामति लिहिलें। न्यूनाधिक जें जाहलें। संत क्षमा करतील ।।२।। गीतेमाजी श्रीपती। वदे स्वभक्त पार्थाप्रती। अधर्म वाढे जेव्हा जगतीं। तदा सद्धर्म स्थापावया ।।३।। मी अवतरुनि भूवरी। सद्धर्मसद्भक्त रक्षण करी। पूर्वापार ऐसीये परी। अवतार मी घेतसे ।।४।। तद्वाक्यानुसरोनी। श्रीनृसिंह सरस्वती सन्मुनी। भक्तोद्धारार्थ कृष्णाकाननीं। अक्षय्य वास करितसे ।।५।। प्रेमळ भक्तां संप्रती। अद्यापि सगुणरूप प्रतीती। लीलाविग्रही श्रीपती। अभिनव लीला दावीतसे ।।६।। जो



कां त्रैलोक्यचिंतामणी। तयां प्रेमे कानना आणि। धन्य भक्त शिरोमणी। विप्रभैरव धन्य धन्य ।।७।। प्रव्ही भाव धरोनी। संतमहंताचे चरणीं। प्रार्थी शंकर कर जोडुनी। गुरुप्रसाद सेवावया ।।८।। सद्भावें सेवितां गुरुप्रसाद। प्रसन्न होईल अखिलार्थद। निरसेल निःशेष संदेह। त्रिविधताप नष्ट होय ।।९।। शुद्ध होतां अंतर। ज्ञानरूप भास्कर। हृदयीं उदित निरंतर। राहील सद्गुरुकृपें ।।२१०।। विनवी श्रोतयां शंकर। तुम्हां संतांसमोर। नच मज वदण्याचा अधिकार। मग लेखन ते दूरचि ।।११।। तुम्ही कनवाळू संत। ठेवा मच्छिरीं कृपाहस्त। कृतकृत्य कराजी त्वरित। सद्गुरुचरणीं घालूनिया ।।१२।। तुम्हीं घातलिया चरणावरी। मग तो कृपासागर नरहरी। वरदहस्त माझे शिरीं। ठेवील खास निश्चयें ।।१३।। कैसें विनवावें संतांसी। हें न ठाऊक जी मजसीं। सलगी लिहिलें विशेषीं। क्षमा तयाची करावी ।।१४।। मातृअंकी बैसत। वेडेंवाकुडे अग्रीं नाचत। अर्भकाचें त्या कौतुक करीत। तन्मुखा प्रेमें चुंबित पैं ।।१५।। तैसा हा पामर। वाचाळला स्वैर हा फार। समर्थ क्षमा करणार। महानुभाव तुम्ही असा ।।१६।। नेणतां कवित्वाची रिती। केलें साहस यथामती। चित्तप्रेरक जें लिहविती। तसेंच वर्णिलें असे ।।१७।। तरीं हंसक्षीर न्यायें करूनी। स्वीकारिजे सज्जनीं। भैरव चरित्र हें निशिदिनीं।

चतु:पुरुषार्थदायक।। १८ ।। सद्भावे करितां पठण। सर्व कामना करील पूर्ण। श्रीनृसिंह सरस्वती उमारमण। रमारमण निश्चयें।।१९।। सद्धर्मवर्तनाचें फळ। दावील दर्शवील सद्गुरु दयाळ। सद्गुरुसम कनवाळ। नच दुजा या भूवरी।।२२०।। ऐसें श्रोतयां प्रार्थून। स्मरें मग जगदीश चरण। जो कृपासागर परिपूर्ण। अनुपमेय तेजस्वी।।२१।। भैरववरदा श्रीहरी। या क्षुद्राची उपेक्षा न करी। सदां वसूनि हृदयांतरीं। उद्धरी या पामरा।।२२।। त्वत्पदाब्जीं शिर नमावें। मंगल तव नाम मुखीं वसावें। सदा तव यश:श्रवण व्हावें। आस न या दुजी असे।।२३।। कृष्णासंगम संविहारा। दीनबंधो दयासागरा। विश्वात्मभाव उदित करा। शंकरहृदयीं संतत।।२४।। स्वस्ति श्रीगुरुप्रसाद ग्रंथ। वक्ता वदविता सद्गुरु समर्थ। निमित्तमात्र शंकर येथ। दयाघने केला असे।।२५।। संतचरणींचा किंकर। श्रीदत्तसुत शंकर। शेवटी विनवी जोडूनि कर। कृपादृष्टी दासी करा।।२६।। आठराशें एकसष्टवत्सरीं। मधुसित प्रतिपत बुधवासरीं। प्रमाथीनाम संवत्सरीं। जाय शिखरा चरित्र हें।।२७।। इति श्रीमद्गुरुप्रसादग्रंथे श्रीमत् सद्गुरु वासुदेवानंद अर्चक संवादे सप्तमोध्याय:।। ओवी संख्या ११५०।।

।। श्री गुरुदेव दत्त।।

## श्रीदत्तप्रार्थनास्तोत्रम्

श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव। श्रीदत्तास्मान्पाहि देवाधिदेव। भावग्राह्य क्लेशहारिन्सुकीर्ते।। धोरात्कष्टादुध्दरास्मान्नमस्ते।।१।। त्वं नो माता त्वं पिताऽऽप्तोऽधिपस्त्वं।। त्राता योगक्षेम कृत्सद्गुरुस्तवम्। त्वं सर्वस्व नोप्रभो विश्वमूर्ते।। घोरात्कष्टादुध्दरास्मान्नमस्ते।।२।। पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं।। भीतिं क्लेशं त्वं हराऽशुत्वदन्यम्।। त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते।। घोरात्कष्टादुध्दरास्मान्नमस्ते।।३।। नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता।। त्वत्तो देव त्वं शरण्योऽकहर्ता कुवात्रेयानुग्रहं पूर्णराते।। घोरात्कष्टादुध्दरास्मानमस्ते।।४।। धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिम्। सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम्।। भावसक्तिं चाखिलानन्दमूर्ते।। घोरात्कष्टादुध्दरास्मानमस्ते।।५।। श्लोकपंचकमेतद्यो लोकमंगलवर्धनम्।। प्रपठेन्नियतो भक्त्या स श्रीदत्तप्रियो भवेत्।।६।।

# श्रीगुरुस्तोत्रम्

भावें नमू श्रीगुरुच्या पदासी। जे आपदासी हरि दे पदांसी।। दासीपरी श्री नमि ज्या पदांसी। यासी भजे तो नमितों पदांसी।।१।। सततविनतगम्य श्रेष्ठा दुष्टां अगम्य। सदयहृदयलभ्य प्रार्थिती ज्यासि सभ्य।। समद विमद होती यत्प्रसादें न होती।। कुगति सुगति देती त्या पदा हे विनंती।।२।। गुरुपदा विपदापहरा सदा। अभयदा भयदामयदारदा।। हृवतदान्यमदा तव दास्य दे।। अंमदंदा गदहा न कुदास्य दे।।३।। नमस्ते भवारे नमस्ते शतारे। नमस्तेऽघवैरे प्रशस्तेष्टकर्त्रे।। नमस्ते खलारे विहस्तेष्टदात्रे। नमस्तेऽरिवैरे प्रशस्तेष्टसत्रे।।४।। गुरुपद मद वारी सर्व भेदां निवारी। गुरुपद गद वारी सर्व खेदां निवारी। सतत विनत होता वारि जें आपदांसी। सतत विनत होऊं आम्हीं ही त्या पदांसी।।५।। भावे पठति जे लोक हे गुरुस्तोत्रपंचक।। तयां होय ज्ञान बरे वासुदेव म्हणे त्वरे।।६।।

इति श्री. प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतीविरचित

श्रीगुरुस्तोत्रपंचकं संपूर्णम्

दत्तात्रेयं प्रपद्ये शरणमनुदिनं दीनबंधुं मुकुंदम्।।
नैर्गुण्ये संनिविष्टं पथि परमपदं बोधयंतं मुनीनाम्।।
भस्माभ्यङ्गं जटाभिः सुललितमुकुटं दिक्पटं दिव्यरूपम्।।
सह्याद्रौ नित्यवासं प्रमुदितममलं सद्गुरुं चारुशीलम्।।